सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह
सोलापूर
रविवार, २२ डिसेंबर २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक ४६ । पाने १२+८ । किंमत रु. ६/-
|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O.|
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## श्री राजराजेश्वराला मिळणार 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा

**अकोला, २१ डिसेंबर**

प्राचीन इतिहास असलेल्या व ऐतिहासिक अशा श्री राजेश्वर मंदिराला 'ब' वर्गाचा दर्जा देण्याची प्रक्रिया सुरू आहे. ती पूर्ण करून ताबडतोब निधी द्या, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे अकोला पूर्वचे आमदार रणधीर सावरकर यांनी केली.श्री राजराजेश्वर मंदिर परिसरात विकासकामांसाठी निधी मिळावा म्हणून सहा महिन्यांपासून आमदार सावरकर राज्य सरकारकडे पाठपुरावा करीत आहे. महानगरपालिका, जिल्हा प्रशासन, आयुक्त तसेच मंत्रालयात सुद्धा या संदर्भात हालचाली सुरू आहे. या मंदिराला 'क' वर्गाचा दर्जा मिळाला. परंतु, 'ब' वर्गाचा दर्जा मिळविण्याच्या दृष्टीने प्रक्रिया सुरू आहे. मध्यंतरी निवडणूक असल्यामुळे आचारसंहिता होती. त्यामुळे हे काम झाले नव्हते. ते आता पूर्ण करून राजराजेश्वर नगरीला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देऊन मंदिराच्या परिसराचा विकास करा व सातत्याने यासाठी आपण प्रयत्न करीत होता. त्याला गती द्या, अशी मागणी सावरकर यांनी केली. *(तभा वृत्तसेवा)*

# फडणवीस गृह, शिंदे नगरविकास तर अजितदादांकडे अर्थ

**नागपूर, २१ डिसेंबर**

देवेंद्र फडणवीस सरकारमधील मंत्र्यांच्या शपथविधीच्या ८ दिवसानंतर म्हणजे शनिवारी खातेवाटप जाहीर करण्यात आले. हिवाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी सर्व ३३ कॅबिनेट आणि ६ राज्यमंत्र्यांना खातेवाटप जाहीर झाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडे गृह मंत्रालयासह ऊर्जा, विधि व न्याय, सामान्य प्रशासन, माहिती व प्रसारण तसेच खातेवाटप न झालेली खाती आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नगरविकास, गृहनिर्माण आणि सार्वजनिक बांधकाम विभाग आणि अजित पवार यांच्याकडे अर्थ मंत्रालय तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाची जबाबदारी देण्यात आली. चंद्रशेखर बावनकुळे यांना महसूल विभागाची जबाबदारी सोवपण्यात आली. राधाकृष्ण विखे पाटील यांना जल संसाधने (गोदावरी आणि कृष्णा खोरे विकास महामंडळ) विभाग, राकाँचे हसन मुश्रीफ यांना वैद्यकीय शिक्षण विभाग, गिरीश महाजन यांच्याकडे



जल संसाधने (विदर्भ, तापी, कोकण विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापनाची जबाबदारी देण्यात आली.

गणेश नाईक यांच्याकडे वन, गुलाबराव पाटील यांना पाणीपुरवठा आणि स्वच्छता, दादाजी भुसे यांच्याकडे शालेय शिक्षण मंत्रालय देण्यात आले. संजय राठोड यांच्याकडे मृद व जलसंधारणाची जबाबदारी देण्यात आली. धनंजय मुंडे यांना अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग सोपवण्यात आला. उदय सामंत यांच्याकडे उद्योग आणि मराठी भाषा विभाग, जयकुमार रावळ यांना विपणन आणि राजशिष्टाचार विभग, पंकजा मुंडे यांना पर्यावरण, वातावरण बदल आणि पशुसंवर्धन विभाग, अतुल सावे यांच्याकडे ओबीसी कल्याण, दुग्धविकास आणि नविनीकरण ऊर्जा विभाग देण्यात आला.

### विदर्भातील मंत्र्यांकडील खाती

विदर्भातील अशोक उईके यांना आदिवासी विभागाची जबाबदारी देण्यात आली. आकाश फुंडकर यांच्याकडे कामगार, आशिष जयस्वाल यांना वित्त, योजना कृषी, पुनर्वसन, विधि व न्याय आणि कामगार राज्य मंत्रालय मिळाले. इंद्रनील नाईक यांना उद्योग, सार्वजनिक बांधकाम, उच्च व तंत्रशिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मृद व जलसंवर्धन राज्य मंत्रालय मिळाले.

शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस कडून मिळण्यासाठी मोठी चळवळ सुरू होती मात्र भाजपाने बहुतांश महत्त्वाची खाती आपल्याकडे ठेवली आहेत.मावळत्या सरकारमधील बहुतांश मंत्र्यांना पूर्वीचीच खाते मिळाली आहेत.

मंत्री व खातेवाटप यादी : पान ३ वर

## हिवाळी अधिवेशनाचे सूप वाजले

**नागपूर, २१ डिसेंबर**

उपराजधानीत १६ डिसेंबरपासून सुरू झालेल्या राज्य विधिमंडळ हिवाळी अधिवेशनाचे शनिवारी सूप वाजले. पुढील अधिवेशन मुंबईत ३ मार्चपासून सुरू होईल, असे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी राज्यपालांच्या संदेश वाचनानंतर जाहीर केले.

सहा दिवसांच्या कामकाजात परभणी, बीड, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान याच विषयांवर कामकाज केंद्रित होते. राज्यपाल अभिभाषण आणि ३५ हजार कोटींच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेनंतर शेवटच्या दोन दिवसांत विरोधकांच्या अंतिम आठवडा प्रस्तावानिमित्ताने शेतकरी, आदिवासी प्रश्न, विदर्भ-मराठवाड्याची चर्चा झाली. विधिमंडळाच्या अधिवेशनात प्रत्यक्षात ४६ तास २६ मिनिटे कामकाज झाले.

# विदर्भ-मराठवाड्याच्या, शेतकरी, कष्टकऱ्यांच्या हिताचे निर्णय

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

**नागपूर, २१ डिसेंबर**

विदर्भ-मराठवाड्याच्या हिताचे, शेतकरी, कष्टकरी, सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय घेण्याचे कामे या अधिवेशनात आम्ही केले. विदर्भ आणि मराठवाड्याच्या विकासासाठी सिंचन, उद्योग अशा विविध क्षेत्रांत गेल्या अडीच वर्षांत परिवर्तन आमच्या सरकारने केले असून, आमच्या सरकारच्या अजेंड्यावर महाराष्ट्राच्या विकासासह मागास भागात विकासाचा जो असमातोल आहे, त्यावर आमचे सरकार फोकस ठेवणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

हिवाळी अधिवेनाचे सूप वाजल्यानंतर महायुतीची पत्रपरिषद झाली. त्यात मुख्यमंत्री बोलत होते. पत्रकार परिषदेला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री म्हणाले की, सिंचन प्रकल्प, नदीजोड प्रकल्प, उद्योग, इंफ्रास्ट्रक्चर प्रकल्प असा चौफेर विकास केला जाणार आहे. कापसाचा बोनस घोषित केला, संत्रा उत्पादक ५५ हजार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी १६५ कोटींच्या तरतुदीचा निर्णय सरकारने घेतला, गेल्या १५ वर्षांतील रेकॉर्ड सोयाबीन खरेदी केली असून, १२ जानेवारीपर्यंत खरेदी सुरू राहणार आहे. कापसाच्या खरेदीसंदर्भात बाजार भाव हा हमीभावापेक्षा जास्त असल्याने आपला कापूस शेतकरी कापूस महामंडळाकडे न विकता थेट बाजारात विकत आहेत. *(तभा वृत्तसेवा)*

### नागपूर मेट्रो टप्पा-२ लवकर पूर्ण होणार

एशियन डेव्हलपमेंट बँक आणि युरोपीयन इंडस्ट्रीयल बँक या दोघांनी नागपूर मेट्रोसाठी ३,५८६ कोटी रुपयांचे कर्ज ०.७३ टक्के दराने दिले आहे. २० वर्षांसाठी हे कर्ज देण्यात आले असून, १० लाख लोकांना फायदा असलेल्या या ४३ किलोमीटरच्या नागपूर मेट्रो-२ च्या कामाला गती मिळेल आणि जिल्हा शहराशी जोडला जाईल, असा आशावाद मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. त्याचवेळी नागपूर सुधार प्रन्यास बंद करण्याचे विचाराधीन असल्याचे सूतोवाच मुख्यमंत्र्यांनी केले.

## विरोधकांनी सभागृहात नाही, पायऱ्यांवर प्रश्न मांडले

### एकनाथ शिंदे यांचा टोला

**नागपूर** : नागपुरात आठवडाभर चाललेल्या हिवाळी अधिवेशनाच्या काळात महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सभागृहात नाही, तर पायऱ्यांवर प्रश्न मांडले, अशी घणाघाती टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. दु:ख एकाच गोष्टीचे वाटते की, अधिवेशन विदर्भात असताना विरोधकांनी विदर्भासाठी सभागृहात जे मुद्दे उपस्थित करायला हवे होते, ते पायऱ्यांवर आणि माध्यमांसमोर मांडण्यात धन्यता मानली, असा टोलाही त्यांनी लगावला.

हिवाळी अधिवेशनाची सांगता झाल्यानंतर महायुती सरकारची संयुक्त पत्रपरिषद झाली. यात उपमुख्यमंत्री शिंदे यांनी महाविकास आघाडीवर जोरदार निशाणा साधला. ते म्हणाले, आठ दिवस सुरू असलेले हिवाळी अधिवेशन आज संपले. राज्यात नव्याने सरकार स्थापन झाले असले तरी टीम तीच आहे, फक्त मॅच नवीन आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात मुख्यमंत्री म्हणून कामकाज सुरू झाले. कमी कालावधी असला तरी सरकारने ठरवलेले कामकाज निर्धारित वेळेत पूर्ण झाले.










सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# पुणे पुस्तक महोत्सवास आतापर्यंत ७ लाख लोकांची भेट

**आयोजक राजेश पांडे यांची माहिती; नृत्यांगणा गौतमी पाटील यांनीही दिली भेट**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ डिसेंबर -**

आयोजक राजेश पांडे म्हणाले, आतापर्यंत सात लाख लोकांनी पुस्तक प्रदर्शनास भेट दिली आहे. अनेक जणांनी महोत्सव मध्ये भेट देऊन पुस्तक पाहणी केली आहे. गौतमी यांना पुस्तक वाचन उत्सुकता निर्माण झाली असून त्यांनी पुस्तक महोत्सव मध्ये येण्याची इच्छा व्यक्त केली. आज ती पुस्तक खरेदी देखील करत आहे ही प्रशंसनीय बाब आहे. आतापर्यंत अनेक ठिकाणी मला कार्यक्रमास नाचणयासाठी बोलावले जाते. पण मी प्रथमच पुणे पुस्तक मोहत्सवामध्ये पुस्तक वाचनसाठी आले आहे.

मला जीवनात पुस्तक वाचन संधी कधीच मिळाली नाही. परंतु आज मला ती संधी अभिनेते प्रवीण तरडे यांच्या माध्यमातून मिळाली आहे. अनेक ठिकाणी प्रवास करताना मला मोकळा वेळ मिळतो त्यावेळी पुस्तक वाचनास वेळ आता मिळेल. आज मला संधी पुस्तक वाचन मिळालेली आहे असे मत प्रसिद्ध नृत्यांगना गौतमी पाटील हीने पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले. याप्रसंगी फुलवंती चित्रपट लेखिका स्नेहल तरडे यांच्या हस्ते पुस्तके देऊन तिचा सन्मान करण्यात आला. गौतमी पाटील म्हणाली, मी केवळ जीवनात आजपर्यंत नृत्य शिकले पण आज वेगळी संधी मला प्राप्त झाली आहे. मी आजपासून पुस्तक वाचन करण्याचे ठरवले आहे. माझा जीवन संघर्षमय असून माझ्या शिक्षण याबाबत सर्वांना माहिती आहे.

त्यामुळेच आता मी पुस्तक वाचन करण्याचे ठरवले आहे. पुस्तक वाचन मध्ये सुरवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील पुस्तके मी वाचन करणार आहे. प्रवीण तरडे म्हणाले, गौतमी हीची कला आणि संदेश समजापर्यंत आगामी काळात चांगल्या प्रकारे जाईल. स्व.अण्णाभाऊ साठे यांचे 'फकिरा', 'आवडी', 'पाझर' ही पुस्तक मी तिला भेट देत आहे त्यांचा लढा वाचून तिला पुढील आयुष्यात प्रेरणा मिळेल.

# हिवाळी अधिवेशनात सतरा महत्त्वपूर्ण विधयके मंजूर

## दोन प्रलंबित; नागपुरात सहा दिवस चालले अधिवेशन

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**नागपूर, दि.२१ डिसेंबर-**

मंत्रिमंडळाच्या खाते वाटपाविना सहा दिवस चाललेल्या हिवाळी अधिवेशनात एकूण १७ महत्त्वपूर्ण विधेयके दोन्ही सभागृहात मंजूर झाली तर एक विधेयक संयुक्त समितीकडे तर एक विधेयक विधानसभेत प्रलंबित राहिलेले आहे.

माहिती सरकारचे पहिलेच अधिवेशन १६ ते २१ डिसेंबर दरम्यान नागपुरात झाले अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला राजभवनात मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यात आला होता .त्यामध्ये माहितीच्या महायुतीच्या ३३ आमदारांना कॅबिनेट तर सहा जणांना राज्यमंत्रीपदाची शपथ देण्यात आले मात्र आठवडा उलटूनही अद्याप त्यांना खाते वाटप करण्यात आलेले नाही या कालावधीत चाललेल्या सभागृहात एकूण १९ विधेयके मांडण्यात आली होती. प्रचंड बहुमतात असलेल्या महायुती



सरकारने त्यापैकी १७ विधेयके चर्चा करत बहुमताने दोन्ही सभागृहातून मंजूर केली आहेत दोन्ही सभागृहात मंजूर विधेयके: महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांमुळे विवक्षित जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समि त्यांचे सभापती आणि विवक्षित पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती पदांच्या) निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे विधेयक, २०२४ (ग्रामविकास विभाग) , महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२४ (नगर विकास विभाग) (अप्रत्यक्षपणे निवडलेल्या नगर पंचायतीच्या अध्यक्ष व उपाध्यक्षांचा पदावधी पाच वर्षे करणे),श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) (सुधारणा) विधेयक, २०२४ (विधि व न्याय विभाग) (विश्वस्त समितीचा कार्यकाळ आणि समि ती सदस्यांची संख्या वाढविणे) ,महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०२४ (सामान्य प्रशासन विभाग) (सर्वसाधारण बदलीसाठीच्या कालावधी ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत वाढवण्याची तरतूद),महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२४ (महसूल व वन विभाग) (जमिनीचे हस्तांतरण किंवा विभाजनाचे नियमाधीकरण करण्यास परवानगी देणे आणि नियमाधीकरण अधिमुल्य कमी करुन बाजारमुल्याच्या ५ टक्के इतके निश्चित करणे),महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२४ (कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग),महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सुधारणा) विधेयक, २०२४ (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) (वाचन संस्कृतीचा व ग्रंथालय चळवळीचा विकास करण्यासाठी अधिनियमाच्या विवक्षीत कलमांमध्ये सुधारणा करणेबाबत),महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२४ (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) (समुह विद्यापीठ घटित करणेच्या तरतुदीम ध्ये सुधारणा),महाराष्ट्र खाजगी विद्यापीठं (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२४ (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) (तीन नवीन खाजगी विद्यापीठे स्थापन करणेबाबत),महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष (सुधारणा) विधेयक, २०२४ (पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग) (अपराधांच्या शिक्षेत वाढ अधिनियम ाच्या तरतुदींच्या उल्लंघनाबद्दल कडक शिक्षा व दंड वाढविण्याबाबत),हैद्राबाद इनामे व रोख अनुदाने रदद् करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२४ ( महसूल व वन विभाग) (अनधिकृत हस्तांतरण नियमित करणेबाबत),महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२४ (वित्त विभाग),महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२४ (महसूल व वन विभाग), महाराष्ट्र मुल्यवर्धित कर (सुधारणा व विधीग्राह्यीकरण) विधेयक, २०२४ (वित्त विभाग), महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२४ (वित्त विभाग),महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२४ (उच्च व तंत्र शिक्षण विभाग),महाराष्ट्र कारागृहे व सुधारसेवा विधेयक, २०२४ (गृह विभाग)

**संयुक्त समितीकडे प्रलंबित:** विशेष जन सुरक्षा विधेयक, २०२४ (गृह विभाग)

**विधानसभेत प्रलंबित विधेयके :** महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) (सुधारणा) विधेयक, २०२४. (महसूल व वन विभाग) (दंडाच्या कमाल मर्यादेत वाढ).

# मला जेलमध्ये टाकण्याचे प्रयत्न झाले : शिंदे

**तभा वृत्तसेवा,**
**नागपूर, दि.२१ डिसेंबर-**

महायुती सरकारच्या नागपूरमधील हिवाळी अधिवेशनाची शनिवारी अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेत बोलताना चौफ ेर फटकेबाजी केली. बीड, परभणी, नक्षलवादाच्या म ुद्द्यांसह विरोधकांनाही लक्ष्य केलं. आपल्या भाषणाची सुरुवात करतानाच त्यांनी शायरीतून ठाकरेंवर निशाणा साधला. 'तुफानों मे कश्तीया और घमंड मे बडी बडी हस्तीया डुब जाती है'. अशी शायरी सादर करत शिंदेंनी भाषणाला सुरुवात केली.



बीड, परभणीवरुन राज्यात उपस्थित झालेल्या कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नावरुन भाष्य केले. तसेच, मला महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये तुरुंगात टाकण्याचे प्रयत्न झाले, तर महाराष्ट्रात २०२५ पर्यंत सगळा नक्षलवाद संपणार असल्याचेही त्यांनी सांगितले. राज्यात कायदा सुव्यवस्था प्रश्न आहे म्हणतायत. परंतु, त्यांच्याकाळात गृहमंत्री अटकेत होता. साधू हत्याकांड झाले आणि ही मंडळी कायदा सुव्यवस्था विषयावर बोलत आहेत. महाविकास आघाडी काळात पोलीस यंत्रणेचा बेसुमार वापर करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देखील खोट्या केसमधे अडकविण्याचा प्रयत्न झाला. त्यामधे काही मंत्री देखील यात होते. मला देखील अडकविण्याचा प्रयत्न करण्यात आला, पुरावा देखील आम्ही सादर केला आहे. सत्तेचा दुरुपयोग कसा केला हे आपल्याला यावरून पहायला मिळालं, असे म्हणत एकनाथ शिंदेंनी महाविकास आघाडी सरकारमधील घडलेल्या घटनांवर भाष्य करत काही गौप्यस्फोटही केले. मला जेलमध्ये टाकण्याचे प्रयत्न झाले बीड परभणी प्रकरणात कुणालाही सोडले जाणार नाही.

मी महाविकास आघाडीत होतो, तिथ मला खोट्या गुन्ह्यात अडकवून जेलमधे टाकण्याचा प्लॅन सुरू होता, अंबादास आपल्याला माहिती आहे, किती त्रास झाला ते असा गौप्यस्फोटही एकनाथ शिंदेंनी सभागृहात केला. राज्याचे विधानसभेचे अवर म्हंजे काही गप्पा मारण्याचे ठिकाण नाही. बदलापूर घटनेचा विषय निघाला, त्यावेळी काहींजणांनी रेल्वे ट्रॅकवर जाऊन रेल्वे अडवली. आम्ही आरोपीला फाशी देतो म्हटले. मात्र, पोलिसांनी ज्यावेळी आरोपीचा एन्काऊंटर केला तेव्हा आरोपीच्या बाजूने हे लोक राहिले, असा टोला विरोधकांना लगावला. औषध खरेदीबाबत आरोप करण्यात आले, दोषींवर आम्ही योग्य कारवाई करू, असेही त्यांनी सांगितले.

### २.१३ लाख रोजगार निर्मित्ती

मागच्या अधिवेशनात श्वेतपत्रिका उद्योग विभागाची काढली होती. आमच्याकडे हिम्मत होती म्हणून निर्णय घेतला. २ लाख १३ हजार रोजगार निर्मिती राज्यात होणार आहे. राज्यात २ लाख ४३ हजार कोटीची गुंतवणूक राज्यात अली आहे. सव्वा लाख लोकांना संधी मिळाली आहे.

### २०२५ पर्यंत नक्षलवाद संपणार

मला नक्षलवाद्यांची धमकी अली होती, मी विकासाचा मुद्दा समोर ठेऊन काम करत आहे. गृहमंत्री अमित शाह यांनी दिल्लीत बैठक घेतली होती. आपल्या इकडचे नक्षलवादी छत्तीसगढला पळून जायचे आणि जंगलात लपून रहाचे. कारण, काँग्रेस सरकार त्यांना लपायला मदत करत होते. मात्र, आता २०२५ पर्यंत म हाराष्ट्रातील सगळा नक्षलवाद संपून जाणार आहे , असेही शिंदेंनी सांगितले.

# सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत आज अमरावतीत

**महानुभाव आश्रमाचा शताब्दी सोहळा**

**अमरावती, २१ डिसेंबर**

येथील कंवरनगर स्थित महानुभाव आश्रमाला १०० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने गेल्या तीन दिवसांपासून भानखेडी येथील गोविंद गुरुकुलमध्ये विशेष कार्यक्रम सुरू आहे. या विशेष कार्यक्रम ाच्या समारोपासाठी सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत रविवारी सकाळी अमरावतीत येत आहेत.



महानुभाव आश्रमाचे सध्याचे गादिश्वर मोहन महाराज कारंजेकर व रिद्धपूर येथील राजेगुरू वाईंदेशकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी तीन दिवसीय उत्सवाचा समारोप होत आहे. त्यानिमित्त धर्मसभा आयोजित करण्यात आली आहे. या धर्मसभेत आश्रम ासाठी नव्याने तयार केलेल्या प्रसाद बांधणीचा अभिषेक तसेच विविध ग्रंथ व स्मरणिकेचे प्रकाशन सरसंघचालकांच्या हस्ते केले जाणार आहे.

शासकीय यंत्रणेमार्फत प्राप्त दौरा कार्यक्रमानुसार रविवारी सकाळी ९.४५ वाजता डॉ. मोहनजी भागवत यांचे आगमन होईल. त्यानंतर सकाळी ११ वाजेपर्यंत ते भानखेडी येथील कार्यक्रमस्थळी थांबतील. तेथून निघाल्यानंतर एका खाजगी भेटीसाठी पुन्हा अमरावतीत येतील. याठिकाणी दुपारी २.५५ पर्यंत थांबल्यानंतर दुपारी ३ वाजता ते किरणनगर स्थित नरसम्मा हिरय्या महाविद्यालयात पोहोचतील. दुपारी ४.३० वाजेपर्यंत येथे थांबल्यानंतर ते विशेष वाहनाने नागपूरकडे रवाना होतील.



# छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजची विविध क्रीडा स्पर्धेत कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ डिसेंबर -**

छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजच्या खेळाडूंनी पावरलिफ्टिंग, बॉडीबिल्डिंग, बॉक्सिंग, कराटे स्पर्धेत कामगिरी केली. या खेळाडूंना प्रा. संतोष गवळी, प्रा.सचिन गायकवाड, प्रशिक्षक सोहेल शेख यांचे म ार्गदर्शन लाभले. या सर्व खेळाडूंना मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष मनोहर सपाटे, जनरल सेक्रेटरी प्रा.महेश माने, प्रा.डॉ. म धुकर पवार यांनी अभिनंदन केले.

कामगिरी : पावरलिफ्टिंग : समर्थ सदाफुले ( ५९ किलो गटात ३१५ किलो वजन उचलून द्वितीय), साक्षी आहेरवाडी (६९ किलो गटात १७० किलो वजन उचलत द्वितीय), साईप्रिया किट्टद (८० किलोवरील गटात २१५ किलो वजन उचलत तृतीय), अंजुषा सूर्यवंशी (८१ किलो गटात १३२ किलो वजन उचलत तृतीय). प्रज्ञा सर्वदेही ( ६९ किलो गटात ११० किलो वजन उचलत तृतीय), प्राजक्ता भोसले ( ४५ किलो गटात ८० किलो वजन उचलत तृतीय). बॉडीबिल्डिंग : व्यंकटेश काळे (६० किलो गटांत यांनी द्वितीय). बॉक्सिंग : चव्हाण ( प्रथम), समर्थ पोतदार (द्वितीय), श्रावणी सुपाते ( द्वितीय). कराटे : निधा शेख (द्वितीय).

# ईशान्येतील पोलिस दलाचा दृष्टिकोन बदलण्याची वेळ आली : अमित शाह

**आगरतळा, २१ डिसेंबर**

नागरिकांना वेगाने न्याय मिळावा तसेच बंडखोरी संपुष्टात आणण्यासाठी ईशान्येतील पोलिस दलाचा दृष्टिकोन बदलण्याची वेळ आली, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शनिवारी केले.

मागील दहा वर्षांत २० शांतता करार करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या क्षेत्रात शांतता आणली. या कालावधीत नऊ हजार सशस्त्र बंडखोरांनी शरणागती पत्करली, असे अमित शाह यांनी ईशान्य परिषदेच्या ७२ व्या पूर्ण अधिवेशनाला संबोधित करताना सांगितले.

मागील चार दशकांपासून येथील पोलिस ईशान्येकडील बंडखोरांसोबत लढत आहेत. बंडखोरी आता संपलेली आहे; त्यामुळे एफआयआर दाखल केल्यानंतर तीन वर्षांत नागरिकांना न्याय मिळेल, असे सुनिश्चित करण्यासाठी पोलिसांचा दृष्टिकोन बदलण्याची गरज निर्माण झाली आहे, असे शाह



म्हणाले. केंद्र सरकारने रेल्वे जोडणीसाठी ८१ हजार कोटी आणि रस्त्यांचे जाळे विणण्यासाठी ४१ हजार कोटी रुपयांचा निधी ईशान्येतील राज्यांना दिला आहे. या क्षेत्राला चालना देण्यासाठी केंद्राने यापूर्वी नॅशनल ऑरगॅनिक कॉर्पोरेशन लिमिटेडची स्थापना केली आहे. मी ईशान्येकडील सर्व मुख्यमंत्र्यांना सेंद्रिय उत्पादनांच्या पॅकेजिंग, विपणन आणि निर्यातीसाठी एनओसीएलसोबत करार करावा, असे आवाहन अमित शाह यांनी केले.

# डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांना 'नीलिमाराणी साहित्य सन्मान'

**५ जानेवारीला पुरस्कार वितरण**

**नवी दिल्ली, २१ डिसेंबर**

ओडिशाच्या भुवनेश्वर येथील कादंबिनी साहित्य अकादमीच्या वतीने देण्यात येणाऱ्या प्रतिष्ठित 'नीलिमाराणी साहित्य सन्मान २०२५'ची घोषणा करण्यात आली. महाराष्ट्र कॅडरचे भारतीय परराष्ट्र सेवेतील निवृत्त वरिष्ठ अधिकारी, लेखक आणि साहित्यिक डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

दिल्लीतील इंडिया इंटरनॅशनल सेंटर येथे साहित्य अकादम ीतर्फे आयोजित कार्यक्रमात या पुरस्काराची घोषणा करण्यात आली. कादंबिनी साहित्य अकादमीच्या वतीने देण्यात येणारा हा पुरस्कार भारतीय साहित्य, कला आणि संस्कृतीतील उत्कृष्ट योगदानासाठी दिला जातो.



डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी परराष्ट्र सेवेत रशिया, जपान, सीरिया, मालदीव आणि अमेरिका या देशांमध्ये महत्त्वाच्या पदांवर सेवा बजावली आहे. त्यांचे साहित्यिक व सामाजिक योगदानही लक्षणीय असून, मराठी तरुणांना भारतीय प्रशासकीय सेवेकडे वळवण्यासाठी 'पुढचे पाऊल' ही चळवळ उभारण्यामध्ये त्यांचा महत्त्वाचा वाटा राहिलेला आहे. 'नीलिमाराणी साहित्य सन्म ान'अंतर्गत १० लाख रुपये रोख रक्कम, शुद्ध चांदीचे स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तिपत्र प्रदान केले जाते. यापूर्वी हा प्रतिष्ठित पुरस्कार पद्मश्री प्रो. मनोज दास, अनुराधा रॉय, प्रख्यात साहित्यिक नामिता गोखले आणि मृदुला गर्ग यांना देण्यात आला आहे. ओडिशातील सुप्रसिद्ध लेखिका डॉ. इतिराणी सामंता आणि त्यांच्या बंधू अच्युत सामंत यांच्या म ातोश्रींच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा पुरस्कार २०१९ पासून सुरू करण्यात आला आहे. अकादम ीतर्फे दरवर्षी जानेवारी महिन्याच्या पहिल्या रविवारी ओडिशात साहित्य संमेलनाचे आयोजन केले जाते. ५ जानेवारी २०२५ रोजी भुवनेश्वर येथे आयोजित संमेलनात डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती डॉ. इतिरानी सामंता यांनी दिली.

# सोलापूरच्या संध्याराणी बंडगरला लॉन टेनिस स्पर्धेत रौप्य पदक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ डिसेंबर -**

जयपूर येथे १५ ते २१ डिसेंबर या कालावधीत झालेल्या अखिल भारतीय नागरी सेवा क्रीडा स्पर्धे त महाराष्ट्राकडून खेळताना येथील संध्याराणी बंडगर यांनी लॉन टेनिस स्पर्धेत रौप्य पटकाविले.



दुहेरीत त्यांना अंतिम फेरीत मध्यप्रदेशकडून पराभव पत्करावा. बंडगर यांची निवड मुंबई येथे झालेल्या राज्य स्पर्धे तून झाली होती. सुधीर सालगुडे हे बंडगर हिचे प्रशिक्षक आहेत. बंडगर या सोलापूर येथे सामाजिक वनीकरण विभाग कार्यालयात मुख्य लेखापाल या पदावर कार्यरत आहेत.त्यांच्या या यशाबद्दल सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेचे अध्यक्ष राजेश दमाणी व महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटनेचे संयुक्त सचिव राजीव देसाई यांनी अभिनंदन केले.

# वरिष्ठ गट जिल्हा क्रिकेट निवड चाचणी मंगळवारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ डिसेंबर -**

जिल्ह्याचे वरिष्ठ गटाचे क्रिकेट संघ निवडण्यासाठी मंगळवार दिनांक २४ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता जुळे सोलापूर येथील भंडारी मैदानावर निवड चाचणी होईल.

हे संघ निवड समिती सदस्य रोहित जाधव, वासु दोरणाल, अंबादास तोरा, जावेद जमादार, दत्ता बडगु हे करणार आहेत.



इच्छुक खेळाडूंनी प्रवेश शुल्क पाचशे रुपयेसह आपापल्या किटसह, व्हाईट युनिफॉर्मवर सकाळी नऊ वाजता उपस्थित राहावे, असे सेक्रेटरी चंद्रकांत रेंबर्सू यांनी कळविले आहे.

# सलमान खान पहिल्या खो-खो वर्ल्ड कपचा ब्रँड ॲम्बेसेडर

**दिल्ली, १९ डिसेंबर-**

भारतीय मातीतील खो-खो आता कात टाकून पुढे जात आहे. खो खो फेडरेशन ऑफ इंडिया () ने पहिला वर्ल्ड कप १३ ते १९ जानेवारी या कालावधीत नवी दिल्ली येथे होणार आहे. या स्पर्धेसाठी भारतीय सुपरस्टार सलमान खान यांना ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्त केल्याची घोषणा केली आहे. ही घोषणा जवाहरलाल नेहरू स्टेडियममध्ये सुरू असलेल्या राष्ट्रीय खेळाडूंच्या प्रशिक्षण शिबिरात करण्यात आली. यावेळी खो-खो महासंघाचे अध्यक्ष श्री सुधांशू मित्तल, महासचिव एम. एस. त्यागी, तसेच भारतीय पुरुष आणि महिला संघांचे खेळाडू व प्रशिक्षक उपस्थित होते.

सलमान खान पहिल्या खो खो वर्ल्ड कपसाठी खूप उस्ताही आहे. त्यांनी या खेळाची व आपली नाळ जुळली असल्याचे सांगितले. तसेच खो-खो सारखा आपल्या मातीतील खेळ जगभर पसरत असल्याचे पाहून आपल्याला खूप आनंद झाल्याचेही सांगितले.




''मी पहिल्या खो खो वर्ल्ड कप २०२५ चा भाग आहे याचा मला अभिमान वाटतो! आपण सगळ्यांनी एकदा तरी खो खो खेळलेला असेलच त्यामुळे हि फक्त एक स्पर्धा नसून, या स्पर्धेमुळे भारताच्या मातीतील खेळाला, आत्म्याला, आणि सामर्थ्याला दिलेला सन्मान आहे'' असे सलमान खान यांनी आपल्या संदेशात सांगितले. ''हा एक चपळ खेळ असून, तो आता जगभरात लोकप्रिय होत आहे. चला, एकत्र येऊ आणि जागतिक स्तरावर खो खोचा उत्सव साजरा करू'' असे त्यांनी पुढे म्हटले.

या खो खो वर्ल्ड कपमध्ये २४ देशांचे संघ सहभागी होणार असून हि स्पर्धा नवी दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय इंडोर स्टेडियमवर होणार आहे. विविध देशांचे प्रतिनिधी येथे आले असून त्यांच्यासाठी प्रात्यक्षिक सामने आयोजित करण्यात आले होते. यामध्ये प्रमुख खेळाडू प्रतिक वाईकर, आदित्य गणपुले, रामजी काश्यप, दिलीप खांडवी, सुयश गरगटे, गौतम एम.के., सचिन भार्गव, विशाल, अरुण गुणकी, प्रियांका इंगळे, मुस्कान, मीनू, नसरीन, रेश्मा राठोड आणि निर्मला पांडे आदी खेळाडूंनी सहभाग घेतला होता.ही स्पर्धा जगभरातील प्रेक्षकांसाठी एक रोमांचक अनुभव ठरणार आहे. भारतीय खो खो महासंघ पुरुष आणि महिला खेळाडूंना समान संधी देण्यासाठी कटिबद्ध आहे आणि त्यामुळे दोन्ही गटांसाठी समान व्यासपीठ तयार केले आहे.भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनने अधिकृतपणे खो खो फेडरेशन ऑफ इंडियाच्या या खो वर्ल्ड कपला पूर्ण पाठिंबा दिला आहे.खो खो महासंघाचे अध्यक्ष श्री सुधांशू मित्तल यांनी सलमान खान यांचे आभार मानले आणि सांगितले की त्यांच्या उपस्थितीमुळे वर्ल्ड कपकडे सर्वांचे लक्ष वेधले जाईल. ''सलमान खान यांनी आपल्या व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून मातीच्या या खेळासाठी दिलेला वेळ कौतुकास्पद आहे. त्यांचा खेळाकडे पाहण्याचा उत्साह प्रेरणादायी आहे आणि त्यांच्या सहभागामुळे संपूर्ण देश वर्ल्ड कपकडे आकर्षित होईल याची आम्हाला खात्री आहे,'' असे त्यांनी सांगितले.



# कठोर परिश्रमास पर्याय नाही : डॉ.आश्विन बोंदार्डे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ डिसेंबर-**

गणित हा जीवनाचा आधार असून,शिक्षणातील आव्हाने ओळखून स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी सज्ज राहिले पाहिजे. कठोर परिश्रमास पर्याय नाही. असे प्रतिपादन कस्तुरबाई शिक्षणशास्त्र महाविद्यालय सोलापूरचे प्राचार्य डॉ. आश्विन बोंदार्डे यांनी संभाजीराव शिंदे महिला म हाविद्यालयात राष्ट्रीय गणित दिन साजरा करताना केले.

संभाजीराव शिंदे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय सोलापूरच्यावतीने थोर गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांची जयंती राष्ट्रीय गणित दिन म्हणून साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे आधारवड स्व. विष्णुपंत (तात्यासाहेब) कोठे व थोर गणिती श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमापूजनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. प्रशांत चाबुकस्वार यांनी केले. डॉ. आश्विन बोंदार्डे यांनी राम ानुजन यांची माहिती व गणिताचे दैनंदिन जीवनातील स्थान विशद केले.

सूत्रसंचालन प्रा. स्मिता जन्नू यांनी केले तर आभार प्रा. ज्ञानेश्वर कांबळे यांनी मानले. यानिमित्ताने विद्यार्थीनींनी गणित साहित्य तयार करून त्याचे प्रदर्शन भरवले होते.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | रविवार, २२ डिसेंबर २०२४
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# बांगलादेशातील तीन मंदिरांवर पुन्हा हल्ले

### आठ मूर्तींची तोडफोड

**ढाका, २१ डिसेंबर**

बांगलादेशातील मंदिरांना पुन्हा एकदा लक्ष्य करण्यात आले. दोन दिवसांत बांगलादेशातील मैमनसिंग आणि दिनाजपूर जिल्ह्यातील तीन मंदिरांमधील ८ मूर्तींची तोडफोड करण्यात आली आहे.

मैमनसिंगतील घटनेसंदर्भात पोलिसांनी एका व्यक्तीला अटक केली आहे, असे वृत्त डेली स्टारने दिले. हे हल्ले अल्पसंख्यक हिंदू समुदायाला लक्ष्य करणाऱ्या घटनांच्या मालिकेचा एक भाग आहेत. मैमनसिंगच्या हालुआघाट उपजिल्ह्यात गुरुवारी आणि शुक्रवारी झालेल्या वेगवेगळ्या घटनांमध्ये दोन मंदिरातील मूर्तींची तोडफोड करण्यात आली. हालुआघाट पोलिस स्थानकाचे प्रभारी अधिकारी अबुल खयेर यांनी



दिलेल्या माहितीनुसार, शाकुआई क्षेत्रातील बोंदरपारा मंदिरातील दोन मूर्तींची शुक्रवारी पहाटे तोडफोड केली. या प्रकरणी अद्याप कोणावरही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही तसेच कोणालाही अटक करण्यात आलेली नाही, असे खयेर म्हणाले.

दुसऱ्या एका घटनेत गुरुवारी पहाटे बीलदोरा क्षेत्रातील पोलाशकांडा गावातील काली मंदिरातील मूर्तीची तोडफोड केल्याचे दिसून आले. या प्रकरणी पोलिसांनी संशयित आरोपी अलाउद्दीनला अटक केली. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली, असे खयेर यांनी सांगितले. शुक्रवारी न्यायालयाने त्याची कारागृहात रवानगी केली.

दिनाजपूरच्या बीरगंज उपजिल्ह्यात मंगळवारी झारबारी शासन येथील काली मंदिरातील पाच मूर्तींची तोडफोड करण्यात आली. ही घटना गुरुवारी उघडकीस आली. या घटनेबाबत बोलताना काली मंदिर समितीचे अध्यक्ष जनार्दन रॉय यांनी सांगितले,

आम्ही येथे असे कृत्य पाहिले नाही. दरम्यान, या घटनेबाबत तपास सुरू असल्याची माहिती प्रभारी अधिकारी अब्दुल गफूर यांनी दिली.

गेल्या ऑगस्टमध्ये शेख हसीना यांना सत्तेवरून हटवल्यानंतर बांगला देशातील मंदिरे आणि मालमत्तांवरील हल्ल्यांत वाढ झाली आहे. गेल्या आठवड्यात सुनमगंज जिल्ह्यात मंदिरांची तोडफोड आणि हिंदूंची घरे आणि त्यांच्या दुकानांवर हल्ला प्रकरणी चार जणांना अटक करण्यात आली होती. (वृत्तसंस्था)

### भारत-बांगला देश संबंधात तणाव वाढला

हिंदूंवरील हल्ल्यांच्या वाढत्या घटनांवरून भारत आणि बांगलादेशमधील संबंधात तणाव वाढला आहे. भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी ढाका येथे बांगलादेशी अधिकाऱ्यांसोबत झालेल्या द्विपक्षीय बैठकीदरम्यान अल्पसंख्यकांच्या सुरक्षिततेबद्दल चिंता व्यक्त केली आहे. शेख हसीना यांना सत्तेवरून हटवल्यानंतर प्रामुख्याने हिंदूवरील अत्याचाऱ्याच्या ८८ घटना घडल्या असल्याचे बांगलादेशने कबूल केले आहे. या घटनांमुळे दोन्ही देशांमधील राजनयिक संबंधात तणाव निर्माण झाला आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी दोन दिवसांच्या कुवैत दौऱ्यावर आहेत. विमानतळावर तेथील भारतीय वंशाच्या नागरिकांनी मोदी यांचे भव्य स्वागत केले. मोदी यांनी त्यांच्याशी संवादही साधला

# केजरीवाल यांच्याविरुद्ध नवा खटला चालणार

### नायब राज्यपालांनी ईडीला दिली परवानगी

**नवी दिल्ली, २१ डिसेंबर**

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आपचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांच्या अडचणी वाढल्या आहेत. उत्पादन शुल्क घोटाळ्यात केजरीवाल यांच्याविरुद्ध आणखी एक खटला चालवण्याची परवानगी दिल्लीचे नायब राज्यपाल विनयकुमार सक्सेना यांनी अंमलबजावणी संचलनालयाला दिली आहे.

केजरीवाल यांच्याविरुद्धा असा खटला चालवण्याची परवानगी ईडीने ५ डिसेंबरला नायब राज्यपालांकडे मागितली होती. त्यानुसार नायब राज्यपालांनी अशी परवानगी दिली आहे.

दिल्ली सरकारचे उत्पादन शुल्क धोरण तयार करताना केजरीवाल यांनी साऊथ ग्रुपच्या लोकांशी



हातमिळवणी केली. या ग्रुपकडून १०० कोटी रुपयांची लाच घेतली आणि कंपनीला फायदा पोहोचेल, असे उत्पादन शुल्क धोरण तयार केले, असा आरोप ईडीने केला आहे. या कंपनीकडून लाच म्हणून मिळालेले ४५ कोटी रुपये केजरीवाल यांनी गोवा विधानसभा निवडणुकीत आपच्या प्रचारासाठी वापरले, असा आरोपही ईडीने केला आहे. विशेष म्हणजे, ईडीने या प्रकरणात आम आदमी पार्टीलाही आरोपी केले आहे. एखाद्या राजकीय पक्षाला आरोपी करण्याची देशातील ही पहिलीच घटना आहे. या प्रकरणात केजरीवाल मुख्यमंत्री म्हणून तसेच आपचे राष्ट्रीय संयोजक अशा दोन स्वरूपात दोषी आढळले. पहिल्या प्रकरणात ईडीने मुख्यमंत्री म्हणून उत्पादन शुल्क घोटाळ्यात केजरीवाल यांना अटक केली होती. जवळपास सहा महिने ते तिहार तुरुंगात होते. आता आपचे राष्ट्रीय संयोजक म्हणून केजरीवाल यांच्यावर ईडी दुसरा खटला दाखल करणार आहे. या प्रकरणातही केजरीवाल यांना अटक होऊ शकते. तिहार तुरुंगातून जामिनावर बाहेर आल्यानंतर केजरीवाल यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देत आतिशी यांना मुख्यमंत्री केले. (तभा वृत्तसेवा)


# अनियमित कर्ज देणे न थांबल्यास १ कोटी दंड, १० वर्षे कारावास

### केंद्र सरकारचा प्रस्ताव

**नवी दिल्ली, २१ डिसेंबर**

केंद्र सरकारने एक नवीन प्रस्ताव मांडला आहे, ज्याचा उद्देश्य अनियमित कर्ज देणे थांबविण्याचा आहे. या प्रस्तावानुसार, उल्लंघन करणाऱ्यांना १ कोटी रुपयांचा दंड आणि १० वर्षांचा कारावास होऊ शकतो.

गेल्या दोन वर्षांत अनियंत्रित कर्ज देण्याच्या पद्धतींमध्ये गुंतलेल्या अनेक डिजिटल कर्ज ॲप्सवर कारवाई आणि त्यांच्या अनैतिक कर्ज आणि आक्रमक वसुली पद्धतींबद्दलच्या अनेक तक्रारींना प्रतिसाद म्हणून सरकारने असा प्रस्ताव दिला आहे. या प्रस्तावांवरील अभिप्राय फेब्रुवारीपर्यंत स्वीकारला जाईल. सार्वजनिक सूचना आल्यानंतर प्रस्तावाचा आणखी विस्तार केला जाईल. आरबीआय किंवा इतर नियामक संस्थांच्या मंजुरीशिवाय



कोणत्याही अनधिकृत व्यक्ती आणि संस्थांना सार्वजनिक कर्जात सहभागी होण्यापासून रोखणे हा विधेयकाचा मुख्य उद्देश आहे. विधेयकानुसार, व्यक्तीने चालवलेला व्यवसाय, ज्यात नातेवाईक नसलेल्यांना व्याजदराने कर्ज देणे किंवा अग्रीम देणे समाविष्ट आहे. नातेवाईकांना दिलेली कर्जे, मग ती रोख स्वरूपात असो किंवा वस्तू स्वरूपात, या वर्गवारीतून वगळण्यास आली आहे.

अलिकडच्या वर्षांत फसव्या कर्ज अर्जांच्या प्रसाराबद्दल चिंता वाढत आहे. अनेक अहवालांनी या प्लॅटफॉर्मला कर्ज वसुलीच्या आक्रमक पद्धती, उच्च व्याजदर आणि अघोषित शुल्क यांच्याशी जोडले आहे, ज्यामुळे त्रासल्याने अनेक कर्जदारांनी आत्महत्या केली आहे. सप्टेंबर २०२२ ते ऑगस्ट २०२४ पर्यंत गुगलने आपल्या प्लेस्टोअर वरून २,२०० हून अधिक ॲप काढून टाकले आहेत. याशिवाय सरकारने अशा कर्ज ॲप्सपासून दूर राहण्याचा सल्लाही जाहिरातींद्वारे दिला आहे. (वृत्तसंस्था)

### मंत्री व त्यांची खाती अशी

- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस - गृह , ऊर्जा , सामान्य प्रशासन विधी व न्याय आणि अन्य मंत्र्याकडे नसलेले खाती
- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे : नगर विकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम सोडून)
- उपमुख्यमंत्री अजित पवार अर्थ व नियोजन, उत्पादन शुल्क कॅबिनेट मंत्री
- चंद्रशेखर बावनकुळे - महसूल
- राधाकृष्ण विखे पाटील - जलसंधारण
- हसन मुश्रीफ - वैद्यकीय शिक्षण,
- चंद्रकांत पाटील - उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कामकाजमंत्री
- गिरीश महाजन - जलसंधारण (विदर्भ, तापी, कोकण विकास), आपत्ती व्यवस्थापन.
- गुलाबराव पाटील - पाणीपुरवठा
- गणेश नाईक - वन
- दादाजी भुसे - शालेय शिक्षण
- संजय राठोड - माती व पाणी परीक्षण
- धनंजय मुंडे - अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण
- मंगलप्रभात लोढा : कौशल्य विकास, रोजगार उद्योग व संशोधन
- उदय सामंत - उद्योग व मराठी भाषा
- जयकुमार रावल - विपणन, प्रोटोकॉल
- पंकजा मुंडे - पर्यावरण व वातावरण बदल, पशुसंवर्धन
- अतुल सावे - ओबीसी विकास, दुग्धविकास मंत्रालय
- अशोक उईके - आदिवासी विकास मंत्रालय
- शंभूराज देसाई - पर्यटन, खाण व स्वातंत्र्य सैनिक कल्याण
- आशिष शेलार - माहिती व तंत्रज्ञान
- दत्तात्रय भरणे - क्रीडा व अल्पसंख्याक विकास व औकाफ
- अदिती तटकरे - महिला व बालविकास
- शिवेंद्रराजे भोसले - सार्वजनिक बांधकाम
- माणिकराव कोकाटे - कृषी
- जयकुमार गोरे - ग्रामविकास, पंचायत राज
- नरहरी झिरवाळ - अन्न व औषध प्रशासन
- संजय सावकारे - कापड
- संजय शिरसाट - सामाजिक न्याय
- प्रताप सरनाईक - वाहतूक
- भरत गोगावले - रोजगार हमी,फलोत्पादन
- मकरंद पाटील - मदत व पुनर्वसन
- नितेश राणे - मत्स्य आणि बंदरे
- आकाश फुंडकर - कामगार
- बाबासाहेब पाटील - सहकार
- प्रकाश आबिटकर - आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री
- माधुरी मिसाळ - सामाजिक न्याय, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्रालय, वैद्यकीय शिक्षण
- आशिष जयस्वाल - अर्थ आणि नियोजन, विधी व न्याय
- मेघना बोर्डीकर - आरोग्य, कुटुंब कल्याण, पाणी पुरवठा
- इंद्रनील नाईक - उच्च-तंत्र शिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन
- योगेश कदम - गृहराज्य (शहर)
- पंकज भोयर - गृहनिर्माण, गृहराज्य (ग्रामीण)

# गुन्हे शाखा करणार धक्काबुक्की प्रकरणाची चौकशी

### राहुल गांधींच्या अडचणीत वाढ

**नवी दिल्ली, २१ डिसेंबर**

संसदभवन परिसरात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भाजपा खासदारांना केलेल्या धक्काबुक्कीची चौकशी आता दिल्ली पोलिसांची गुन्हे अन्वेषण शाखा करणार आहे.



गुरुवारी संसदभवनात राहुल गांधी आणि अन्य काँग्रेस खासदारांनी केलेल्या धक्काबुक्कीत प्रतापचंद्र सारंगी आणि मुकेश राजपूत हे दोन भाजपा खासदार जखमी झाले होते. या दोघांना डॉ. राममनोहर लोहिया रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. भाजपा खासदार अनुराग ठाकूर आणि बांसुरी स्वराज यांनी या प्रकरणी संसदमार्ग पोलिस ठाण्यात राहुल गांधी यांच्याविरुद्ध तक्रार दाखल केली होती. त्यानुसार पोलिसांनी राहुल गांधी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. दिल्ली पोलिसांनी हे प्रकरण संसदमार्ग पोलिस ठाण्यातून गुन्हे अन्वेषण शाखेकडे सोपवले आहे. भाजपाने राहुल गांधी यांच्याविरुद्ध हत्येच्या प्रयत्नाची तक्रारही केली होती. मात्र, पोलिसांनी हे कलम वगळून अन्य सहा गंभीर कलमांखाली राहुल गांधी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

भाजपाने राहुल गांधी यांच्याविरुद्ध तक्रार दाखल केल्यानंतर काँग्रेसनेही भाजपा नेत्यांविरुद्ध तक्रार दाखल केली. पोलिस काँग्रेसच्या तक्रारींची कायदेशीर वैधता तपासत आहे. चाणक्यपुरीस्थित गुन्हे अन्वेषण शाखेची सात सदस्यीय चमू या प्रकरणाची चौकशी करणार आहे. या चमूत दोन सहायक पोलिस आयक्त, दोन पोलिस निरीक्षक आणि तीन पोलिस उपनिरीक्षक यांचा समावेश आहे. पोलिस उपायुक्तांच्या मार्गदर्शनात ही विशेष चमू काम करणार आहे. पोलिस आधी जखमी भाजपा खासदार सारंगी आणि राजपूत यांचे बयाण नोंदवून घेतील, त्यानंतर राहुल गांधी यांना समन्स पाठवून चौकशीला बोलावले जाणार असल्याचे समजते. या प्रकरणात राहुल गांधींना अटक होण्याची शक्यता आहे. (तभा वृत्तसेवा)



उत्तरप्रदेशच्या प्रयागराज येथे पुढील वर्षी होणाऱ्या महाकुंभ मेळ्यासाठी देश-विदेशातून साधू येथे दाखल होण्यास सुरुवात झाली आहे. शनिवारी श्री पंचायती आखाड्याच्या साधूंचे येथे आगमन झाले

# मणिपुरात शस्त्रास्त्र, दारुगोळा जप्त

**इम्फाळ, २१ डिसेंबर**

मणिपूर पोलिसांनी वेगवेगळ्या कारवायांमध्ये प्रतिबंधित संघटनेच्या तीन बंडखोरांना अटक करून त्यांच्या ताब्यातून शस्त्रास्त्रे आणि दारुगोळा जप्त केला. या कारवाया चुराचांदपूर आणि पश्चिम इम्फाळ जिल्ह्यात केल्या, अशी माहिती अधिकाऱ्यांनी शनिवारी दिली. खंडणी वसुलीत गुंतलेल्या कांग्लेईपाक कम्युनिस्ट पार्टीच्या (पीपल्स वॉर ग्रुप) सदस्यांना अटक करण्यात आली. सुरक्षा दलांनी चुराचांदपूर जिल्ह्यातील लामझेंग गावातून दोघांना अटक केली. त्यांच्या ताब्यातून पिस्तूल, मशिनगन, रायफल, काडतुसे आणि नोंदणी न केलेली मोटारसायकल जप्त करण्यात आली, असे पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. (वृत्तसंस्था)

# आगीत होरपळून कुटुंबातील चार जणांचा मृत्यू

**देवास** : मध्यप्रदेशच्या देवास जिल्ह्यातील एका मिल्क पार्लर-कम-हाऊसला शनिवारी पहाटे लागलेल्या आगीत कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाला. सकाळी ४.४५ च्या सुमारास नयापुरा परिसरात ही घटना घडली. यात पीडित जोडपे आणि त्यांची दोन मुले यांचा गुदमरून आणि भाजल्याने मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, पीडिताच्या इमारतीच्या तळमजल्यावर एक डेअरी आहे आणि तो दुसऱ्या मजल्यावर कुटुंबासमवेत राहत होता. अग्निशमन दलाच्या पथकाने आग आटोक्यात आणली, असे अधिकाऱ्याने सांगितले.

# कृत्रिम सूर्य करणार वीजपुरवठा!

### कॉमनवेल्थ फ्युजन सिस्टम्स स्टार्टअपची घोषणा

**वॉशिंग्टन, २१ डिसेंबर**

जगातील अनेक देश सध्या कृत्रिम सूर्य बनवण्याच्या कामात गुंतले आहेत. अमेरिकेतही असा कृत्रिम सूर्य बनवला जात आहे. हा कृत्रिम सूर्य म्हणजे 'न्युक्लिअर फ्युजन'ची क्रिया करणारे 'टोकामॅक' नावाचे विशाल यंत्र. सर्व काही सुरळीत झाले तर अमेरिकेतील व्हर्जिनिया २०३० च्या सुरुवातीला जगातील पहिला ग्रीड-स्केल न्यूक्लिअर फ्यूजन पॉवर प्लँट स्थापित करेल. हे संयंत्र भविष्यातील स्वच्छ ऊर्जेच्या वापराला नवी दिशा देईल आणि पर्यावरणाला कोणत्याही प्रकारची हानी न पोहोचवता विजेचे उत्पादन करील.

गेल्या मंगळवारी 'कॉमनवेल्थ फ्युजन सिस्टिम्स' (सीएफएस) या स्टार्टअपने याबाबतची घोषणा केली. 'सीएफएस' ही सर्वांत मोठ्या आणि सर्वांत चर्चित न्युक्लिअर फ्युजन कंपन्यांपैकी एक आहे. क्लीन एनर्जीबाबतचा हा प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी ही कंपनी अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक करणार आहे. हा प्रकल्प सुरू झाल्यावर तो ग्रीडशी जोडण्यास सक्षम होईल आणि ४०० मेगावॅटच्या विजेची निर्मिती करील. कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी बॉब मुमगार्ड यांच्या माहितीनुसार, सुमारे दीड लाख घरांना वीजपुरवठा करू शकेल इतकी ही वीज आहे. ग्रीडच्या स्तरावरील वीज फ्युजन पॉवरमधून उपलब्ध करण्याची ही जगातील पहिलीच वेळ असेल. व्हर्जिनियाचे गव्हर्नर ग्लेन यंगकिन यांनी या घोषणेचे स्वागत केले आहे. हा व्हर्जिनियासाठीच नव्हे, तर संपूर्ण जगासाठी एक ऐतिहासिक क्षण असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. हे संयंत्र अणू संलयनाच्या व्यावसायिकीकरणाच्या क्षेत्रातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. सूर्य व अन्य तत्सम ताऱ्यांना न्युक्लियर क्रियेतूनच ऊर्जा मिळत असते. 'सीएफएस'ने म्हटले आहे की, संलयनमध्ये रातोरात काही होत नाही. २०१८ 'एमआयटी'शी वेगळे होऊन बनलेल्या या स्टार्टअपने आतापर्यंत दोन अब्ज डॉलर्स यात गुंतवले आहेत. हा प्रकल्प वेगाने प्रगती करीत असल्याचेही कंपनीने म्हटले आहे.

**स्वच्छ ऊर्जेसाठी न्युक्लिअर फ्युजनचा पर्याय**

सध्या जगाला स्वच्छ आणि मोठ्या प्रमाणातील ऊर्जेच्या स्रोताची गरज आहे. असा स्रोत जीवाश्म इंधनाला पर्याय ठरू शकेल. न्युक्लिअर फ्युजनचे तंत्र त्यासाठी एक चांगला पर्याय आहे. यात अणुंच्या फ्युजनच्या माध्यमातून ऊर्जानिर्मिती केली जाते. यासाठी हायड्रोजनचा वापर केला जातो. या प्रक्रियेसाठी 'टोकामॅक' नावाच्या डोनट किंवा आपल्या मेंदुवड्यासारख्या दिसणाऱ्या मोठ्या आकाराच्या मशिनचा वापर केला जातो. अशी संलयन ऊर्जा अमर्यादित असून, ती पर्यावरणाला कोणतीही हानी पोहोचवत नाही. सध्या वापरल्या जात असलेल्या विखंडन तंत्राप्रमाणे किरणोत्सारी कचराही सोडत नाही. अर्थात् न्युक्लिअर फ्युजनद्वारे वीज मिळवून तिचा वाणिज्यिक वापर करणे हे आव्हानात्मक आहे. (वृत्तसंस्था)

# इस्त्रो-ईएसएचा मानवी अंतराळ मोहिमेसाठी करार

**बंगळुरू, २१ डिसेंबर**

मानवी अंतराळ मोहिमेसाठी अंतराळवीरांना प्रक्षिण आणि संशोधन प्रयोगांशी संबंधित क्रियांवरील सहकार्यासाठी युरोपियन स्पेस एजन्सीसोबत (ईएसए) करार केला, अशी माहिती इस्रोने शनिवारी दिली. या करारावर इस्रोचे अध्यक्ष व अंतराळ विभागाचे सचिव डॉ. एस. सोमनाथ आणि ईएसएचे महासंचालक डॉ. जोसेफ ॲशबॅकर यांनी स्वाक्षरी केली.

हा करार मानवी अंतराळ संशोधन विशेषतः अंतराळवीर प्रशिक्षण, प्रयोग विकास आणि एकत्रीकरणासाठी समर्थन, आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरील ईएसए सुविधांचा वापर, मानवी आणि जैववैद्यकीय संशोधन प्रयोग अंमलबजावणी यासारख्या क्षेत्रांमध्ये सहकारी क्रियांसाठी एक चौकट प्रदान करतो, असे इस्रोने निवेदनात म्हटले आहे. इस्रोचे गगनयात्री आणि ईएसएचे अंतराळवीर चालक दल सदस्यांचा समावेश असलेल्या आगामी ॲक्सिओम-४ मोहिमेसाठी दोन्ही अंतराळ संस्था ठरवलेले प्रयोगांसाठी सहयोग करीत आहेत, असे त्यात म्हटले आहे. पुढे ईएसएच्या मानवी शारीरिक अभ्यासात सहभाग, तंत्रज्ञान प्रात्यक्षिक प्रयोग तसेच संयुक्त शैक्षणिक क्रियांचाही पाठपुरावा केला जाणार आहे.

## राज्यातील २३ प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या...

**नागपूर, २१ डिसेंबर**

विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन संपल्यानंतर खातेवाटपाची चर्चा असतानाच शनिवारी २३ प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या. बदल्यांमध्ये काही अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे. अमरावती विभागातील उपायुक्त (सामान्य) संजय पवार यांना पदोन्नती देत चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली. बाबासाहेब बेलदार यांची छत्रपती संभाजीनगर येथे अतिरिक्त विभागीय आयुक्तपदी नियुक्ती झाली आहे. अण्णासाहेब चव्हाण यांची रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या सीईओ पदी तर महेश आवाड यांची हाफकीन बायोफार्मा कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती झाली आहे. वाशीम येथील जिल्हा जात वैधता समितीचे अध्यक्ष लक्ष्मण भिका राऊत यांची मुंबईत बालहक्क संरक्षण आयोगाच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली.

## न्या. मदन लोकूर युनोच्या न्याय परिषदेचे अध्यक्ष...

**नवी दिल्ली, २१ डिसेंबर**

सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्या. मदन बी. लोकूर यांची नियुक्ती संयुक्त राष्ट्रसंघाच्या अंतर्गत असलेल्या न्याय परिषदेच्या अध्यक्षपदी करण्यात आली.

१२ नोव्हेंबर २०२८ पर्यंत या पदावर त्यांचा कार्यकाळ राहणार आहे. सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती या परिषदेचे प्रमुख असतील, ज्यात इतर प्रतिष्ठित कायदेतज्ज्ञांचा समावेश असेल, असे संयुक्त राष्ट्राचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी न्या. लोकूर यांच्यासोबत संवाद साधताना सांगितले.

नोंद

# एक देश, एक निवडणूक अतार्किक, की...

**शंतनु चिंचाळकर**

निवडणुकांमध्ये वापरली जाणारी शासकीय यंत्रणा आणि श्रमशक्ती हा देखील चिंतेचा विषय आहे. देशातील सर्व निवडणुका एकाच दिवशी किंवा विशिष्ट कालमर्यादित घेण्याचा सरकारचा विचार आहे. यासंदर्भातील विधेयकांचे मसुदे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजूर केले आहेत. त्याद्वारे दर पाच वर्षांनी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीबरोबरच सर्व २८ राज्यांच्या आणि आठ केंद्रशासित प्रदेशांच्या विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेणे हा सर्वांत उल्लेखनीय प्रस्ताव आहे. संसदीय पॅनेलच्या चर्चेत विचारविनिमय केलेल्या अंदाजानुसार लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकांसाठी भारतीय निवडणूक आयोगाला ४,५०० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च येतो. हा केवळ सरकारी खर्चाचा आकडा आहे. राजकीय पक्ष आणि उमेदवारांनी केलेला घोषित आणि अघोषित खर्च इतकाच असू शकतो. एकाच वेळी निवडणुका घेतल्याने दीर्घकाळात खर्च कमी होईल आणि विविध निवडणुकांमुळे देशाचे वेगवेगळे भाग बराच काळ आदर्श आचारसंहितेच्या कक्षेत राहणार नाहीत, असे सरकारचे मत आहे.

संसदीय स्थायी समितीने लोकसभा आणि राज्य विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याची शिफारस केली आहे. विधानसभा निवडणूक तारखेपासून सहा महिने ते एक वर्षाच्या कालावधीपूर्वी किंवा नंतर संपलेल्या सर्व राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुका एकत्र घेतल्या जाऊ शकतात. संसदीय पॅनेलच्या मतानुसार त्यासाठी काही विधानसभांचा कार्यकाळ कमी करावा लागेल, तर उर्वरित निवडणुका एकाच वेळी घेण्यासाठी वाढवता येतील. भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीवकुमार यांनी आयोग कायदेशीर तरतुदींनुसार निवडणुका घेण्यास तयार असल्याचे यापूर्वीच स्पष्ट केले आहे. याबाबत अभ्यास समितीने अहवाल सादर केल्यावर सार्वजनिक क्षेत्रात आणि संसदेत विस्तृत चर्चा केली जाईल आणि त्याद्वारे सर्व शक्यता आणि अडचणींचा अभ्यास होईल. 'वन नेशन, वन इलेक्शन' हा उपक्रम पुढे नेण्यासाठी केंद्र सरकारने राज्यघटनेत दुरुस्ती करण्यासाठी विधेयक मांडले आहे. समितीच्या अहवालानुसार प्रस्तावित घटनादुरुस्ती विधेयक लोकसभा आणि राज्य विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याच्या तरतुदीशी संबंधित आहे. याद्वारे लोकसभा आणि राज्य विधानसभेच्या कार्यकाळाच्या समाप्तीशी संबंधित कलम ८२ मध्ये उप-कलम (२) समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. कलम ८३ (२) मध्ये सुधारणा करून 'एकाच वेळी निवडणुका' या शब्दांचा समावेश करण्याशी संबंधित तरतुदी केल्या आहेत. या विधेयकाला किमान ५० टक्के राज्यांच्या मंजुरीची गरज असणार नाही, असे शिफारशींमध्ये म्हटले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगांशी सल्लामसलत करून निवडणूक आयोगाकडून मतदार याद्या तयार करण्यासंबंधी घटनात्मक तरतुदींमध्ये सुधारणा करण्याचाही प्रयत्न केला जाईल. विधानसभेसह केंद्रशासित प्रदेशांशी (पुद्दुचेरी, दिल्ली, जम्मू आणि काश्मीर) संबंधित तीन कायद्यांच्या तरतुदींमध्ये सुधारणा केली जाईल; जेणेकरून या सभागृहांचा कार्यकाळ इतर विधानसभा आणि लोकसभांशी जोडला जाऊ शकतो. सुधारणा करण्याचा प्रस्ताव असणाऱ्या कायद्यांमध्ये गव्हर्न्मेंट ऑफ नॅशनल कॅपिटल टेरिटरी ऑफ दिल्ली ॲक्ट, १९९१, केंद्रशासित प्रदेश सरकार कायदा, १९६३ आणि जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना कायदा, २०१९ यांचा समावेश आहे. या प्रस्तावित विधेयकाला राज्यघटनेत बदल करण्याची आणि राज्यांच्या मान्यतेची गरज नाही. घटनात्मकदृष्ट्या ईसी



**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने संसदेच्या सभागृहात अलिकडेच 'एक देश, एक निवडणूक' विधेयक मांडले. दर चार-सहा महिन्यांनी ठरावीक विधानसभा तसेच इतर निवडणुका पार पडत असल्याने होणारी जनतेच्या पैशाची उधळपट्टी थांबवण्याच्या दृष्टीने तसेच आचारसंहितेचा फास कमी होण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. मात्र त्याचे अनेक पदर संसदेतील चर्चेनंतर समोर आले.**

(राष्ट्रीय निवडणूक आयोग) आणि एसईसी (राज्य निवडणूक आयोग) या स्वतंत्र संस्था आहेत. निवडणूक आयोगाकडून राष्ट्रपती, उपाध्यक्ष, लोकसभा, राज्यसभा, राज्य विधानसभा आणि राज्य विधान परिषदेच्या निवडणुका घेण्यात येतात. राज्य निवडणूक आयोगाला नगरपालिका आणि पंचायतीसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचा अधिकार आहे. या विधेयकामध्ये नवीन कलम ३२४ जोडून लोकसभा आणि राज्य विधानसभा तसेच नगरपालिका आणि पंचायतींच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याची तरतूद केली गेली आहे.

सत्ताधारी भाजपा आणि त्यांचे जनता दल युनायटेड, टीडीपी, शिवसेना असे मित्र पक्ष एकाच वेळी निवडणुका घेण्याचा प्रयत्न करत असताना काँग्रेससह एसपी, एएपी, सीपीएम, एआयएमआयएम, उद्धव ठाकरे गट यासारख्या विरोधी पक्षांनी या कल्पनेला विरोध केला आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने या प्रस्तावाद्वारे मोदी 'वन नेशन, नो इलेक्शन' या ध्येयाप्रत वाटचाल करत आहे, असे म्हणत खिल्ली उडवली आहे. एकाच वेळी निवडणुका घेणे लोकशाहीमध्ये व्यावहारिक नाही आणि वास्तविक मुद्द्यांवरून लक्ष वळवण्यासाठी ते आणले गेले आहे, या कारणावरून ते अमान्य केले. विरोधकांच्या मते निवडणुकांवेळी पुढे येणाऱ्या प्रश्नांना उत्तरे मिळत नाहीत, तेव्हा खऱ्या मुद्द्यांवरून लक्ष हटवण्यासाठी असे विषय पुढे आणले जातात. केंद्र सरकार लोकांचे मन मूलभूत मुद्द्यांपासून विचलित करण्याचा आणि संघराज्य रचनेचा आत्मा चिरडण्याचा प्रयत्न करत आहे. भारतातील अनेक प्रादेशिक पक्षांसाठी हे नुकसानकारक ठरेल आणि अविश्वास प्रस्ताव मांडण्याची तरतूद रद्द करावी लागेल, या शक्यता व्यक्त करून अनेक विरोधी पक्षांनी या योजनेला जोरदार विरोध केला आहे. या हालचाली अध्यक्षीय सरकारच्या दिशेने वाटचाल करण्याचा एक भाग असल्याची भीती त्यांनी व्यक्त केली आहे. अशा निर्णयाद्वारे सरकार जनतेप्रति असलेली आपली जबाबदारी झटकण्याच्या प्रयत्नात आहे असेही विरोधी पक्षांनी म्हटले आहे.

विरोधकांच्या मते, अविश्वासदर्शक ठराव मंजूर होऊन सरकार पडल्यास केंद्र सरकार राष्ट्रपती राजवट आणणार का आणि पुढील निवडणुकीपर्यंत केंद्र सरकार राज्यपालांच्या माध्यमातून सरकार चालवणार का, हे प्रश्न अनुत्तरित आहेत. त्याबाबत केंद्राकडून स्पष्टीकरण मिळणे गरजेचे आहे. समाजवादी पक्षाने एकाच वेळी मतदानाच्या हालचालीला पाठिंबा दिला परंतु या विषयावर सर्वपक्षीय चर्चा होण्याची मागणी केली. राष्ट्रीय जनता दलाचे खासदार मनोज झा म्हणाले की, देशात नेहमीच 'एक राष्ट्र, एक निवडणूक' पद्धत अमलात होती. १९६२ नंतर एकलपक्षीय वर्चस्व संपुष्टात आल्याने आणि अनेक प्रादेशिक पक्षांनी राज्यांमध्ये सरकार स्थापन केल्यामुळे ही व्यवस्था खंडित झाली. यापूर्वी केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन् यांनी आरोप केला होता की एक देश, एक निवडणूक ही संकल्पना भारताची संघराज्य संरचना कमकुवत करण्याचा तसेच केंद्र सरकारला याबाबतचे पूर्ण अधिकार प्रदान करण्याचा हा छुपा अजेंडा आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपाला संविधान बदलण्याच्या प्रयत्नातून आरोपांमुळे काही धक्क्यांचा सामना करावा लागला. त्यातून या पक्षाने कोणताही धडा घेतलेला नाही तसेच संघ परिवार भारताच्या निवडणुकीच्या राजकारणाला अध्यक्षीय पद्धतीकडे नेण्याचा छुपा प्रयत्न करत आहे. भारतीय संसदीय लोकशाहीचे वैविध्यपूर्ण स्वरूप नष्ट करण्यासाठी एक देश, एक निवडणूक ही घोषणा तयार करण्यात आली आहे, असे पिनाराई विजयन् म्हणाले होते.

भारतातील प्रत्येक राज्याची स्वतःची विशिष्ट परिस्थिती आणि पृष्ठभूमी आहे. या मतभेदांकडे दुर्लक्ष केल्याने आणि राज्यांमध्ये उद्भवणाऱ्या राजकीय समस्यांचा विचार न करता यांत्रिक पद्धतीने निवडणुका घेतल्याने एक तर सक्तीची केंद्रीय सत्ता येईल किंवा लोकांचा जनादेश कमी होईल आणि शेवटी लोकशाहीचा नाश होईल, ही भीती विरोधकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. एक देश, एक निवडणूक हा निर्णय देशासाठी एका अर्थाने फायदेशीर असेल, असे अभ्यासकांनी म्हटले आहे. मात्र यामुळे स्थानिक पातळीवरचे पक्ष आणि मुद्दे बाजूला पडतील. मात्र, तरीही एकत्र निवडणुका घ्यायच्या असल्यास संविधानात बदल करावा लागेल. सर्वप्रथम या कायद्याकडे 'थ्री एम आणि वन डी' या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. निवडणुकांमुळे बराच वेळ आचारसंहिता लागलेली असते. त्यामुळे धोरणात्मक निर्णय घेण्यास अडचणी येतात. परिणामी, विकास खुंटतो. एक देश, एक निवडणूक या उपक्रमाचा महत्त्वाचा फायदा म्हणजे मतदानाची टक्केवारी वाढेल. एकाच वेळी सर्व प्रमुख निवडणुकांसाठी मतदान करता येणार असल्याने मतदानाची टक्केवारी वाढण्यास मदत होईल. कुठल्याही निर्णयाचा फायदा असतो तसे नुकसानदेखील असते. त्यानुसार, या निर्णयाची अंमलबजावणी झाल्यास देशातील संघराज्य व्यवस्था धोक्यात येऊ शकते. लोकसभेसोबत इतर निवडणुका घेतल्यास स्थानिक विषयांवर होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका बाजूला पडतील. राष्ट्रीय पक्षांचा अजेंडा राबवला जाईल. स्थानिक पक्ष, राज्य पातळीवरील पक्ष दूर लोटले जातील. त्यामुळे त्याला विरोध केला जात आहे. शिवाय घटनेत बदल करण्यासाठी एकूण ३६४ खासदारांच्या मतांची गरज आहे. मात्र सत्ताधारी पक्षाकडे केवळ २९२ खासदार आहेत. त्यामुळे हे विधेयक कसे संमत होते, हे पाहणे महत्त्वाचे असेल.

श्रद्धांजली...

# अधिकारात्मक दृष्टिकोन हरपला

**पं. सुरेश तळवलकर**

झाकिरभाई गेले, यावर विश्वास बसणे कठीण आहे. त्यांना मी त्यांच्या वयाच्या पाचव्या वर्षापासून ओळखतो. प्रथम ऐकले तेव्हा त्यांचे वय अवघ्या पाच वर्षांचे होते आणि तेव्हा मी आठ वर्षांचा होतो. भेटीचा तो प्रसंग गिरगावातील एक कार्यक्रमाचा होता. त्या काळी बैठकीची अतिशय प्रसिद्ध जागा असणाऱ्या लक्ष्मीबाग भटवाडीमध्ये उस्ताद थिरकवा साहेबांच्या गुरूंची पुण्यतिथी साजरी होत असे. त्यानिमित्ताने अल्लारखा साहेब पाच वर्षांच्या झाकिरला घेऊन आले होते. पण इतक्या लहान वयातही झाकिरने असे काही वाजवले होते की, ऐकणारे मंत्रमुग्ध झाले. त्या वयातही प्रेक्षकांना, जाणकारांना आपल्याकडे खेचून घेण्याची त्यांच्यातील अफाट ताकद स्पष्ट जाणवली होती. तीच या वर्षीच्या जुलै महिन्यात ७३ व्या वर्षी सादर केलेल्या कार्यक्रमातही कमी झालेले नव्हती हे विशेष. त्यांच्या ऊर्जेत कधीच तिळमात्र फरक दिसला नव्हता. वेळेनुसार ज्ञान वृद्धिंगत होते. तसे त्यांचे ज्ञान वृद्धिंगत तर होतच राहिले परंतु, वाढत्या वयाप्रमाणे ऊर्जाशक्ती कमी होण्याचा नियम मात्र त्यांना कधीच लागू पडलेला दिसला नाही. असा हा थोर कलाकार आपल्यातून निघून गेल्याचे दुःख खूप मोठे आहे.

त्यांच्या आठवणी किती सांगाव्या...! मला भावणारी सर्वांत मोठी गोष्ट म्हणजे त्यांचे कलेतील समर्पण. इथे मी समर्पण हा शब्द अगत्याने वापरतो आहे. कारण कला मनुष्याच्या ऊर्मीतून येते. मात्र याची दुसरी आणि नकारात्मक बाजू 'मी हे करतोय' अशा अहंगंडाचीही असते. एकदा कलाकारामध्ये हा दंभ जाणवू लागला की अभिमान, गर्व आदी अनेक गोष्टी सहजी येऊ लागतात आणि कलाकार त्यात वाहवत जाऊ लागतो. मात्र झाकिरभाईंच्या व्यक्तिमत्त्वाला कधी अशा नकारात्मकतेचा साधा स्पर्शही झाला नाही. त्यामुळेच एकाअर्थी ते समर्पणात्मक आयुष्य जगले. आपल्याला मिळालेली प्रसिद्धी, पैसा, वलय यातील कशाचाही अभिनिवेश त्यांच्यामध्ये दिसला नाही. त्यांच्याकडून प्रत्येक कलाकाराने शिकावी अशीच ही गोष्ट म्हणावी लागेल. अत्युच्च पदावर गेल्यानंतरही जमिनीशी कसे जोडलेले राहता येते, हे त्यांच्याकडे बघून वेळोवेळी शिकायला मिळाले.

कलेत तर हा माणूस अत्युच्चपदी होता. एखाद्याला अचंबित करणारी गोष्ट त्यांच्या हातून इतक्या सहजतेने निघून जायची की आपल्याला ती अद्याप का बरे जमत नाहीये... असा अनेक जण विचार करत बसायचे. एकीकडे हे सगळे असतानाही त्यांच्या चेहऱ्यावर मात्र अत्यंत निरागस भाव असायचे. माझ्या मते, या साधेपणा आणि निरागसतेमध्येच त्यांच्या कलेचे मोठेपण भिजले होते. असे निरलस व्यक्तिमत्त्व शतकामध्ये क्वचितच घडते.

तबलावादनामध्ये सहा घराणी आहेत. या सगळ्यांवर झाकिरभाईंचा अधिकारात्मक दृष्टिक्षेप होता. त्यांना प्रत्येक घराण्याची मर्मस्थाने नेमकेपणाने माहिती होती आणि ती ते इतक्या ताकदीने प्रदर्शित करायचे की त्या त्या घराण्याच्या तबलावादकाला हे आपल्या घराण्यातील रचना वाजत असल्याचा सार्थ अभिमान, कुतूहल आणि त्याचबरोबर आश्चर्यही वाटायचे. हे इतके सगळे कसे काय करू शकतात? अशीच ऐकणाऱ्या जवळपास प्रत्येकाची भावना असायची. मुख्य म्हणजे आधी उल्लेख केल्याप्रमाणे प्रभुत्वाचा अभिनिवेश नसणे ही फार मोठी बाब होती. मला कायमच याचे नवल वाटत राहिलेले आहे. त्यांची प्रदीर्घ कारकीर्द पाहता असे वाटते की, तबल्याला समर्पित असणारा हा काही त्यांचा एकच जन्म नव्हता. त्यांचा मागील जन्मही तबल्यासाठीच राहिलेला असेल कारण एका जन्मात एवढे जमणे अवघड आहे. भारतीय



अभिजात संगीत परंपरेशी निगडित आहे. मात्र ती जपतानाच त्यांनी नवनवीन प्रयोगातही काही कमी ठेवले नाही. नवनिर्मितीमध्येही ते कायम अग्रेसर राहिले. जगाने दाद घ्यावी अशी नवनिर्मिती त्यांनी केली. तबला आणि इतर वाद्ये, तबला विथ मृदंग, तबला विथ वेस्टर्न ड्रम, तबला विथ गाणे, तबला विथ द्रुपद गायकी, तबला विथ कर्नाटक संगीत, तबला विथ पाश्चिमात्य संगीत असे सगळ्या प्रकारचे प्रयोग त्यांनी केले. त्यांनी केलेल्या प्रत्येक प्रयोगाची नक्कल करण्याचा मोह भल्याभल्यांना आवरला नाही. यापेक्षा एखाद्या कलाकाराच्या अभिव्यक्तीला, प्रयोगशीलतेला मिळणारी उत्तम दाद ती कोणती...! त्यांनी केलेल्या अशा बहुढंगी प्रयोगांमुळे, अफाट कामामुळे अनेक तबलावादकांचे चरितार्थ व्यवस्थित चालायला लागले. ही अतिशयोक्ती नव्हे तर वास्तव आहे. केवळ तबलावादकांचेच नव्हे तर तबल्याच्या परीघात येणारे कारागीर, संगीतकार, साथ करणारे, सोलो वादक, खुद्द झाकिरभाईंना साथ करणारे वादक अशा सर्वांमध्ये झाकिरभाई डोकावले नाहीत, असे कधी होत नाही. त्यांच्याकडून प्रेरणा घेत तबला शिकणाऱ्यांची संख्या किती मोठी असेल, हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

माझे त्यांच्याशी अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. सांगायला लागलो तर यादी कितीही मोठी होऊ शकेल. या वर्षीच्या प्रारंभी ते पत्नीसह आमच्याकडे भोजनास आले होते. त्यांच्या सहवासात गेलेले चार-पाच तास आज प्रकर्षाने आठवत आहेत. आमच्या घरातील पुढच्या पिढीला त्यांनी भरभरून आशीर्वाद दिले होते. केवळ आमच्याच कुटुंबातील कलाकारांचा नव्हे तर नव्या पिढीतील चांगले काम करणाऱ्या अनेक कलाकारांचे उल्लेख ते आपल्या बोलण्यात वेळोवेळी करत असत. तबलावादक यशवंत, योगेश समसी, अनुब्रत चटर्जी आदी कलाकारांचा उल्लेख करून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यात, प्रोत्साहन देण्यात त्यांनी कधीच काटकसर केली नाही. मुख्य म्हणजे या सगळ्यात कृत्रिमतेचा मागमूसही नसायचा. घरातील ज्येष्ठाने करावे तितक्या सहजतेने ते वादकांचे, चांगल्या कलाकारांचे कौतुक करत असत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील ही बाबही भावणारी होती.

शेवटी प्रसिद्धी मिळणे कठीण असतेच पण त्यापेक्षाही ती टिकवणे अधिक आव्हानात्मक असते. कारण ती डोक्यात जाणे अगदी स्वाभाविक आहे. ९९ टक्के लोक याला बळी पडतात. पण उरलेल्या एक टक्क्यामध्ये झाकिरभाईंचे नाव अग्रक्रमावर आहे. खाजगीतही ते वर्षभराने मोठ्या असणाऱ्या व्यक्तीच्या पायाला स्पर्श करून आशीर्वाद घ्यायचे आणि हजारोंच्या समुदायासमोर ही कृती करतानाही त्यांना कधी संकोच वाटायचा नाही. त्यांच्या या कृतीतून केवढे तरी शिकण्यासारखे आहे. मुळात कलाकाराला एवढे 'वाकता' येणे, हीच खूप मोठी बाब आहे आणि आपल्या सर्वांसाठी ही मोठी शिकवणही आहे. प्रसिद्धीच्या वलयात राहूनही वृत्तीतला साधेपणा आणि मातीतले पाय जपणारा असा माणूस आपल्यातून निघून गेला आहे. त्यांना विनम्र आदरांजली.

*(लेखक प्रख्यात तबलावादक आहेत)*

## कलेत अमरत्व मिळवलेला कलावंत : पं. संजीव अभ्यंकर

उस्ताद झाकिर हुसैन आज आपल्यामध्ये नाहीत, यावर खरे तर विश्वासच बसत नाही कारण सध्याच्या काळात ७३ हे वय जगाचा निरोप घेण्याच्या दृष्टीने खूपच लहान आहे. अर्थात झाकिरभाईंनी या वयातच १०० वर्षांचे काम करून ठेवले आहे. त्यांच्या तबलावादनामध्ये इतके मोठेपण होते. सोलो वादन आणि गायन-वाद्य व नृत्याबरोबरची साथ असो वा सर्व तालवाद्यांमधील एकत्रित वादन असो... अशा पाचही प्रकारांमध्ये वाजवण्यासाठी एक वेगळ्या पद्धतीची मानसिकता लागते. महत्त्वाचे म्हणजे ती विकसित करावी लागते. यासाठी 'स्व'मागे ठेवून वाद्याची गरज कोणती आहे ते बघावे लागते. पूरकता काय वा कोणत्या पद्धतीचे वादन अपेक्षित आहे याचा विचार करून वाद्य वाजवण्याची गरज असते. खरे सांगायचे तर बोटावर मोजता येतील, इतक्याच कलाकारांना ही बाब समजली आहे आणि झाकिरभाई हे त्यातील अग्रणी नाव आहे. त्यांची चार पिढ्यांसमोर हा आदर्श ठेवला. स्वतः मागे राहून वाद्याला देवत्व प्राप्त करून देण्याचे काम त्यांनी केले. अर्थातच हे वाटते तेवढे सोपे नाही. यासाठी अंगी विनम्रता लागते. ती त्यांच्यामध्ये ठायी ठायी भरलेली होती. त्यामुळेच वर उल्लेख केलेल्या पाचही प्रकारांत त्यांनी आपले वेगळेपण सिद्ध केले. त्यांनी सोलो तबलावादन इतक्या वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आणि जगभर नेले की पुढील अनेक तबलावादकांना मोठमोठ्या व्यासपीठांवर संधी मिळत राहिली. याचे संपूर्ण श्रेय झाकिरभाईंना जाते. वेगवेगळ्या पदार्थांमध्ये साखर सहजतेने मिसळते, अगदी त्याचप्रमाणे झाकिरभाईंचा तबला विविध पद्धतीच्या, विविध स्वभावाच्या कलावंताच्या सादरीकरणात मिसळून जायचा. प्रत्येक गायकाची गायनपद्धती वेगळी असल्यामुळे साथ करताना साथीदाराला हे भान ठेवावेच लागले. झाकिरभाईंनी ते नेमकेपणे ठेवले. जसे की, नृत्य वेगवेगळ्या पद्धतीचे असते. तेव्हा नृत्याची निकड लक्षात घेऊन त्या पद्धतीने वादन बदलावे लागते. ही निकड झाकिरभाईंनी नेमकी जाणली. म्हणूनच ते पाचही पद्धतींना पूरक न्याय देत त्यात सहज मिसळून जाऊ शकले. जगभरातील कोणत्याही संगीतप्रकाराला चारचांद लावण्याची ताकद त्यांच्या याच वैशिष्ट्यामध्ये सामावलेली होती. वैयक्तिकदृष्ट्या सांगायचे तर आमचा सहवास जवळपास ४० वर्षांचा होता. त्यांना जवळून पाहता आले, अनुभवता आले, अनेकदा भेटता आले हे मी भाग्य समजतो. त्यांच्याकडून मी खूप काही शिकू शकलो. आता त्यांच्या जाण्याने एक न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. मात्र त्यांनी कलेत अमरत्वही मिळवले आहे. येणाऱ्या काळातही तबल्याशी संबधित प्रत्येक बाबीमध्ये त्यांचेच नाव घेतले जाईल. ते चार पिढ्यांसाठी मापदंड होते आणि यापुढेही राहतील. त्यामुळेच जगातून निघून गेले असले तरी प्रत्येकाच्या मनामध्ये ते कायमच जिवंत असतील.

# रविवारची पत्रे

## नागपुरात आगळावेगळा आनंद अनुभवला पंढरीचा

मला आठवतं, समजायला लागले तेव्हापासून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या सामुदायिक प्रार्थनेसोबतच हरिपाठ म्हणायचे संस्कार माझे बाबा कर्मश्री दुर्गादास रक्षक यांनी परिवारात लावले होते. वारकरी संतांच्या मोठ्या प्रतिमा आमच्या बैठकीचा हॉल, ज्याला आम्ही देवघर, प्रार्थना मंदिर पण म्हणत असू, त्यात होत्या. त्या संत प्रतिमा बालमनातील वाईट विचारांवर वार करण्याच्या प्रेरणा देत होत्या. आमचं संयुक्त कुटुंब. वडिलांच्या सहा भावांचा परिवार म्हणून घर वाड्यासारखे, कुंभारी विटांच्या भिंती, मातीची जुडाई, लाकडाच्या मयाली, गरिबीला झाकत आमचं इंग्रजी कौलारू घर त्याच आणि लहानशा श्रीगुरुदेव किराणा भंडार त्याच घरात, त्या वास्तूचं उद्‌घाटन राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी केले होते.

वारकरी संत विचार आणि पंढरपूरचे वारकरी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे विचार माझ्या जीवन जगण्याचा प्रभाव आहे. तुकडोजी महाराजांचा गुरुकुंज आश्रमाचा परिसर जेथे माझं चौथ्या वर्गाचं शिक्षण झालं, तो परिसर जसा जीवन जगण्याची मला प्रेरणा देतो, तीच अनुभूती पंढरपूरमध्ये येणाऱ्या दिंड्या, पालख्यांच्या भाविकतेतून जाणवते. मी पहिल्यांदा विद्यार्थिदशेत पंढरपूरला वडिलांसोबत गेलो. तेव्हाच फक्त काही तास म्हणजे सकाळपासून रात्री काळोख्या मंदिरातील पांडुरंगाचं दर्शन घेतले. पण नंतर मात्र त्या गाभाऱ्यात पांडुरंग न शोधता वारीतल्या विठ्ठल-रुक्मिणीचं दर्शन मी पंढरपुरात घेत असतो. आता तर राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या शब्दांनी,

**जीवा भावानं जव मी पाहिल । माझं गावच मंदिर शोभलं ।**
**विठ्ठल रुखमींनी घरीदारी । पुंडलीकही मुले गोजरी ।**
**त्यांना सेवेचे फुल मी वाहिलं । माझं गावच मंदिर शोभलं ॥**
**हेच तीर्थक्षेत्र पंढरपूर येथील आषाढी वारीचा प्रेरणादायी दिंडी**

सोहळा नागपुरात खासदार सांस्कृतिक महोत्सवात याचि देही याचि डोळा अनुभवला. नागपूरचे खासदार आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूर येथील विश्व वारकरी महाविद्यालयाच्या भूमिपूजन समारंभात अशा आगळावेगळ्या कार्यक्रमाची भावना व्यक्त केली. त्या भावनेला संदीप कोहळे या तरुण वारकऱ्याने मनावर घेतले. दोन हजार सर्वसामान्य वारकऱ्यांना सोबत घेऊन, ताला सुरात टाळ-पखवाज- विणेचे झंकार वाजवत, वारकरी संतपरंपरा शब्दरूपाने मांडत, त्या विचारांना संतमंडळीच्या रूपात दाखवत ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकारामांच्या कालखंडात वावरताना जणू त्यांच्या तोंडूनच प्रबोधन ऐकण्याचा भास होत होता.

कलाकृतीत ऐतिहासिक घटनांना पूर्ण न्याय देणे शक्य नसते. पण नामदेव, संत जनाबाई यांच्या कार्याची दखल घेतल्याशिवाय वारकरी संप्रदायाचं मर्म मानवी मूल्य, सामाजिक मूल्य आजच्या सामाजिक जीवनाला नवदृष्टी देण्याची कमतरता राहू शकते. त्याकाळी महाराष्ट्राचे संत नामदेव महाराज पंजाबपर्यंत पोहचतात. हिंदी भाषेत अभंग लिखाण करून शीख धर्माच्या 'गुरूग्रंथसाहिब' ग्रंथात मानाच स्थान प्राप्त करतात. नामदेवांच्या अभंगाचं पंजाबच्या घराघरात पठन ही वारकरी धर्माची विचार पताका यात दाखवता आली असती.

या कलाकृतीत तरबेज कलाकार मूठभर आणि सर्वसामान्य भक्तिमार्गाने प्रत्यक्ष जीवन ज़गणारे वारकरी मोठ्या प्रमाणात असून शिस्त, गांभीर्य पाळत मानवी जीवनाच्या आनंदाचा संदेश देत होते. अनेकांचे हात, मन, मनगट, मेंदू या पंढरीच्या सोहळ्याला नागपुरात साकारताना लागले. पण एक तरुण वारकरी या सर्व मागचा खरा सूत्रधार संदीप कोहळे याचे कौतुक करणे गरजेचे आहे. नागपुरात वारकरी प्रशिक्षण विद्यापीठ निर्मिती हे संस्कार केंद्र महत्त्वाचे कार्य यांच्याकडून घडत आहे.

**ज्ञानेश्वर रक्षक**/९८२३९६६२८२

## बस प्रवाशांवर जास्तीचा बोझा लादू नका

सरकारने एसटी प्रवास भाडे कमी करण्यापेक्षा भरमसाट वाढ करीत आहे ही बाब सर्वसामान्य प्रवाशांना न झेपणारी आहे. प्रवासभाड्यात १ किंवा २ टक्के वाढ कोणीही मान्य करू शकते व सहन करू शकते. परंतु प्रवाशांना सुविधा देण्याच्या नावाखाली परिवहन महामंडळ जर १४.९५ टक्के प्रवास भाडे करीत असेल तर ही बाब सर्वसामान्यांच्या प्रती अत्यंत चिंताजनक बाब आहे. प्रवाशांना किंवा नागरिकांना सुविधा देणे हे प्रत्येक सरकारचे कर्तव्य असते. त्या पद्धतीने सरकारला नियोजन सुद्धा करावे लागते ही बाब सत्य आहे. परंतु सरकार जर अचानक १४.९५ एवढी भरमसाट वाढ करीत असेल तर असे म्हणायला हरकत नाही की सरकारने लागू केलेल्या अनेक योजनांची वसुली तर करीत नाही ना! प्रवाशांच्या सुविधांसाठी १ किंवा २ टक्के भाडेवाढ ठीक आहे. यातून महामंडळ चांगल्याप्रकारे सुविधा उपलब्ध करू शकते. त्यामुळे सरकारने व राज्य परिवहन महामंडळाने १४.९५ भाडेवाढ यावर गांभीर्याने विचार करावा. कारण सरकार जेव्हा अनेक सुविधा नागरिकांना प्रदान करतात तेव्हा त्याचा प्रथम विचार करायला हवा. एसटी महामंडळाच्या प्रवाशांना चांगल्या सुविधा देण्यासाठी नव्या वर्षात ३५०० नव्या बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल होणार आहे ही आनंदाची बाब आहे व याचे स्वागतच. कारण राज्यात प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे १४.९५ टक्के भाडेवाढ ही बाब बरोबर नाही. राज्यात एसटी महामंडळाच्या १४ हजार बसेस धावतात यात ३५०० नवीन बसेस येतील यामुळे प्रवाशांना सुविधा उपलब्ध अवश्य होईल यात नाही. परंतु प्रवास भाड्यात १४.९५ टक्के वाढ करून याचा संपूर्ण भुर्दंड प्रवाशांवर लादू नये. राज्यातील अनेक बसस्थानकांचा चेहरामोहरा बदलणार ही आनंदाची बाब आहे. परंतु सरकार जेव्हा अनेक योजना राबविते तेव्हा सरकारजवळ आपोआप पैसे येतात आणि जेव्हा प्रवाशांना सुविधा देण्याचा निर्णय सरकार घेते तेव्हा सरकार १४ .९५ टक्के भाडेवाढ करून सुविधा देण्याची गोष्ट करते हे योग्य नाही. एसटी प्रवाशांना सुविधा अवश्य द्या परंतु अवाढव्य भाडेवाढ करून नाही तर समतोल राखून. प्रवाशांना एसटी प्रवासात सवलत द्यायची सोडून सुविधांच्या नावाखाली भरमसाट वाढ करून गरीब प्रवासी, शेतकरी, सर्वसामान्यांना सरकार लुटते की काय अशी शंका सर्वसामान्यांच्या मनात निर्माण होत आहे. महामंडळाला एसटी प्रवाशांना खरोखरच सुविधा द्यायची असेल तर एखाद्या योजनेअंतर्गत द्यावी व एक किंवा दोन टक्के भाडेवाढ करून सरकारने प्रवाशांकडून मदत घ्यावी व एसटीचा आणि बसस्थानकाचा चेहरामोहरा बदलवावा.

**रमेश लांजेवार**/नागपूर

## संसदेतील राहुल गांधींचे वागणे बरे नव्हे!

'काँग्रेसची संसद भवनातील गुंडागर्दी' हा २१ डिसेंबरचा अग्रलेख वाचला. १३९ वर्षे वय असलेल्या काँग्रेस पक्षाची दुरवस्था होण्यासाठी गांधी-नेहरू परिवाराचा अहंकार, दुरभिमान, हेकटपणा, मस्तवालपणा आणि हम करे सो कायदा ही हीनवृत्ती कारणीभूत आहे. पंचावन्न वर्षे देशात एकहाती सत्ता असलेल्या काँग्रेसची अवस्था आज भीषण झाली आहे. वामपंथीयांच्या आणि अर्बन नक्षलवाद्यांच्या हातात गेलेल्या काँग्रेसला काही देशविरोधी विदेशी संस्थांची आणि उपद्रवी व्यक्तींचे आर्थिक साहाय्य मिळत असल्याचेही आरोप होत आहेत.

मुख्य म्हणजे देशातील या सर्वांत जुन्या पक्षाची अवस्था 'निर्नायकी' झाली आहे. राहुल गांधींसारख्या अपरिपक्व, बालिश इसमाकडे काँग्रेसचे सुकाणू सोपवणाऱ्या पक्षाची वाताहत होणार यात नवीन काय? देशासाठी कोणत्याही योजना, ध्येयधोरणे नसल्याने आज काँग्रेसचे नेते तात्कालिक मुद्द्यांवर गलिच्छ राजकारण करू लागले आहेत. काँग्रेसचे तोंडाळ आणि माथेफिरू प्रवक्तेही विविध प्रचारमाध्यमांवर राहुल गांधींचे माहात्म्य सांगू लागतात तेव्हा ते खरोखरच मूर्ख आहेत की नाईलाजामुळेच त्यांना हे करावे लागते आहे हेच कळत नाही.

वास्तविक काँग्रेस पक्षाला देशातील एक प्रमुख विरोधी पक्ष म्हणून जबाबदारीने काम करता आले असते. सरकारवर योग्य प्रकारे दबाव आणून जनहिताची कामेही करता आली असती. पण आपला परिवार या देशाचा अनभिषिक्त सुलतान आहे, या देशावर राज्य करण्याचा अधिकार केवळ आपल्या परिवारालाच आहे, आपण काहीही केले तरी आपल्याला कोणी काही विचारू शकत नाही आणि या देशातील तमाम लोक आपले पैदाईशी गुलाम आहेत, असे अनेक गोड गैरसमज राहुल गांधी आणि त्यांच्या परिवाराने करून घेतले आहेत. काँग्रेसमध्ये चांगल्या नेत्यांची वानवा नाही, पण गांधी-नेहरू परिवार सोडला तर अन्य कोणत्याही नावावर काँग्रेस नेत्यांमध्ये एकमत होणे अशक्य आहे. म्हणूनच परिवारातील कोणत्याही सदस्याशिवाय अन्य कोणाचेही नेतृत्व काँग्रेस स्वीकारत नाही. यामुळेच पक्षाला घरघर लागली आहे. संसदेच्या कामकाजात वारंवार गोंधळ घालून, थयथयाट करून वेळेचा अपव्यय करणे आणि नंतर संसदेत सरकारने कामकाज होऊच दिले नाही म्हणून उलट्या बोंबा मारणे, ही काँग्रेस नेत्यांची मोडस ऑपेरंडी झाली आहे. संसदेबाहेर सुद्धा काँग्रेसचे नेते रोज वेगवेगळा तमाशा करून स्वतःचेच हसे करून घेत आहेत. आश्चर्य म्हणजे देशातील काही उठवळ आणि बाजारू प्रसारमाध्यमे, बुद्धिजीवीसुद्धा काँग्रेसच्या पापात सहभागी होत आहेत. समाजात अशांतता निर्माण करण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न करत आहेत. त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करणेही गरजेचे आहे.

थोडक्यात काय तर देशासाठी काहीही करण्याची काँग्रेसच्या नेत्यांची क्षमता नाही, इच्छा नाही, नियत नाही हे त्यांनी स्वतःच सिद्ध केले आहे. देशात अराजकता, अशांतता, अव्यवस्था, मोगलाई माजवणे आणि त्यातून आपल्या सत्तेची भूक भागवून घेणे एवढेच काँग्रेसचे लक्ष्य आहे. अशा पक्षाकडून देशाला सर्वांगीण धोका निर्माण झाला आहे. म्हणूनच भारताच्या सर्वांगीण हितासाठी, विकासासाठी, सुरक्षिततेसाठी, सामाजिक आणि धार्मिक सौहार्दासाठी, राष्ट्रीय एकता आणि अखंडतेसाठी, काँग्रेसमुक्त भारत करणे हीच काळाची गरज झाली आहे.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

## झाकिर हुसैन यांची अशीही अदा..!

२००० सालची गोष्ट. गोव्याची राजधानी पणजी येथील एक प्रसंग. मुंबईच्या चतुरंग प्रतिष्ठानचा जीवनगौरव पुरस्कार भारतरत्न लता मंगेशकर यांना प्रदान करण्याचा कार्यक्रम. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी, वक्ते होते आपले भाषाप्रभू राम शेवाळकर आणि सोबत गोव्याचे तेव्हाचे मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर. राम शेवाळकरांच्या सहधर्मचारिणी विजया शेवाळकर याही विशेषत्वाने अनेक मान्यवरांसह उपस्थित होत्या. आई-बाबांना सोबत म्हणून आशुतोष व मनीषा शेवाळकर हेही तिथे होते. सोबत सारा मंगेशकर परिवारही होताच.

या सोहळ्याच्या निमित्ताने सुरुवातीला तबलानवाज, पद्मविभूषण झाकिर हुसैन यांचे तबलावादन ठरले होते. लतादीदी पोहोचत असल्याचा निरोप आला आणि वेळ जाऊ नये म्हणून झाकिर यांचे तबलावादन सुरू करण्यात आले. ते सुरू असतानाच दीदींचे आगमन झाले. त्यांना येताना पाहून झाकिरजींनी वादन करतानाच मान झुकवून त्यांना अभिवादन केले. दीदी व्यासपीठासमोरच्या पहिल्या रांगेत मध्यभागी त्यांच्या आसनावर विराजमान झाल्या. बाजूलाच राम शेवाळकर होते.

इकडे व्यासपीठावर तबलावादन सुरू होते. झाकिर हुसैन यांचा सुरू असलेला ताल संपला आणि ते उठून उभे राहिले. त्या व्यासपीठाला दोन्ही बाजूंनी उतरायला पायऱ्या होत्या. पण तिकडे न जाता त्यांनी सरळ व्यासपीठाच्या मध्यभागातूनच खाली उडी मारली. थेट लतादीदींच्या समोर जाऊन गुडघे टेकवून खाली बसले. त्यांना अभिवादन करून चरणस्पर्श केला. सोबतच पायावर आलेली साडी किंचित बाजूला केली. खिशातला रुमाल काढून झाकिरजींनी दीदींचे पाय त्या रुमालाने पुसून काढले. तो रुमाल कपाळाला लावून हळुवारपणे घडी करून पुन्हा खिशात ठेवून दिला. एक मोठ्ठी, मौल्यवान ठेव असल्यागत..!

उस्तादाचे हे अभिवादन सुरू असतानाच लता मंगेशकरही भावविभोर होणे स्वाभाविकच होते. त्यांनीही झाकिरांच्या लांब केसांमधून हात फिरवून दोन्ही हातांनी गालांना थोपटून आशीर्वाद दिला. हे सारे सुरू असताना सर्वांच्याच नकळत दीदींनी आपल्या बोटातली महागडी हिऱ्यांची अंगठी काढली आणि झाकिरांचा हात हातात घेऊन ती अलगदपणे त्यांच्या बोटात सरकवली. उस्ताद झाकिर हुसैन कृतार्थ होऊन व्यासपीठावर परतले आणि आपली सराईत बोटे पुन्हा तबल्यावर फिरवू लागले.

हा प्रसंग रामभाऊ आणि विजयाताई शेवाळकरांनी नागपूरला परतल्यानंतर ऐकवला. ऐकतानाच शहारून गेलो. तिथे प्रत्यक्ष हजर असणाऱ्यांची काय स्थिती असेल? एका कलावंताची अभिवादन करण्याची केवढी ही उत्कट, उदात्त पद्धत आणि दुसऱ्याची ते स्वीकारण्याचीही..! सारेच काही आगळेवेगळे आणि अनाकलनीय...

**अनिरुद्ध पांडे**/९८८१७१७८२९

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त




### सोलापुरात राष्ट्रीय महासंघ कपचे उद्घाटन

**सोलापूर, दि. २१ डिसेंबर-**

देशात लोप पावलेल्या पारंपरिक युद्ध कलेचे सोलापुरात राष्ट्रीय महासंघ कपचे उद्घाटन राजीव गांधी इनडोअर स्टेडियम येथे करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन सीए सुनिल इंगळे आर.एस.एस. जिल्हा संघ चालक, राजेंद्र काटवे, आर.एस.एस.शहर संघ चालक, संपदा जोशी अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ सोलापूर शहर अध्यक्षा, मणिपूरचे ग्रॅन मास्टर लाशीराम लाशामुन सिंग, महागुरू नामेई राकप्म, राजीव देशपांडे आणि आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय मान्यता प्राप्त तफिसा (ढऋखड) या जागतिक संघटनेच्या महाराष्ट्र राज्य गर्व्हनर समिती अध्यक्ष रमेश ज्ञानतारा या मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. सुरुवातीला राष्ट्रीय गीत गावून दिल्लीच्या संघाने डोळ्यांची पारणे फिटावे असे योगासनाचे प्रात्यक्षिके तसेच मणिपूर संघाने चित्तथरारक सरित सराक या युद्ध कलेचे रोमहर्षक प्रात्यक्षिके आणि राष्ट्रीय स्पर्धेच्या नियम, अटींचे प्रात्यक्षिकाने कार्यक्रमास सुरुवात झाली. प्रमुख पाहुणे राजेंद्र काटवे यांनी मार्गदर्शन केले. या खेळाला गेलो इंडिया व शालेय गेम्स मध्ये सामाविष्ट करण्याचे भरीव काम महाराष्ट्रात रमेश ज्ञानतारा यांच्या मार्गदर्शनाखाली आप्पासाहेब चिंचकर यांनी सोलापुरात मोफत कार्य सुरू आहे.

### पतीबरोबरच्या भांडणात पत्नीचा विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. २१ डिसेंबर -**

पतीबरोबरच्या भांडणात पत्नीचा विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. आयेशा रमिज जरतारघर (वय २१, रा. नविन विडी घरकुल, कुंभारी) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. २० डिसेंबर रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास राहत्या घरी नवरा बायकोमध्ये भांडण झाल्याने आयेशा यांनी रागाच्या भरात विषारी औषध प्राशन केले. त्यामुळे त्यांना त्रास होऊ लागल्यावर पती रमिज यांनी आयेशा यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.




### चालत्या ट्रॅक्टरवरून पडून तरूण जखमी

**सोलापूर, दि. २१ डिसेंबर -**

सिध्दाराम गुरुनाथ बंदीछोडे (वय २५, रा. हन्नूर, ता. अक्कलकोट) असे जखमीचे नाव आहे. २० डिसेंबर रोजी रात्री दहाच्या सुमारास धोत्री येथील गोकुळ कारखाना येथे चालत्या ट्रॅक्टरमधून तोल जाऊन खाली पडून जखमी झाल्याने सिध्दाराम बंदीछोडे यास उपचारासाठी मालक ज्ञानेश्वर मोरे यांनी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## निधन वृत्त...

### गुरुमूर्ती सद्दलगी



**सोलापूर, दि. २१ डिसेंबर -**

द्वारकानगरी येथील रहिवासी गुरुमुर्ती महारुद्रप्पा सद्दलगी (वय ८४) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. सद्दलगी हे लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियामध्ये वरिष्ठ प्रबंधक म्हणून सेवानिवृत्त झाले होते. त्यांची अंत्ययात्रा विजापूर रोड येथील द्वारकानगरी येथील राहत्या घरापासून रविवार दिनांक २२ रोजी सकाळी दहा वाजता निघणार आहे. तुळजापूरवेस येथील लिंगायत स्मशानभूमी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना नातवंडे असा परिवार आहे.

### बंडू खडतरे



**मंगळवेढा, दि. २१ डिसेंबर-**

भोसे येथील बंडू नारायण खडतरे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ते बालाजी नगर येथे श्री बालाजी शिक्षण संस्थेत शिक्षक म्हणून काम करीत होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, पत्नी, व सून असा परिवार आहे.

### मधुकर जवळेकर



**सोलापूर, दि. २१ डिसेंबर-**

वेळापूर येथील गजानन महाराज मंदिराचे पुजारी मधुकर श्रीधर जवळेकर ( वय ८५ ) यांचे शनिवारी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### जाहीर प्रसिध्दीकरण

रे. मु. नं. ८२८/२०२४
निशाणी क्र. ७

**सोलापूर येथील मे. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन सो। यांचे कोर्टात**

**श्री. सुहास शांतीनाथ बाभळे**
वय : ५३ वर्षे, धंदा - रिक्षा ड्रायव्हर
रा. शिवगंगा नगर भाग- ३, प्लॉट नं. २५६/५७,
कुमठा नाका, सोलापूर — **वादी**

विरुध्द

**कोणी नाही** - **प्रतिवादी**

सोलापूर जिल्हयातील तमाम लोकांना या जाहीर प्रसिध्दीकरणाव्दारे कळविण्यात येते की, यातील वादीची आई विमल शांतीनाथ बाभळे हे दि. ०१/०६/२००० रोजी सोलापूर येथील राहत्या घरातुन परागंदा / बेपत्ता झाली आहे. ती सिव्हील डेथ आहे असे जाहीर होवुन मिळण्यासाठी या मे. कोर्टात दावा दाखल केलेला आहे.

त्याअर्थी यातील वादी यांची आई विमल शांतीनाथ बाभळे ही मयत नाहीत असे कोणाचे म्हणणे असल्यास किंवा सदर दाव्यास कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रसिध्दीकरण झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत अथवा मे. कोर्टानी नेमलेली ता. २४/०१/२०२५ रोजी स्वतः अगर त्यांचे विधिज्ञांमार्फत ठिक सकाळी ११.०० वाजता मे. कोर्टात हजर होवुन लेखी हरकत दाखल करावी. जर मुदतीत कोणाचीही तक्रार किंवा हरकत न आल्यास सदर दाव्यास कोणाचेही, कोणतीही हरकत नाही असे समजून सदर दाव्याचा निकाल केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार हरकत चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

माझ्या सहिनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी ही जाहीर प्रसिध्दीकरण नोटीस दिली असे ता. २०/१२/२०२४

**सही/-**
**लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**हुकूमावरून**
**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधिश**
**वरिष्ठ स्तर, सोलापूर**

# कृषी पर्यटनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती

**जिल्हा पर्यटन अधिकारी अमृत नाटेकर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ डिसेंबर-**

जिल्ह्यातील विविध तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी वर्षाकाठी तब्बल ३ कोटीपर्यंत भाविकांची वर्दळ असते; यामुळे जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी शेतीला जोड व्यवसाय म्हणून कृषी पर्यटनाकडे वळावे आणि येणाऱ्या धार्मिक पर्यटनप्रेमींना धार्मिक पर्यटनाबरोबर कृषी पर्यटनाचाही आनंद द्यावा आणि यातून स्थानिक युवकांनाही रोजगार निर्मिती करावी, असे आवाहन महसूल उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा पर्यटन अधिकारी अमृत नाटेकर यांनी आज (दि. २०) केले. दरम्यान, या शेतकऱ्यांच्या पाठीशी प्रशासन कायम राहील, अशीही ग्वाही त्यांनी दिली.

मोहोळ तालुक्यातील कामती येथील सीनाई ॲग्रो टुरिझम अँड रिसॉर्ट सेंटरच्या झालेल्या शानदार उद्घाटन समारंभानंतर आयोजित 'कृषी पर्यटन विकास' या चर्चासत्रात जिल्हा पर्यटन अधिकारी नाटेकर बोलत होते. यावेळी विचार मंचावर पंढरपूर, मोहोळ तालुक्याचे प्रांताधिकारी



सचिन इथापे, मोहोळचे तहसीलदार सचिन मुळीक, जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के, प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, मोहोळचे गटविकास अधिकारी जमदाडे, अंकुश आवताडे, सीनाईचे संस्थापक लहू आवताडे, जेष्ठ समाजसेवक काशिनाथ भतगुनकी, मोहन अनपट, संभाजी गावडे आदींची उपस्थिती होती. यावेळी पंढरपूर विभागाचे प्रांताधिकारी सचिन इथापे, बीडिओ जमदाडे, काशिनाथ भतगुनकी, मोहन अनपट आदींसह इतर पाहुण्यांनी मार्गदर्शन केले. प्रारंभी सीनाईचे मालक लहू आवताडे यांनी उपस्थित पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. प्रास्ताविक लहू आवताडे यांनी केले. या कार्यक्रमास जिल्ह्यातील कृषी तज्ञ, कृषी विभागातील अधिकारी, शेतकरी, पंचायत समिती मोहोळ, पंढरपूर पंचायत समिती मधील विविध विभागातील अधिकारी, पत्रकार बांधवांची उपस्थिती होती.

### कृषी पर्यटनासाठी शासनाकडूनही प्रचार-प्रसार व्हावा

जिल्हाभरातील विविध ठिकाणी आता धार्मिक पर्यटनाबरोबर कृषी पर्यटनाचीही निर्मिती होवू लागली आहे. शासनाच्या नियमानुसार या कृषी पर्यटनाची आम्ही रचना केली आहे. यासाठी शासन स्तरावर आर्थिक मदत नाहीतर किमान प्रचार, प्रसार करण्यासाठी सहकार्य करावे. प्रशासनाकडून सोलापुरी अस्सल हुरडा, शेंगा चटणी, बोरे आदींची मार्केटिंग झाली तर आम्हीही आपल्या येथील युवावर्गाला रोजगार मिळवून देवू.

**- लहू आवताडे, संस्थापक, सीनाई ॲग्रो टुरिझम अँड रिसॉर्ट सेंटर**

### विदेशातही अस्सल सोलापुरी हुरडा क्रेज सुरू

मी अनेकदा पदरमोड करून सोलापूरचा अस्सल हुरडा, शेंगा चटणी, कडक भाकरीची आपल्या देशातच नाहीतर विविध देशातही मार्केटिंग केली आहे. आता किलोवर नाहीतर टनावर मला ऑर्डर येत आहेत. हुरडा, बाजरीची कडक भाकरी, शेंगा चटणीला मोठ्या प्रमाणात मागणी आहे. शेकडो महिलांना मी आता रोजगार देत आहे. माझे कृषी पर्यटनाचे प्रयत्न यशस्वी झाल्याने अनेक लोक माझ्या कृषी पर्यटनात सहकुटुंब येवून हुरडा पार्टीचा आस्वाद घेवू लागले आहेत. यामुळे माझ्यासह अनेकांना रोजगार निर्मिती झाली आहे.

**- काशिनाथ भतगुणकी, कृषी पर्यटन केंद्र चालक, सोलापूर**

# परदेशात जाणारे भारतीय म्हणजे आपल्या संस्कृतीचे राजदूत : आंबेकर

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. २१ डिसेंबर-**

परदेशात जाणाऱ्या भारतीयांकडे 'ब्रेन ड्रेन' म्हणून न पाहता संस्कृतीचे राजदूत म्हणून पहायला हवे. कुठेही जा पण भारतीयत्व ह्रदयात हवे. कारण संपूर्ण जगाला आता भारतीय नेतृत्वाची गरज आहे. असा विश्वास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनिल आंबेकर यांनी व्यक्त केला.

पुणे पुस्तक महोत्सवात आयोजित लिटरेचर फेस्टिव्हलमध्ये लेखक डॉ. नरेंद्र पाठक यांनी आंबेकरांशी संवाद साधला. 'आरएसएस ॲट १००' या विषयावर ते बोलत होते. त्यांनी संघ, हिंदुत्व, समाज आणि रा.स्व. संघाच्या शताब्दीनिमित्ती संवाद साधला. यावेळी राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे अध्यक्ष डॉ. मिलिंद मराठे यांनी ग्रंथभेट देऊन आंबेकरांचे स्वागत केले.

भारतीयांची बुद्धी आणि क्षमतेवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विश्वास आहे. त्यामुळे आगामी काळात केवळ संघानेच नव्हे तर समाजानेही सामाजिक परिवर्तनात सहभागी व्हायला हवे असे सांगत त्यांनी रा.स्व. संघाच्या शताब्दी वर्षाचा प्रवास उलगडला. नागरी कर्तव्य, सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण संवर्धन आणि 'स्व' जागरण या पंचपरिवर्तनाची मांडणी त्यांनी यावेळी केली. हिंदू स्वयंपूर्ण आणि सक्षम बनवत सामाजिक परिवर्तन साधण्याची कल्पना असल्याचे आंबेकरांनी सांगितले. ते म्हणाले, समाजाची स्वतःची व्यवस्था सक्रीय व्हायला हवी. शाखेच्या माध्यमातून परिसरातील उपक्रम आणि सामाजिक क्षेत्रात संघ स्वयंसेवक सहभागी होतात. संघ शताब्दी निमित्ताने शाखांचे जाळे वाढवत अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न निरंतर चालू आहे. समाजातील सर्व संघटना आणि संस्थांशी संपर्क करत सज्जनशक्तीला सामाजिक परिवर्तनात सहभागी करण्यात येत आहे. आपण जिथे आहोत. ज्या क्षेत्रात आहोत तेथून उन्नतीसाठी योगदान द्यावे,असे आवाहन त्यांनी केले.

**हिंदुत्व म्हणजे एकत्व :**

शब्दशः अर्थ घेतला घेतला तर हिंदुत्व म्हणजे एकत्व आहे. जगात प्रत्येक जण आपले वेगळेपण शोधत आहे. मात्र आपला दृष्टीकोन हा प्रत्येकात समानत्व शोधण्याचा आहे. आपण जरी वेगळे दिसत असलो तरी आतून एक आहोत. हिच भारतीय विचारांच्या एकत्वाची धारा आहे. ती संस्कृती, लोकजीवन, व्यवस्था




आणि जागतिक दृष्टीकोणातून व्यक्त होते. काळाच्या ओघात काही लोक हिंदुत्व विसरले असले तरी मागील १०० वर्षे संघ याच मेमरी रिकव्हरीचे काम करत आहे.

**मातृत्व काळात 'वर्क फ्रॉम होम'ची गरज**

शहरी जीवनात मुलांच्या संगोपनाचा प्रश्न निर्माण होतो. अशावेळी सुक्ष्म कुटुंब निर्माण होते. एकापेक्षा जास्त मुलांसाठी मानसिकता कशी निर्माण करावी, असा प्रश्न विचारले असता. सुनील आंबेकर म्हणाले, मुले किती असावीत हे त्या परिवाराने ठरविण्याचा विषय आहे. मात्र हे ठरविताना देशाची आवश्यकता आणि परिस्थितीचे भान असायला हवे. ज्या देशातील जनसंख्या असंतुलीत होते. त्या देशाचे भविष्य बदलते. जनसंख्येच्या संतुलनासाठी धोरणे आणि कायद्यांमध्ये बदल आवश्यक आहे. तसेच महिलांना गरोदरपणाच्या पगारी रजांबरोबरच काही काळ 'वर्क फ्रॉम होम' सुद्धा द्यायला हवे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाप्रमाणेच महिलांना करिअरमध्ये मल्टीपल एंट्री आणि मल्टीपल एक्झीटचा पर्याच देणे गरजेचे आहे. जेणेकरून मुलांच्या संगोपनाबद्दल भविष्यात मानसिकता बदलेल. असेही ते म्हणाले.

Classifieds

**पाहिजेत**

**सिक्युरिटी गार्ड भरती चालू आहे. महिला व पुरुष ८ व १२ तासासाठी सोलापूर शहर व ग्रामीण मध्ये**
**9850702170**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**



### राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत अहाना शेखला द्वितीय पारितोषिक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ डिसेंबर-**

आझम कॅम्पस पुणे आयोजित राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत रामवाडी येथील एपीजे अब्दुल कलाम उर्दू प्राथमिक शाळेच्या विद्यार्थिनी कु अहाना जावीद शेख याला द्वितीय क्रमांक मिळविले. दोन हजार रुपवे रोख प्रमाण पत्र स्मृती चिन्ह देऊन सन्मान करण्यात आले. मुख्यध्यापक अशफाक सातखेड यांनी मार्गदर्शन केले होते. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष महिबूब तांबोळी यांनी अभिनंदन केले.

### लाईट बिल देण्याच्या कारणावरून तरूणास खुरप्याने मारहाण

**सोलापूर, दि. २१ डिसेंबर -**

लाईट बिल देण्याच्या कारणावरू तरूणास खुरप्याने मारहाण करण्यात आली. रोहित रमेश साळुंखे (वय २७, रा. कल्याण नगर भाग ३, जुळे सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. २० डिसेंबर रोजी रात्री राहत्या घराजवळ रोहित साळुंखे यास लाईट बिल देण्याच्या कारणावरून आकाश सुभाष चव्हाण याने खुरप्याने व लाथाबुक्क्याने मारहाण केली. त्यामुळे रोहित याच्या सर्वांगास मुका मार लागून तो जखमी झाल्याने त्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डिस्ट्रीक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर शहर सोलापूर महानगरपालिका हद्दीतील बुधवार पेठ येथील घरजागा यांसी टि.पी.नं.२. फा. प्लॉट नं.४२बी, सब प्लॉट नं.५९ याचे क्षेत्र २६३.४० चौ.मी. यात तळमजला-५२.६८ चौ.मी, पहिला मजला ५२.६८ चौ.मी. असे आर.सी.सी. स्वरुपाचे १०५.३६ चौ.मी. बांधकाम आहे.

वर नमूद मिळकत ही आमचे अशिल चंद्रशेखर मोनप्पा सुतार यांनी विकत घेण्याचे ठरवून आमचे अशिल व हणमंतु मोनप्पा सुतार, विश्वनाथ सायबण्णा सुतार, मोनेश हणमंत सुतार या सर्वांनी सौ. पुष्पा बाळकृष्ण वेर्णेकर यांच्यामध्ये सदर वर नमूद मिळकतीचा खरेदीविक्रीचा व्यवहार ठरला आहे त्याप्रमाणे सदरची मिळकत आमचे अशिलांनी व इतरांनी विकत घेण्याचे ठरवून सदर मिळकतीच्या व्यवहारापोटी आमचे अशिलांनी इसारा रक्कम देऊन सदर घरजागेचे इसारा रक्कम रुपये ०९,९०,०००/- (अक्षरी रुपये नऊ लाख नव्वद हजार फक्त) असे ठरले व त्यानुसार साठेखताचे रजिस्टर दि.०४/१०/२०२४ रोज दस्त क्र.६५५० केली आहे. सदर व्यवहार आमचे अशिल व इतरसह इसारापावतीमधील ठरलेल्या शर्ती व अटी पूर्ण झाल्यानंतर खरेदी करणार आहेत. त्यामुळे सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही कायदेशीर बोजा, हक्क, हिस्सा, अधिकार, पोटगी, टाच, गहाण इत्यादी स्वरुपाचा कोणताही व्यवहार झालेला असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसाच्या आत हरकत घ्यावी व कोणताही अधिकार असल्यास कागदोपत्रानिशी खालील दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधावा व तशी लेखी हरकत नोंदवावा. मुदतीमध्ये हरकत न घेतल्यास आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचा खरेदीविक्रीचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी. कोणचीही फसवणूक होऊ नये म्हणून सदरचे खरेदीपूर्व जाहीर प्रसिध्दीकरण केले आहें याची नोंद घ्यावी.

ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली तारीख २१/१२/२०२४

**चंद्रशेखर मोनप्पा सुनील व इतर**
**सही/-**
**ॲड. श्री. जे.एस. शिंगे**
**बी.कॉम., एलएल.बी. (स्पे.)**
**जिल्हा बार असोसिएशन, सिव्हिल चौक,**
**सोलापूर मो.नं. ९४२०७८०४३४**

### बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5
आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

आज़ादी का अमृत महोत्सव

**नियम - 8 (1)**
**ताबा सूचना**

तर, अधोस्वाक्षरी केलेले हे बँक ऑफ महाराष्ट्रचे सिक्युरिटायझेशन आणि फायनान्शिअल रिकन्ट्रक्शन अंतर्गत अधिकृत अधिकारी आहेत. मालमत्ता आणि सुरक्षा व्याजाची अंमलबजावणी कायदा, 2002 आणि कलमाच्या उप-कलम (12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, 2002 च्या नियम 3 सह 13 वाचले, 01/10/202४ रोजी डिमांड नोटीस जारी करून खालील गोष्टींना आवाहन केले. नोटीस मिळाल्यापासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकीची परतफेड करण्याचा उल्लेख कर्जदार आणि जामीनदारांनी केला आहे.

कर्जदाराची रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यास, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला नोटीस दिली जाते की खाली स्वाक्षरीने त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे 17/12/2024 रोजी सुरक्षा व्याज अंमलबजावणी नियम, 2002 च्या नियम ८ सह वाचलेल्या अधिनियमाच्या कलम 13 च्या उप कलम (4) अंतर्गत

विशेषत: कर्जदाराला आणि सामान्यत: जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्ता आणि यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये. येथे नमूद केलेल्या रकमेसाठी मालमत्ता बँक ऑफ महाराष्ट्रच्या शुल्काच्या अधीन असतील.

कर्जदाराचे लक्ष सुरक्षित मालमत्ता कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, पूर्तता करण्यासाठी आमंत्रित केले आहे.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा - धाराशिव**<br>**कर्जदार:- 1. अल्फा फॅब्रिकेशन**<br>**प्रस्ताव: आरेफ हनिफ मोमीन**<br>मिली कॉलनी, येडशी रोड, उस्मानाबाद - 413501<br>**2.अरफत आरेफ मोमीन**<br>अल्फा फॅब्रिकेशन मिली कॉलनी, येडशी रोड, उस्मानाबाद - 413501 | **1. यंत्रसामग्रीचे हायपोथेकेशन, स्टॉक आणि प्राप्य**<br>**2. नावावर मालमत्ता गहाण ठेवणे**<br>अल्फा इंडस्ट्रीजचे<br>भूखंड क्र.-C30, अतिरिक्त उस्मानाबाद औद्योगिक क्षेत्र, उस्मानाबाद.<br>**खालीलप्रमाणे सीमा:-**<br>पूर्व :- प्लॉट क्रमांक C30/1<br>पश्चिम :- प्लॉट क्र.C29<br>दक्षिण:- चखऊ रोड २0.00 Mtr R/w<br>उत्तर :- प्लॉट क्र.-C33 amp; C-33/1 | **मागणी सूचना:**<br>दि. 01/10/2024<br>रु.39,41,500.00/-अधिक लागू न केलेले w.e.f 01/10/2024 पासून व्याज कर्जाची वसुली होईपर्यंत<br>**सांकेतिक ताबा तारीख:**<br>१७/१२/२०२४ |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - १९/१२/२०२४**

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि**
**प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**

### बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5
आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

आज़ादी का अमृत महोत्सव

**नियम - 8 (1)**
**ताबा सूचना**

तर, अधोस्वाक्षरी केलेले हे बँक ऑफ महाराष्ट्रचे सिक्युरिटायझेशन आणि फायनान्शिअल रिकन्ट्रक्शन अंतर्गत अधिकृत अधिकारी आहेत. मालमत्ता आणि सुरक्षा व्याजाची अंमलबजावणी कायदा, 2002 आणि कलमाच्या उप-कलम (12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, 2002 च्या नियम 3 सह 13 वाचले, 01/10/202४ रोजी डिमांड नोटीस जारी करून खालील गोष्टींना आवाहन केले. नोटीस मिळाल्यापासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकीची परतफेड करण्याचा उल्लेख कर्जदार आणि जामीनदारांनी केला आहे.

कर्जदाराची रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यास, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला नोटीस दिली जाते की खाली स्वाक्षरीने त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे 18/12/2024 रोजी सुरक्षा व्याज अंमलबजावणी नियम, 2002 च्या नियम ८ सह वाचलेल्या अधिनियमाच्या कलम 13 च्या उप कलम (4) अंतर्गत

विशेषत: कर्जदाराला आणि सामान्यत: जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्ता आणि यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये. येथे नमूद केलेल्या रकमेसाठी मालमत्ता बँक ऑफ महाराष्ट्रच्या शुल्काच्या अधीन असतील.

कर्जदाराचे लक्ष सुरक्षित मालमत्ता कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, पूर्तता करण्यासाठी आमंत्रित केले आहे.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- नवीपेठ**<br>**कर्जदार:-**<br>**1. अर्जुन शंकरप्पा गौडगावी.**<br>**सौ.श्रीदेवी अर्जुन गौडगावी. (सह-कर्जदार)**<br>दोन्ही R/o,<br>घर क्रमांक 578/c शहर सर्वेक्षण क्र.623/7, दक्षिण कसाबा, सोलापूर-413001. | घर क्रमांक 578/c, सीटीएस क्र. 623/7, मोजमाप क्र. 28.40 चौ.मीटर, दक्षिण कसाबा, सोलापूर-413001<br>मालमत्तेचा मालक<br>अर्जुन शंकरप्पा गौडगावी.<br>सीमा:<br>पूर्व: सामान्य जिना केस CTS.NO.623/A<br>पश्चिम: प्लॅन रोड<br>उत्तर: CTS क्र.623/4<br>दक्षिण: CTS No.622/c आणि 622/A | **मागणी सूचना:**<br>दि. 17/07/2023<br>रु.9,85,766.00/-अधिक लागू न केलेले व्याज रु. 2,65,017.00/- w.e.f 17/07/2023 कर्जाची वसुली होईपर्यंत<br>**सांकेतिक ताबा तारीख:**<br>18/12/2024 |
| 2 | **शाखा- नवीपेठ**<br>**कर्जदार:-**<br>**1. श्री. प्रवीण चंद्रकांत पगड.**<br>**सौ.निलम प्रवीण पगड. (सह-कर्जदार)**<br>दोन्ही R/o,<br>प्लॉट क्र.9 सिद्धिविनायक नगर-2, पोतदार शाळेच्या मागे, सोरेगाव- डोणगाव रोड, सलगरवाडी, सोलापूर. | प्लॉट नं.9 येथे घराची मालमत्ता<br>जुना सर्व्हे क्र. 386, नवीन सर्व्हे क्र.17/2/A/3/2/2, सिद्धिविनायक नगर-2, पोतदार शाळेच्या मागे सोरेगाव-डोणगाव रोड,सलगरवाडी, सोलापूर.<br>चे मालक मालमत्ता श्री प्रविण चंद्रकांत पगड आणि सौ. निलम प्रवीण पगड.<br>सीमा:पूर्व: गट क्रमांक 2/B<br>पश्चिम: अंतर्गत रस्ता<br>उत्तर: प्लॉट क्र.10<br>दक्षिण: प्लॉट क्र.10 | **मागणी सूचना:**<br>दि. 14/10/2024<br>रु.23,19,167.00/-अधिक लागू न केलेले व्याज w.e.f 14/10/2024 कर्जाची वसुली होईपर्यंत<br>**सांकेतिक ताबा तारीख:**<br>18/12/2024 |
| 3 | **शाखा- नवीपेठ**<br>**कर्जदार:-**<br>**1. संतोष बालाजी रामपुरे.**<br>**2. सौ.हेमा संतोष रामपुरे (सह-कर्जदार)**<br>९२/९३, लक्ष्मीजवळ मार्केट दक्षिण कसबा सोलापूर | येथील प्लॉट क्र 280.Sr.No.105/1.2.3/106/1 A.1B/1C.1D<br>ब्लूमिंग मिडो, देवगाव येथे स्थित आहे.<br>तालुका उत्तर सोलापूर जि. सोलापूर.<br>मालमत्तेचा मालक .संतोष बालाजी रामपुरे सौ.हेमा संतोष रामपुरे.<br>सीमा:<br>पूर्व: प्लॉट क्र.272<br>पश्चिम: 6 मीटर रुंद रस्ता<br>उत्तर: प्लॉट क्र.281<br>दक्षिण: प्लॉट क्र.281 | **मागणी सूचना:**<br>दि. 17/07/2023<br>रु.5,43,981.35.00/-अधिक लागू न केलेले व्याज रु.19,810.65<br>एकूण रु.5,63,792.00/- w.e.f 17/07/2023 कर्जाची वसुली होईपर्यंत<br>**सांकेतिक ताबा तारीख:**<br>18/12/2024 |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - २१/१२/२०२४**

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि**
**प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**

## काव्यांकुर



### हुंदके

मावळतीच्या संध्याकाळी अपेक्षाभंगाच्या ओझ्याखाली
एक आत्मा सरकतो आहे पुढे पुढे वेदनांपासून मुक्त
होण्यासाठी...
चिरविश्रांती घेण्यासाठी एक देह सरकतो आहे पुढे पुढे
आयुष्याची काटेरी वाट तुडविण्यासाठी एक आशा सरकते
आहे पुढे पुढे धीर निराशेला कवटाळण्यासाठी ...
एक मन रिक्त होऊन सरकते आहे पुढे पुढे दुःखाचा
काळोख पिण्यासाठी आकंठभर
एक अंतःकरण सरकते आहे पुढे पुढे वात्सल्याचे घोट
रिचवण्यासाठी...
इथे तर प्रत्येकजण आहे तुषार्तलेला स्वतःसाठी
मी शोधतो आहे जीवनाच्या डहाळीवर फुले केव्हा
उमलतील स्वतःसाठी...
अवती भवती वणवा पेटला
संसार फाटला, प्रेम आटले
झाली नाती हिशेबी
आस ठेऊनी आहे तरी
माझा हवाला प्रारब्धी
वसंत सरला, ग्रीष्म तापला,
आता पानगळ सुरु झाली शिशिराची
शरीर थकले, मन श्रीमंत झाले, आतुर झाला आत्मा पंख
पसरुन विसावण्यासाठी अज्ञाताच्या प्रदेशात...
मी मागतो आहे जगाकडे भिक्षा
एक थेंब प्रेमाचा, अश्रूंचा
माझ्यासाठी जरुर ठेव मित्रा
मी आज असेन उद्या नसेन
जग म्हणेल आठवण ठेवा
एक सच्चा माणूस गेला गावा
काळीज माझे करपून गेले
आयुष्याचा झाला तमाशा
कण्हत कुंथत गुंतत गेली
भविष्याची वेडी आशा
आता कळले वय सरले
थांब मना अजून तर आहेत तुझ्यासाठी शिल्लक हुंदके
स्फुंदत स्फुंदत आकांत करीत
हे का हो जग सोडायचे?
मरणाचा महोत्सव साजरा करण्यासाठी धो धो आता बरसू या
कापरासारखे जळून आता अंतसमयी उरु या

-माधव कुलकर्णी, सोलापूर
संवाद- ९६२३७९१४७९

### तू फक्त थोडासा धीर धर

जे आज तुझ्यावर टिकेची झोड उठवतात
तेच उद्या तुझी स्तुती करतील
तू फक्त एकच कर, थोडासा धीर धर!
जे आज तुझ्यावर छद्मीपणाने हसतात
तेच उद्या तुझ्यासाठी टाळ्या वाजवतील
तू फक्त एकच कर, थोडासा धीर धर!
जे हात आज तुला दगडं मारतात
तेच हात उद्या तुझ्यावर फुले उधळतील
तू फक्त एकच कर, थोडासा धीर धर!
जे आज तुला बघून पाठ फिरवतात
तेच उद्या तुझी ओळख जगाला सांगतील
तू फक्त एकच कर, थोडासा धीर धर!
जे आज तुझा सतत अपमान करतात
तेच उद्या तुझ्यासमोर नतमस्तक होतील
तू फक्त एकच कर, थोडासा धीर धर!
जे आज तुला भेटायचे टाळतात
तेच उद्या तुला भेटायची वेळ मागतील
तू फक्त एकच कर,थोडासा धीर धर!
जे आज तुला कमी लेखतात
तेच उद्या तुझ्या पुढे, पुढे करतील
तू फक्त एकच कर, थोडासा धीर धर!
जे आज तुझी निंदा-नालस्ती करतात
तेच उद्या तुझा जयजयकार करतील
तू फक्त एकच कर, थोडासा धीर धर!
जे आज तुला मागे खेचायला पाहतात
तेच उद्या तुझ्या यशाची गाथा गातील
तू फक्त एकच कर, थोडासा धीर धर!
थोडासा धीर धर!!

-महेश भा. रायखेलकर, सोलापूर

### अमृताहुनी गोड

रोज वाढत जाते कर्जाचे वारुळ
जगण्याला घेरते जीवघेणे वादळ
कष्ट उदंड नाही पडत मुखी घास
थंड चुलीपुढे घडतो रोज उपवास
आयुष्याच्या ओझ्याने पाठीला बाक
ताठ कसे रहावे जगण्याने दिली शीक
प्रवासी वाटेत दगड धोंड्यांची आरास
दक्ष होतो चालतांना नाही ठेच पायास
ओबडधोबड जीवनात सोसले घाव
आकार देताना कष्टाला आली कीव
अपार कष्टासंगे सुखाची संगत जडली
मीठभाकर मज अमृताहुनी गोड लागली

- मारुती कटकधोंड, सोलापूर
संवाद-९८८११२४४५०

संपादन : जगन्नाथ हुक्केरी, संवाद- ९८५०४७०७००

## अंतरंग

# दगडाची आमटी

माणसाला माणूस कळला पाहिजे, म्हणजेच तो अंतरबाह्य वाचता आला पाहिजे. पण हे सर्वांनाच जमेल असे नाही. गाव खेड्यातील माणसं समजणं आणि समजून घेणं ही वाटते टटतितकी सोपी गोष्ट नाही. खरं म्हणजे ती एक अनुभव संपन्न चालती बोलती विद्यापीठं असतात.

एक म्हातारी आजी एसटीने प्रवास करत होती. कंडक्टर म्हणाला, तिकीट... तिकीट... तशी म्हातारी म्हणाली, 'एक पंढरपूर द्या', मग कंडक्टरने पंच करून त्या म्हातारीला पंढरपूरचे एक तिकीट दिले. तशी म्हातारीने तिच्या नऊवारी इरकल साडीच्या कमळेतून एक नोट काढून कंडक्टरला दिली. ती नोट जर्जर झाल्यामुळे तिला भोके पडलेली होती. कंडक्टर म्हातारीला म्हणाला, 'ए म्हातारे ही नोट चालत नाही'. म्हातारी म्हणाली, 'का रं... बाबा, तिला काय झालं?' कंडक्टर म्हणाला, 'नोट फाटकी आहे. तिला अनेक भोकं पडलेली आहेत. त्यामुळे ती चालणार नाही. दुसरी चांगली नोट दे'. म्हातारी कंडक्टरला म्हणाली, 'वा.. रे वा.., तुझं फाटलेलं भोकं पडलेलं तिकीट आम्ही कसं घ्यावं आणि माझी भोकं पडलेली नोट तुला चालना होय'. बिचारा कंडक्टर निरुत्तर झाला. तिने सांगितलेल्या लॉजिक पुढे कंडक्टरची मती गुंग झाली आणि त्याने गपगुमान म्हातारीची नोट घेतली. आता तो म्हातारीला कशाप्रकारे समजणार होता की जिथून एसटी सुटली आणि म्हातारी ज्या स्टॉपला एसटीत बसली, त्या स्टॉपला पंच करावे लागते आणि जिथे ती उतरणार आहे. त्या स्टॉपलाही पंच करावे लागते. म्हातारीला तर यातील काही माहिती नाही, तिचे म्हणणे इतकेच की कंडक्टरने न फाडता बिगर भोकाचे तिकीट दिले पाहिजे होते आणि कंडक्टर तो कधीच देऊ शकत नव्हता. अशाप्रकारे गाव खेड्यातील माणसांपुढे भल्याभल्यांनाही निरुत्तर व्हावे लागते.



अशीच एक गोष्ट, दर महिन्याला एक वारकरी पंढरपूरच्या वारीला पायी जात होता. खूप दूरवरून खानदेशातून यायचा. बहुधा तो, त्या पंढरपूरच्या वाटेवर गर्द अशा चिंचेच्या झाडाच्या सावलीत एका म्हातारीची झोपडी होती. नेहमी येता-जाता त्या ठिकाणी तो म्हातारीच्या वस्तीवर विश्राम करायचा. त्याच्याबरोबर असलेल्या हडपीतील शिळापाका भाकर तुकडा खायचा आणि पुढे पायी चालत प्रवासाला निघून जायचा. त्याचा हा पायंडा गेली अनेक वर्ष चालू होता. पण अनेकवेळा त्याच्याबरोबर फक्त शिळ्या भाकरीच असायच्या. मग तो म्हातारीला काहीतरी कालवण मागायचा. कधी एखादी-दुसरी भाकरही मागायचा. म्हातारी पण वारकरी आहे म्हणून त्याला आनंदाने द्यायची. पण त्याच्या या नेहमीच्याच कटकटीला म्हातारी यावेळी पार कंटाळली होती. वारकरी तिच्या वस्तीवर आल्याबरोबरच म्हातारीच्या कपाळावर आठ्या पडल्या. तिने आज पक्के ठरवले होते की, याला आज काहीही द्यायचे नाही. कालवण द्यायचे नाही. ना भाकर द्यायची. कारण तो सोकावला गेलाय असे तिला वाटत होते. पण वारकरी मोठा चतुर होता. त्याने म्हातारीकडे पाहिल्याबरोबर म्हातारीचा नूर त्याच्या लक्षात आला. तशी त्याने तिला अगोदर गोडगोड बोलून पाहिले. पण म्हातारी आज काही त्याला बधणार नव्हती. म्हातारीने त्याच्याशी आज पूर्ण असहकार करायचे ठरवले होते. मग तो गोडीगुलाबीने आजीला म्हणाला, 'आजी तुमची तब्येत कशी आहे? आजी फणकाऱ्यात म्हणाली, 'मला काय धाड भरलीय मेलीला, मी चांगली आहे. पण आज तुला काही माझ्याकडून मिळणार नाही'. वारकरी म्हणाला, 'आजी मी आज तुमच्याकडे काहीच मागणार नाही. माझ्याबरोबर गावाकडून आणलेल्या दशम्या आहेत. उलट मीच आज तुम्हाला एक खमंग अशी आमटी चारवणार आहे. म्हातारी फणकऱ्यात म्हणाली, 'नेहमी माझंच खातोस आणि तू कुठली खमंग आमटी मला चारवणार आहेस'. वारकरी म्हणाला, 'बघा तर खरं, आज मी आमच्याकडील दगडाची आमटी तुम्हाला चारवणार आहे. तुम्हाला खाल्ल्यानंतर समजेल की ती आमटी किती चवदार आणि खमंग आहे. त्यासाठी मला फक्त एक पातेलं द्या. म्हातारीलाही गंमत वाटली. त्याला आपण काहीच देणार नाही, नुसतं पातेलं तर मागतो आहे तो, म्हणून म्हातारीने आनंदाने त्याला तिच्या खोपीतील पातेलं आणून दिल. मग त्या वारकऱ्यांनी चिंचेच्या झाडाखाली तीन दगडांची एक चूल मांडली. त्याच्यावरती पातेलं ठेवलं. त्यानंतर त्याने तिथेच पडलेल्या काटक्याकुटुक्या गोळा करून चुलीला जाळ लावला. त्यानंतर तो म्हणाला, 'आजी कळशीभर पाणी मिळेल काय?' म्हातारी म्हणाली, 'फुकटचे पाणीच तर मागतोय.' तिने त्याला कळशीभर पाणी दिले. मग वारकऱ्यांनी तिच्याच रानातील पाच-दहा कोवळे कोवळे दगड हुडकून आणले. त्याला कळशीतील पाण्याने स्वच्छ धुतले. मग ते पातेल्यात शिजायला टाकले. त्यानंतर वारकरी म्हणाला, 'आजी थोडे तेल द्या, म्हणजे त्याला फोडणी देता येईल.' तेलच तर मागतोय म्हणून म्हातारीने त्याला धारभर तेल दिले. मग वारकरी म्हणाला, आजी थोडी जिरी-मोहरी द्या. म्हणजे चांगला तडका बसेल. जिरी-मोहरीच तर मागतोय म्हणून आजीने त्याला जिरी-मोहरी दिली. मग वारकरी म्हणाला, 'आजी थोडेसे तिखट द्या.' तिखटच तर मागतोय म्हणत आजीने त्याला तिखट दिले. मग वारकरी म्हणाला, 'आजी थोडेसे मीठ द्या. म्हणजे आमटी चवदार होईल. नुसते मीठ तर मागतोय, म्हणत आजीने त्याला मीठ दिले. अशाप्रकारे दगडाच्या आमटीसाठी लागणारी सर्व सामग्री हळूहळू म्हातारीकडून वारकऱ्यांनी मिळवली आणि झकासपैकी दगडाची आमटी तयार केली. अर्धाभरतास आमटी शिजल्यानंतर वारकरी म्हणाला, 'आजी या आपण जेवण करू.' म्हातारीला मोठी उत्सुकता लागून राहिलेली होती. ती या गोष्टीची की, कशी चवदार लागेल. ते तिला चाखून पाहायचे होते. खरे तर ती तरण्याची म्हातारी झाली होती. पण तिने दगडाची आमटी करतात, हे कधीही ऐकलेलं नव्हतं. म्हातारी घरातील ताटवाट्या घेऊन आली. वारकरी म्हातारीला म्हणाला, 'आजी तुम्ही रोजच्यापेक्षा आज एखादी भाकरी आगाऊ खाणार आहात. घरात असतील तेवढ्या भाकरी घेऊन बाहेर या.' म्हातारी पण कौतुकाने घरातील सर्व भाकऱ्या घेऊन बाहेर आली. मग वारकऱ्यांनी ते चुलीवरील आमटीचे पातेले खाली घेतले. त्यातील त्याने टाकलेली कोवळी कोवळी दगडे पळीच्या सहाय्याने बाहेर काढली. मग एका ताटात म्हातारीला आणि दुसऱ्या ताटात आपल्याला आमटी वाढून घेतली. मग म्हातारीने आणलेल्याच भाकरी दोघांनाही वाढून घेतल्या आणि मस्तपैकी दोघेही पोटभर जेवले.

वास्तविक पाहता दगडाची आमटी होत नसते. पण वारकऱ्याने शक्कल लढवून आमटीला लागणारी सर्व सामग्री म्हातारीकडूनच घेतली आणि झकासपैकी आमटी बनवली. कारण आल्याबरोबर तिचा असहकार त्याला जाणवला होता. पण त्याचे इच्छित ध्येय गाठण्यासाठी वेगळ्या प्रकारे म्हातारीकडून सर्व साध्य करून घेतले. शिकलेली शहरातील माणसे गाव खेड्यातील या माणसांपुढे थिटी आणि खुजी दिसतात. नुसते शिक्षणाने समृद्ध असून चालत नाही. माणसाने अनुभवाने समृद्ध असले पाहिजे. पण गाव खेड्यातील ही समृद्ध पिढी आज कमी होत चालली आहे, याची खंत आहे.


- सुरेशकुमार लोंढे,
मोडनिंब, संवाद ८४८४९४७६१

## आठवण

# 'तो' माईक आणि उस्तादजी..!

साधारणपणे पंचवीस वर्षांपूर्वी पंढरपुरात स्वरसाधना संगीत महोत्सवाच्या निमित्ताने पद्मविभूषण उस्ताद झाकीर हुसेन येणार होते. कार्यक्रमाची सारी तयारी पूर्ण झाली. पंढरीचे भूषण असणाऱ्या खडके बंधू यांनी उस्तादजीना विशेष आमंत्रित केले होते.

कार्यक्रमाच्या दोन दिवस अगोदर उस्ताद झाकीर हुसेन यांचा खडके बंधूंना फोन आला. साऊंड सिस्टिम कोण लावणार आहे? मला त्यांच्याशी चर्चा करायची आहे, असे म्हटल्यावर माझे पप्पा श्री भगवानराव तथा भाऊ मनमाडकर हे फोनवरून उस्ताद झाकीर हुसेन यांच्यासोबत बोलले. उस्तादजींनी माइक संदर्भात, साऊंड सिस्टिम संदर्भात काही प्रश्न विचारले. पप्पांनी समाधानकारक उत्तरे दिली. सर्वात शेवटी उस्तादजी यांनी डच् ५८ माईक आपल्याकडे आहे ना? असा प्रश्न विचारला. यावेळी मात्र पप्पांनी जवळ संबंधित माईक नसताना... हो डच् ५८ आहे... असे उत्तर दिले. ही घटना साधारण सायंकाळी पाच वाजताची होती. त्यानंतर तात्काळ पप्पांनी पुढील दोन तासात पंढरपूर सोडले. रात्रीतून प्रवास करून मुंबई गाठली. डच् ५८ मॉडेलचे चार नवे माईक खरेदी केले. त्या वेळेच्या परिस्थितीत असे चार माईक खरेदी करणे हे कुठल्याही मंडप स्पीकर व्यावसायिकास परवडणारे नव्हते. मात्र इतका मोठा कलाकार पंढरपुरात येतोय. एका माईकमुळे हिरमोड व्हायला नको म्हणून पप्पांनी नवे माईक उस्तादजी यांच्यासाठी मोठ्या जिद्दीनं खरेदी करत तात्काळ पंढरपुरात आले. पुढच्या दिवशी होणाऱ्या कार्यक्रमात डच् ५८ मॉडेलचा माईक उस्ताद झाकीर हुसेन यांच्यासमोर लावला. यावेळी स्टेजवर माइक सेटिंग करत असताना पाठीमागील तबला पप्पा पुढे घेत होते. मात्र उस्तादजी यांनी 'अरे ये मेरी जिम्मेदारी है...' असे सांगत. कलेप्रति आपल्या तबल्या प्रति असणारी विनम्रता दाखवून दिली. उस्ताद झाकीर हुसेन यांच्या त्या कार्यक्रमामुळे तो माइक आणि उस्तादजी यांची आठवण कायम कोरली गेली. पुढे काही वर्षांनी स्वरसाधना संगीत महोत्सवातच पंडीत शिवकुमार शर्मा यांच्यासोबत झाकीर हुसेन आले होते. यावेळी मलां प्रत्यक्ष साऊंड सिस्टिम लावण्याचा योग आला. इतका मोठा कलाकार जवळून अनुभवता आला, हे भाग्यच! आज उस्तादजी यांच्या निधनाची बातमी समजली अन् एक प्रकारे तालाचा आवर्तन समेवर येण्यापूर्वीच थांबलं. उस्तादजी यांच्या पवित्र स्मृतीस मनमाडकर परिवार आणि आरती स्पीकर्स यांच्यावतीने विनम्र आदरांजली!



-धनंजय मनमाडकर,
पंढरपूर

## विचारधन

# उगवता अन् मावळता सूर्य

टीका करणारी व्यक्ती एखाद्या सज्जन माणसाला बदनाम करू शकते. पण स्वतःला मात्र सज्जन बनवू शकत नाही. तेव्हा जीवनाच्या तत्त्वांवर आनंदी रहा. तत्वनिष्ठ रहा. दुःख हे आयुष्याचा एक भाग आहे, हे वास्तव स्वीकारलं की जीवन जगण्याचं ओझं वाटत नाही.



स्वकष्टाची भाजी-भाकरी खाऊन जे समाधान मिळते ते हरामची तूप-पोळी खाऊन मिळत नाही. शारीरिक कष्ट करून जे सुंदर शरीर लाभते, ते आराम करून लाभत नाही. मन लावून केलेल्या कामात जो आनंद मिळतो, तो अन्य कोणत्याही गोष्टीत मिळत नसतो. आपलं आहे त्यात जेवढं समाधान मिळतं तेवढं समाधान नसलेल्या गोष्टी मिळवण्याच्या धडपडीत असत नाही. आयुष्यातील प्रत्येक क्षणाचा फायदा घ्यावा.

पण कुणाच्या परिस्थितीचा किंवा विश्वासाचा नाही. आयुष्याच्या वाटेवर एका चुकीमुळे साथ सोडणारे भरपूर असतात. पण ती चूक समजावून सांगून आयुष्यभर साथ देणारे लाखात एक असतात. शरीर पाण्यामुळे, मन सत्यामुळे आणि आत्मा ज्ञानामुळे पवित्र राहतो. कर्तृत्व नसलेली माणसे दुसऱ्यांची थट्टा करण्यात मात्र नेहमीच पुढे असतात.

ज्ञान म्हणजे आपण काय करू शकता याचे भान आणि भान म्हणजे कधी काय करू नये याचे ज्ञान. उगवता सूर्य आणि मावळता सूर्य दोन्ही दिसायला सारखेच दिसतात. पण दोघांत फरक एवढाच आहे की उगवता सूर्य आशा घेऊन येतो आणि मावळता सूर्य अनुभव देऊन जातो.

जे बदलता येईल ते बदला. जे बदलता येत नाही ते स्वीकारा आणि जे स्वीकारता येत नाही त्यापासून दूर जा. परंतु स्वतःला आनंदी ठेवा. आयुष्य एका मिनिटात बदलत नाही, ते बदलते आपणाला. त्या एका मिनिटात घेतलेल्या निर्णयावरुन कधी अडल्या नडल्याची हाक तुमच्यापर्यंत पोहचत असेल तर ईश्वराचे आभार माना. कारण तो समर्थ असतानाही इतरांच्या मदतीसाठी त्याने तुमची निवड केलीय. मूठभर वाईट वागणाऱ्या लोकांमुळे चांगलं वागणं कधीच सोडू नका. कारण ही दुनिया चांगलं वागणाऱ्या लोकांमुळेच टिकून आहे. दुसऱ्यांची मदत करण्यासाठी कोणाकडेही वेळ नसतो. परंतु दुसऱ्यांच्या कामात व्यत्यय आणण्यासाठी सर्वाकडे वेळ असतो. एवढ्या लवकर जगातली कोणतीच गोष्ट बदलत नाही. जेवढ्या लवकर माणसाची वृत्ती आणि दृष्टी बदलते.

## सोलापूरची शाहिरी

# सोलापूरचे भूषण शाहीर रामजोशी

पूर्वीच्या काळापासून सोलापूर हे विविध जाती धर्मांच्या व विविध पंथसंप्रदायांच्या लोकांनी नटलेले शहर आहे. येथे मोठ्या प्रमाणावर हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन इत्यादी धर्माचे लोक मोठ्या गोण्यागोविंदाने एकत्र राहतात. तसेच, येथे मराठी बरोबरच हिंदी, कन्नड, तेलुगु, उर्दू इत्यादी भाषांचा वापर दिसून येतो. सोलापूर ही जशी सिद्धरामेश्वरांची नगरी म्हणून विख्यात आहे. तसेच सोलापूरनगरी ही साहित्यिकांची नगरी म्हणूनही प्रसिद्ध आहे. येथील मातीने केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर भारताचे नाव जगात उंचावणारे कलाकार दिले आहेत. सोलापूर ही गुणवंतांची खाण आहे.




या सोलापूरच्या मातीत जन्मलेले एक अनमोल रत्न म्हणजे शाहीर रामजोशी होय. रामजोशी यांचा जन्म इसवी सन १७६२ मध्ये वेदशास्त्रसंपन्न जगन्नाथ शास्त्री यांच्या कुळात झाला. शाहीर रामजोशी यांचे संपूर्ण नाव रामचंद्र जगन्नाथ जोशी असे होते. त्यांनी आपल्या अवघ्या ५१ वर्षांच्या आयुष्यात सबंध महाराष्ट्राला आपल्या लावण्यांची भुरळ पाडली. मुळात रामजोशी यांचे वडील जगन्नाथ शास्त्री व चुलते अनंत शास्त्री जोशी हे मोठेच विद्याप्रेमी आणि विद्याव्यासंगी होते. पेशवे दरबारात या दोघांचा चांगला मान होता आणि दोघांचे चांगले वजनही होते. पेशवे बाळाजी बाजीराव तथा नानासाहेब पेशवे यांनी ज्योतिष विश्व, अतिनिपूण आणि सिद्धांत वक्ते अशा शब्दांनी जगन्नाथ शास्त्री जोशी यांना गौरविले होते. आपले अमोघ वक्तृत्व आणि विद्याव्यासंगाच्या बळावर या दोघांनी जनमानसात आपले अत्यंत आदराचे स्थान बळकट केले होते. ज्योतिष सांगणे आणि कीर्तनाच्या माध्यमातून त्यांनी समाज प्रबोधनाचा वसा घेतला होता. सोलापुरातील प्राचीन विठ्ठल मंदिरात रोजची पूजाअर्चा करणे हे जोशी घराण्याचे पूर्वापार काम चालत आलेले होते.

**'आपल्या सोलापूरचा सार्थ अभिमान व्यक्त करणारी**
**पाय धरील कविराय दुजा अशी काय लावणी करी**
**माय कुणाची व्याली या गगनाखाली कविता सोलापुरी'**

अशी प्रख्यात रचना करणारे शाहीर रामजोशी हे बालपणात मोठेच स्वच्छंदी होते. घरात आर्थिक सुबत्ता नांदत असल्यामुळे त्यांचे बालपण मोठ्या मोकळेपणात गेले. बालपणापासूनच घरातील वातावरण हे संस्कारक्षम कथा, पोथ्या, पुराणे, कहाण्या, आरत्या, भुपाळ्या, संस्कृत स्तोत्रे, मंत्र इत्यादींचे होते. तसेच घरात नेहमी शास्त्री व पंडितांची ये-जा असायची. त्यामुळे शास्त्री आणि पंडितांच्या काव्यमैफिलीतील काव्यचर्चा या सर्वांचा तसेच, घरातील मंत्र जागर, संस्कृत स्तोत्रे या सर्वांचा परिणाम म्हणून शाहीर रामजोशी यांच्या मनात काव्यनिर्मितीची ज्योत पेटू लागली. शाहीर रामजोशी यांचे बंधू मुदगलशास्त्री हे सुद्धा वेदशास्त्रसंपन्न व व्यासंगी म्हणून नावारूपाला येत होते. परंतु, रामजोशी यांचा स्वभाव मुळातच स्वच्छंदी होता.

रामजोशी यांच्या घरासमोर धोंडी शाहिराचा तमाशा फड होता. नुकताच धोंडी शाहीर व त्यांचा तमाशा हा सोलापुरात चांगलाच नावारूपाला येऊ लागला होता. हळूहळू रामजोशी यांना धोंडी शाहिरांचा तमाशाचा फड खुणावू लागला. पुढे रामजोशी यांची पावले धोंडीशाहीरांच्या फडाकडे आपसुकच निघाली. आपल्या घरातील संस्कारक्षम वातावरण व जन्मतःच निरीक्षण करण्याचा स्वभाव यामुळे हळूहळू शाहीर रामजोशी यांच्या मनामध्ये काव्य निर्मिती सुरू झाली. त्यांनी एकीकडे आपल्या संस्काराच्या चौकटीत राहणाऱ्या असंख्य स्त्रिया पाहिल्या तर दुसरीकडे आपले पती सैन्यात गेल्यामुळे त्यांच्या आठवणीने व्याकुळ झालेल्या स्त्रिया पाहिल्या. तसेच काही स्त्रिया परपुरुषाशी चोरून संबंध ठेवणाऱ्या स्वैरपणे वागणाऱ्या पाहिल्या. त्यांचे मन आजूबाजूच्या परिस्थितीचे निरीक्षण करत होते. आता हळूहळू त्यांना काव्य स्फूरू लागले.



इसवी सन १७८३ ते इसवी सन १७९२ अशा दहा वर्षांच्या काळात रामजोशी साऱ्या महाराष्ट्रात आपल्या लावणीने श्रोत्यांना मंत्रमुग्ध करत होते. अख्ख्या महाराष्ट्रभर त्यांच्या लावण्यांचे कार्यक्रम झाले. गावोगावांतून त्यांना निमंत्रणे मिळत होती. आता राम जोशींच्या समोर कनक, कांता व कीर्ती या तिन्ही गोष्टी दोन्ही हात जोडून उभ्या होत्या. अशातच त्यांनी अनेक अजरामर रचना लिहिल्या. आपल्याला अनेकदा ठाऊक असलेली त्यांची लौकिक शृंगारपर लावणी.

**'सुंदरा मनामध्ये भरली**
**जरा नाही ठरली**
**हवेलीत शिरली मोत्याचा भाग**
**अरे गड्या हौस नाही पुरली**
**म्हणोनि विरली पुन्हा नाही फिरली**
**कुणाची सांग'**

बार्शीच्या भगवंतावर.....

**'दाट साधूचा हाट**
**भागवत पाठ**
**रुचिर फारशी**
**अशी ही अद्भुत जगी बारशी**
**संत शांत गुणवंत पहा भगवंत नांदतो हरी**
**मिराशी जागा याची खरी'**

क्षेत्र वर्णन पंढरपूरचे करताना शाहीर राम जोशी म्हणतात की,

**'क्षमातळी इजसमाज नाही उमामहेश्वर पुरी**
**पुरी पडेना काशी मग इतरा दासी न कोण असो हो पंढरी'**

समाज स्थितीपर 'उमा भ्रमसि वाउगा' अशी दुष्काळपर रचना करताना ते म्हणतात की,

**'उगा भ्रमसि वाउगा कशाला युगांत खळ हा कली**
**कलि मातला सारा घनदारा इच्छि राज्यास इच्छि राज्यासही हाकली'**

आपली उपदेशपर रचना...

**'भला जन्म हा तुला लाधला खुलास हृदयी बुधा**
**धरीसि तरी हरिचा सेवक सुधा**

लौकिक शृंगार पर लावणी....

**'कोण्या ग सुभगाची मदनमंजरी**
**सांग सखे सुंदरी**
**इच्छा सौंदर्याची सीमा**
**झाली गडी रतिहुनि अति उत्तमा**
**पाहुनिया मुखचंद्रमा**
**सखे गडे अमा गमती पौर्णिमा'**

वास्तु वर्णन करताना शुक्रवारवाड्याचा पोवाडा लिहितात,

**'कृष्णजन्म आनंद वाटतो गोकुळ अज हे पुणे**
**श्रीमंताचे मंदिर काही वसुदेवाहुनी उणे'**

स्थळ वर्णनात पुणे शहराचे वर्णन करतात की,

**'ब्राह्मणी राज्य जोरदार घोड्यावर स्वार होते शिपाई**
**जबर सिद्धी कैकांनी पाहिली शत्रू ठेवले नाही'**

संस्कृत, मराठी, कन्नड आणि हिंदी भाषेतही त्यांनी रचना केलेल्या आहेत. असा हा शाहीर म्हणजे मराठी शाहिरांचे भूषणच.

मयुरेश अरूण कुलकर्णी, विजयपूर
संवाद - ९४२१०२४८८१

## संक्षिप्त वृत्त



### पौर्णिमा संस्थेतर्फे सहा गावांतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे ५०० किट वाटप

**अणदूर, दि. २१ डिसेंबर-**
येथील पौर्णिमा महिला बहुउद्देशीय संस्था संचालित गुंज संस्थेच्या वतीने ६ खेडेगावातील गरीब शालेय विद्यार्थ्यांना ५०० शालेय किटचे वाटप करण्यात आले. त्यामध्ये धनगरवाडी. मानेवाडी. गंधोरा. नागझरी तांडा. गायरान वस्ती. सलगर तांडा वस्ती या ठिकाणी ५०० विद्यार्थ्यांना हे किट वाटप करण्यात आले. ग्रामीण भागातील मुलांना शालेय साहित्य बुद्धिबळ म्हणून गेम बॉक्स टिफिन वॉटर बॅग असे साहित्य या किटमधून देण्यात आले आहे. या साहित्याचा उपयोग ग्रामीण भागातील मुलांना जास्तीत जास्त व्हावा म्हणून पौर्णिमा संस्थेने आज ५०० किट त्यामध्ये ४ वही १ पेन्सिल बॉक्स १ टिफिन १ पाणी बॉटल हे शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना लागणारे साहित्य वाटप करण्यात आले आहे. गंधोरा या ठिकाणी गावचे उप सरपंच संजय भोसले. सोसायटी चेअरमन ग्रामपंचायत सदस्य बाबुराव बलभीम भोसले. लक्ष्मण कडप्पा कुंभार ग्रामपंचायत सदस्य बाळू प्रवीण नागनाथ पाटील ग्रामपंचायत सदस्य शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री सत्यवान साखरे जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक विश्वनाथ शिवलिंग, आप्पा जट्टे प्रतिभा पोपटराव नलवडे, धनगरवाडी जिल्हा परिषद शिक्षक संजय गायकवाड मानेवाडी महेश लवटे पौर्णिमा संस्थेच्या सचिव बाबई चव्हाण, नागेश चव्हाण हे उपस्थित होते.




### राज्यस्तरीय आदर्श ग्रामसेवक सेवारत्न पुरस्कार संजय घोगरे यांना प्रदान

**अणदूर, दि. २१ डिसेंबर-**
महाराष्ट्र साहित्य परिषद माधवराव पटवर्धन सभागृह पुणे येथे आयोजित मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी यांच्या प्रेरणेने पुरस्कार प्रेरणा देतात, प्रेरणेने राष्ट्र मोठे होते या उक्तीप्रमाणे राज्यस्तरीय गुणिजन गौरव पुरस्कार २०२४ चे राज्यस्तरीय आदर्श ग्रामसेवक सेवारत्न पुरस्कार २०२४ संजय घोगरे यांना जाहीर झाला आहे व त्यांना पुणे येथे मानाची शाल फेटा सन्मानपत्र पदक सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला आहे. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातून आदर्श ग्रामसेवक सेवा रत्न पुरस्कार संजय घोगरे यांना मिळाल्याने मोठ्या प्रमाणात शुभेच्छांचा वर्षाव होत आहे संजय घोगरे हे एक आदर्श ग्रामसेवक आहे नेहमी चांगले काम करत असतात एक शासकीय कर्मचारी असून सुद्धा समाजसेवा करत असतात त्यामुळे त्यांच्या कामाची दखल घेऊन महाराष्ट्र साहित्य परिषद माधवराव पटवर्धन सभागृह पुणे येथे आयोजित मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी यांच्या प्रेरणेने त्यांना राज्यस्तरीय आदर्श ग्रामसेवक सेवा रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.



### वखारिया विद्यालयात ध्यान दिन साजरा

**बार्शी, दि. २१ डिसेंबर-**
तालुक्यातील उपळे दुमाला येथील श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित वखारिया विद्यालयात शनिवार दि. २१ डिसेंबर रोजी सकाळी ८ वाजता जागतिक ध्यान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. दयानंद रेवडकर सर यांच्या मार्गदर्शनात सहशिक्षक महाले सर यांनी संयोजन केले. या वेळी सर्व शिक्षक ही ध्यानस्थ मुद्रेत उपस्थित होते. संयुक्त राष्ट्रसंघाने २१ डिसेंबर हा जागतिक ध्यान दिन म्हणून घोषित केला आहे. यावेळी ध्यान दिनाचे महत्त्व सांगताना ध्यान केल्याने चिंता, तणाव आणि रक्तदाब नियंत्रणात ठेवता येत असल्याचे तसेच भावनिक आरोग्य आणि आत्म-जागरूकता सुधारते व झोपेची गुणवत्ता वाढत असल्याचे सांगितले. जागतिक शांतता आणि एकता वाढवण्यासाठी ध्यानाच्या भूमिकेवर भर दिला जाणार असल्याचे संयुक्त राष्ट्रसंघाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.



### कुसमोड येथील लक्ष्मीनगर शाळेचा ओम घड्याळेचे तालुकास्तरीय स्पर्धेत यश

**पिलीव, दि. २१ डिसेंबर-**
माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील जिल्हा परिषद प्राथमिक लक्ष्मीनगर शाळेचा ओम शशिकांत घड्याळे याने तालुकास्तरीय १०० मिटर धावण्याच्या स्पर्धेत चौथा क्रमांक पटकाविला. त्याच्या या यशाबद्दल कुसमोडच्या उपसरपंच स्वाती मदने, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शशिकांत घड्याळे, उपाध्यक्ष स्वाती गाढवे, मुख्याध्यापक सुहास कोल्हे, माजी उपसरपंच व शिक्षणतज्ञ संजय पाटील, सर्व शाळा व्यवस्थापन समितीचे आजी माजी सदस्य व पदाधिकाऱ्यांसह शिक्षक सुनिल दुरे यांच्याकडून ओमचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

# टेंभुर्णी-लातूर महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी ५७४ कोटी

## खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांची माहिती; केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याशी भेट अन् चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २१ डिसेंबर-**
धाराशिव लोकसभा मतदारसंघातील अत्यंत महत्त्वाच्या महामार्गावरील टेंभुर्णी-लातूर हा महामार्ग सोलापूर जिल्ह्यातील टेंभुर्णी-कुर्डुवाडी-बार्शी-पांगरी-धाराशिव जिल्ह्यातील येडशी-तडवळा-ढोकी व लातूर जिल्ह्यातील मुरुड या मोठ्या बाजारपेठांना जोडणारा व मराठवाड्याचे प्रवेशद्वार असलेले बार्शी शहरातून थेट पश्चिम महाराष्ट्राचे संपर्क निर्माण करणारा आहे. यासाठी ५७४ कोटी रुपये मंजूर झाल्याचे खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी सांगितले.

या महामार्गाच्या चौपदरीकरणाचा प्रश्न शेकडो वर्षापासून प्रलंबित होता. खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी २९ संप्टेंबर २०१९ रोजी भेट घेतली होती त्यानंतर २१ नोव्हेंबर २०१९ रोजी लोकसभेच्या अधिवेशनादरम्यान तारांकित प्रश्न विचारला होता. त्यानंतर ९ मार्च २०२१ रोजी अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान नियम ३७७ द्वारे लक्षवेधी प्रश्न विचारून सभागृहाचे लक्ष वेधले होते. दि. ५ एप्रिल २०२१ रोजी निवासस्थानी भेट घेऊन सदर प्रश्न संदर्भात चर्चा केली होती. ५ ऑक्टोबर २०२१ रोजी संचालक राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्यासोबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते तसेच २१ जानेवारी २०२१ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासमवेत झालेल्या सर्वपक्षीय खासदारांच्या बैठकीत सदर प्रश्नाच्या अनुषंगाने चर्चा केली होती. दि. १४ नोव्हेंबर २०२२ रोजी जिल्हाधिकारी यांच्यासमवेत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. दि. २१ डिसेंबर २०२३ रोजी हिवाळी अधिवेशनादरम्यान नितीनजी गडकरी यांची भेट घेऊन सदर विषयाच्या अनुषंगाने पाठपुरावा करण्यात आला होता. दि. १८ डिसेंबर २०२४ रोजी मंत्री महोदय यांच्या निवासस्थानी या प्रश्नाच्या अनुषंगाने भेट घेतली व सदर मार्गाच्या चौपदरीकरणाबाबत पाठपुरावा केला होता तसेच लोकसभेत लोकसभेचा सदस्य या नात्याने विविध आयुधांचा वापर करत संबंधित प्रश्नाकडे सभागृहाचे वारंवार लक्ष वेधले होते.

तसेच लक्षवेधीच्या माध्यमातून व तारांकित प्रश्नांच्या माध्यमातून अनेक वेळा या महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या संदर्भाने पाठपुरावा केला होता. चालू हिवाळे अधिवेशना दरम्यान खासदार यांनी प्रश्न उत्तराच्या तासांमध्ये नितीनजी गडकरी यांना सोलापूर- उमरगा रामा ६१, धुळे -सोलापूर रा.म. २११ नागपूर -रत्नागिरी रा.म. ३६१सह टेंभुर्णी-लातूर या मार्गाच्या संदर्भाने प्रश्न विचारले होते. लोकसभेच्या अधिवेशन काळात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी खा. राजेनिंबाळकरांना प्रत्यक्ष भेटण्यासंदर्भात सांगितले होते. खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन या महामार्गाच्या अनुषंगाने गडकरी यांच्या निवासस्थानी चर्चा केली. यावेळी त्यांनी सदर महामार्गास ५७४ कोटी रुपये मंजूर केल्याचे त्यांच्या फेसबुक पेज वर कळविले आहे.



### नागपूरमध्ये केले होते आंदोलन

**महामार्गाच्या चौपदरीकरणाकरिता अनेक वर्षापासून प्रयत्न चालू होते. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, प्रकल्प संचालक नांदेड यांच्याकडे विविध बैठकीदरम्यान सदर महामार्गाच्या चौपदरीकरण करण्याकरिता आढावा घेण्यात आला होता. टेंभुर्णी-लातूर चौपदरीकरण संघर्ष समितीच्या वतीने अनेकवेळा आंदोलन देखील करण्यात आले होते. तसेच या समितीच्या वतीने नागपूर येथे आमरण उपोषण करण्यात आले होते. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणून सदर महामार्गाच्या चौपदरीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे.**

# कासेगावातील नामसप्ताहाची सांगता

**ग्रंथ दिंडीसह काल्याचे कीर्तन धार्मिक कार्यक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**कासेगाव, दि. २१ डिसेंबर-**
काला वाटू एकमेका । वैष्णव निका संभ्रम ।। या अभंग गायनासह एकमेकांना काल्याचा प्रसाद देत श्याम महाराज जोशी यांच्या काल्याच्या किर्तनाने कासेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथील नामसप्ताहाची नुकतीच उत्साहात सांगता झाली.

येथील संत सावता माळी महाराज मंदिरात जगद्गुरु श्रीसंत तुकाराम महाराजांचे विद्यमान वंशज श्रीगुरु बापूसाहेब महाराज व श्रीगुरु कान्होबा महाराज देहूकर यांच्या मार्गदर्शनाखाली गाथा पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. हभप नरसू वाडकर यांच्या हस्ते वीणापूजन, उपसरपंच ज्ञानेश्वर रोकडे यांच्या हस्ते कलश पूजनाने नामसप्ताहाची सुरुवात करण्यात आली. यावेळी निशिकांत पाटील, रामहरी चौगुले, भारत महाराज चव्हाण, तुकाराम कारभारी यांच्या हस्ते टाळ, मृदंग व ध्वज पूजन करण्यात आले. सागर महाराज सुतार, दादा महाराज रवळे, शिवाजी महाराज पोतदार, मनोज महाराज खलाटे, दत्तात्रय महाराज चव्हाण, दत्तात्रय महाराज क्षिरसागर यांचे प्रवचन झाले. संजय महाराज पाटील, वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुधाकर महाराज इंगळे, नवनाथ महाराज गरजे, बापूसाहेब महाराज ढगे सुरवडकर, वामन महाराज शेळके सकनावाडीकर, जगद्गुरु श्रीसंत तुकाराम महाराजांचे विद्यमान वंशज श्रीगुरु कान्होबा महाराज देहूकर (पंढरपूर) यांची कीर्तन सेवा झाली. नाम सप्ताहाचे यंदाचे २० वे वर्ष होते. नाम सप्ताहाची सांगता ग्रंथदिंडी मिरवणूक होऊन श्याम महाराज जोशी यांच्या काल्याच्या किर्तनाने झाली. या नामसप्ताहात मच्छिंद्र काळे, सोमनाथ हेडे, मनिषा हेडे, अजय ढेकरे, श्याम चौगुले, प्रविण चौगुले, लक्ष्मण जाधव आदींनी अल्पोपहार दिला. तर श्रीमंत मोरे, चंद्रकांत चौगुले, संदीपान काळे, मारुती हेडे, राम मोरे, सोमनाथ मुटकुळे, श्रीमंत काळे, प्रभाकर गायकवाड, जनार्दन काळे, ज्ञानेश्वर खारे, अरूण काटकर व ईरप्पा गुरव आदींनी भोजनाची पंगत दिली.सरपंच यशपाल वाडकर, डॉ . प्रविण खारे, अर्जुन हुडकर, दत्तात्रय वाडकर, गणेश वाडकर, लक्ष्मण वाडकर, सुशील काळे, संतोष भोजने, प्रकाश हेडे, मलकू काळे, श्रीमती राधा हेडे, शिवाजी हेडे, मोहन आदलिंगे यांचे सहकार्य लाभले.

# विद्यापीठात स्वराज्य रक्षक, छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राची स्थापना

**तभा वृत्तसेवा,**
**उत्तर सोलापूर,दि. २१ डिसेंबर-**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठात 'स्वराज्य रक्षक, छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्र स्थापन व्हावे यासाठी अनेक दिवसांपासून. प्रयत्नशील असलेले विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रा. सचिन गायकवाड यांच्या प्रयत्नाला यश मिळाले असून विद्यापीठामध्ये यावर्षी हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती स्वराज्य रक्षक, छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राला मान्यता मिळाली आहे.

या अध्यासन केंद्रासाठी विद्यापीठाने ३० लाखांच्या निधीची तरतुदही केली आहे. या अध्यासन केंद्राचे अध्यक्ष म्हणून प्रा. सचिन गायकवाड तर समन्वयक डॉ.विकास पाटील यांची निवड करून अनेक इतिहास तज्ञ प्राध्यापकांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. विद्यापीठाच्या राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व्यवस्थापन परिषद कक्षात 'स्वराज्य रक्षक, छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्र कृती समितीची पहिली बैठक शुक्रवारी झाली.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी विद्यापरिषदेचे सदस्य प्रा. सचिन गायकवाड हे होते. समन्वयक डॉ. विकास पाटील, विष्णू वाघमारे, डॉ.चंद्रकांत चव्हाण, सुटा संघटनेचे अध्यक्ष डॉ. नेताजी कोकाटे, डॉ. अरुण सोनकांबळे, डॉ.राजेंद्र गायकवाड, डॉ. विकास शिंदे, डॉ. सज्जन पवार हे सदस्य उपस्थित होते तर कक्ष अधिकारी नासिर देशमुख व कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. विकास पाटील, प्रास्ताविक डॉ. राजेंद्र गायकवाड तर आभार डॉ. विकास शिंदे यांनी मानले.




# महात्मा फुले साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी वसंतराव पाटील

**स्वागताध्यक्षपदी रवींद्र फुले निमंत्रकपदी छायाताई नानगुडे, सुनील धिवार**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २१ डिसेंबर-**
खानवडी (ता. पुरंदर) येथे होणा-या सतराव्या राज्यस्तरीय महात्मा फुले प्रबोधन मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक न्यायाधीश वसंतराव पाटील यांची निवड करण्यात आली आहे. स्वागताध्यक्ष पदी रवींद्र फुले तर निमंत्रक पदी छायाताई नानगुडे व सुनील धिवार यांची निवड करण्यात आली आहे. संमेलन दि.२८ डिसेंबर रोजी होणार आहे, अशी माहिती संमेलनाचे मुख्य संयोजक व ज्येष्ठ साहित्यिक दशरथ यादव यांनी दिली.

महात्मा फुले यांच्या मूळ खानवडीमध्ये दरवर्षी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात येते. या संमेलनात ग्रंथदिंडी, उदघाटन समारंभ, पुरस्कार वितरण, कथाकथन, नाट्यप्रयोग, परिसंवाद, कविसंमेलन असे भरगच्च कार्यक्रम होणार आहेत. साहित्य संमेलनाचे उद्घाटक म्हणून प्रसिद्ध कवी प्रकाश घोडके उपस्थित राहणार आहेत.



प्रमुख पाहुणे म्हणून आमदार विजय शिवतारे, माजी आमदार संजय जगताप, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ दिगंबर दुर्गाडे, माजी आमदार अशोकराव टेकवडे, माजी आ.संभाजीराव कुंजीर, माजी जिल्हा परिषद सदस्य सुदामराव इंगळे आदी उपस्थित राहणार आहेत.पाटील हे साहित्य क्षेत्रात गेली वीस वर्षे काम करीत असून न्यायपालिकेत न्यायधीश म्हणून सेवा करीत साहित्यात वेगळा ठसा त्यांनी उमटविला आहे. शेकडो कविसंमेलने त्यांनी केली आहेत. मूळचे नाशिक जिल्ह्यातील असून मुंबईत जलद गती न्यायालयात न्यायधीश म्हणून त्यांनी काम केले आहे. यापूर्वी झालेल्या महात्मा फुले साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद साहित्य महर्षि यशवंतराव सावंत, इतिहासाचार्य मा.म.देशमुख, म.भा.चव्हाण, प्रा.गंगाधर बनबरे, इतिहास संशोधक श्रीमंत कोकाटे, प्रा. रतनलाल सोनग्रा, डॉ.सय्यद जब्बार पटेल, डॉ.जयप्रकाश ततघुमटकर, दशरथ यादव, हरीश मेश्राम, भा.ल.ठाणगे, रावसाहेब पवार, डॉ स्वाती शिंदे, अविनाश ठाकरे, यांनी भुषविले आहे. साहित्य संमेलनाचे संयोजन राजाभाऊ जगताप, गंगाराम जाधव, दत्ता होले, चंद्रकांत फुले, रमेश बोरावके, दिपक पवार, संजय सोनवणे आदी करीत आहेत.

# महाप्रसादगृहामुळे अक्कलकोटच्या वैभवात भर

## जडेय शांतलिंगेश्वर महास्वामींचे गौरवोद्गार; जन्मेजय भोसले यांच्याशी चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २१ डिसेंबर-**
श्री स्वामी समर्थ अन्नक्षेत्र महाप्रसादगृह इमारतीच्या बांधकामाचे काम सुरु असलेली ही इमारत श्रीक्षेत्र अक्कलकोटच्या वैभवात भर टाकणारी आहे. गरज ओळखून मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांनी नूतन महाप्रसाद गृह उभारणीचा घेतलेली निर्णय म्हणजे दूरदृष्टी आहे. ही न्यासाची प्रगती पथावर सुरु असल्याचे गौरवोद्गार मौनतपस्वी जडेय शांतलिंगेश्वर महास्वामीजी (निंबाळ मठ) यांनी केले.

स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून भक्ताभिमुख कार्य उल्लेखनिय आहे. महास्वामीजींनी संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांना आशीर्वाद देवून प्रकृती स्वास्थ्याबाबत चौकशी केली. यापसंगी मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले, उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, महास्वामिजींचे सेवाधारी समर्थ मानकर, बसवराज माशाळे, दत्तकुमार साखरे, सुरेश पाटील, सागर हळगोंडे, भारत पाटील, न्यासाचे लेखा परीक्षक ओंकारेश्वर उटगे, सौरभ मोरे, कायदे विषयक सल्लागार समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी, पृथ्वीराज पोळ, प्रतिक पोळ, गोविंद शिंदे, स्वामिनाथ बाबर, विशाल कलबुर्गी यांच्यासह श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळातील कर्मचारी, सेवेकरी, भक्तगण, पदाधिकारी, भाविक बहुसंख्येने उपस्थित होते.



# मोहोळच्या आमदाराचे विधानभवनाच्या पायरीवर आंदोलन

## अनगर अप्पर तहसील कार्यालय रद्द करण्यासाठी एल्गार; काळा ड्रेस केला होता परिधान

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. २१ डिसेंबर-**
अनगर अप्पर तहसील कार्यालय रद्द व्हावे या मागणीसाठी मोहोळचे नूतन आमदार राजू खरे यांनी शनिवारी दि.२१ डिसेंबर रोजी विधिमंडळाच्या पायऱ्यावर चक्क काळा ड्रेस घालून आंदोलन केले आणि अख्या महाराष्ट्राचे लक्ष या प्रश्नाकडे वेधले .मोहोळ तहसील कार्यालयाच्या मुद्द्यावरून गेले ४/५ महिने झाले तालुक्यात रान उठले आहे. या संदर्भात मोहोळ तालुका बचाव संघर्ष समितीने वेगवेगळ्या स्वरूपाची आंदोलने केली आहेत.

अनगर येथे झालेल्या अप्पर तहसील कार्यालय वास्तविक तिथे होऊ नये त्याची गरज नाही अशी लोक भावना तालुक्यात होती. मात्र माजी आमदार राजन पाटील यांनी अट्टाहास करून हे कार्यालय तेथे सुरू करून घेतले. यासंदर्भात मोहोळ येथील काही युवकांनी चार दिवस आमरण उपोषण केले होते. तर यासाठी मोहोळ शहरात तीन दिवस बंद पाळण्यात आला होता. त्याचबरोबर पेनूर, कामती, नरखेड, शेटफळ, कुरुल आदि गावांमध्ये या निर्णयाच्या विरुद्ध बंद पाळण्यात आला होता. तर प्रथम नगराध्यक्ष रमेश बारसकर यांनी या विरोधात मुंबई पर्यंत बैलगाडी मोर्चाचे आयोजन सुद्धा केले होते. मात्र या कशाचाही परिणाम न होता ते कार्यालय सुरू झाले. यादरम्यान विधानसभेची निवडणूक लागली आणि निवडणुकीत हाच मुद्दा गाजल्याने चांगले काम करूनसुद्धा यशवंत माने यांना पराभूत व्हावे लागले .आणि त्यांच्या विरोधात दोन वेळा तिकीट बदलून मिळालेले राजू खरे यांचा दणदणीत विजय झाला. साहजिकच त्यांच्याकडून हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत अशी मतदारांची अपेक्षा आहे. मात्र सध्या खातेवाटप नसल्याने नूतन आमदार राजू खरे यांनी महाराष्ट्राचे लक्ष वेधण्यासाठी आणि हे कार्यालय तातडीने रद्द करण्यासाठी शनिवारी हा अनोखा उपक्रम केला. त्यांनी चक्क निषेधासाठी काळा ड्रेस घालून विधिमंडळाच्या पायऱ्यावर एक प्रकारे आंदोलन केले. विधानसभा निवडणुकीपूर्वी मोहोळ तालुक्यासह जिल्ह्यातील नागरिकांसह पदाधिकाऱ्यांनी मोठा विरोध केला होता. तरीही कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले होते. आताही विरोध कायम आहे.




### कार्यालय रद्द करण्यासाठी करणार प्रयत्न : आ. खरे

यासंदर्भात त्यांना प्रतिक्रिया विचारले असता अधिवेशनासाठी वेळ कमी असल्याने विधिमंडळात हा प्रश्न उपस्थित करता आला नसला तरीही सरकारचे कामकाज सुरू होताच हे कार्यालय रद्द करण्यासाठी जोमाने प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचाच एक भाग म्हणून मी हे आज आंदोलन केले आहे असेही आमदार खरे यांनी या प्रतिनिधीशी सांगितले यावेळी त्यांच्यासोबत मोहोळचे प्रथम नगराध्यक्ष रमेश बारसकर उपस्थित होते. यामुळे आमदार खरे यांचे कौतुक करण्यात येत आहे.



# सहकार शिरोमणी कारखान्याला प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची भेट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २१ डिसेंबर-**
तालुक्यातील भाळवणी येथील सहकार शिरोमणी वसंतराव काळे सह.साखर कारखान्यावर प्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर यांचे भरारी पथकाने भेट देवून, त्यांनी कारखान्याकडे ऊस वाहतुक करणारे बैलगाडी, ट्रक, ट्रॅक्टर आणि बजेट यांना अपघात होवु नये या सुरक्षेच्यादृष्टीने आलेल्या प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी ट्रॅक्टर ड्रायव्हर यांना मार्गदर्शन केले.

कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली ऊस तोडणी वाहतूक करणारे बैलगाडी, टॅक्टर आणि बजेट यंत्रणेस सुरक्षेच्या दृष्टीने कारखान्याने रिफ्लेक्टर रेडियम रिफ्लेक्टर बसविणेची व्यवस्था केली . यावेळी व्हा. चेअरमन भारत कोळेकर, आश्विनी पाटील, प्र. कार्यकारी संचालक पी. डी. घोगरे, डेप्यु. जनरल मॅनेजर के. आर. कदम, शेती अधिकारी प्रतापराव थोरात, परचेस अधिकारी सी. जे. कुंभार, डी. डी. काळे, कार्यालयीन अधिक्षक ज्ञानेश्वर कुंभार, सुरक्षा अधिकारी मनसुब सय्यद उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### सॅनिटरी इन्स्पेक्टर रिजवान पटेल यांचा गौरव

**सोलापूर, दि. २१ डिसेंबर-**

सोलापूर महानगरपालिकातर्फे विशेष स्वच्छता मोहिमेत जे कर्मचारी नेमून दिलेल्या काम उत्कृष्टपणे व पारदर्शकरित्या पद्धतीने काम केले आहे. अशा अधिकारी आणि कर्मचारी यांना सोलापूर महानगरपालिका सोलापूरचे आयुक्त शितल तेली उगले मॅडम यांच्या हस्ते पुष्पगुच्छ प्रम ाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कर्तव्यदक्ष सॅनिटरी इन्स्पेक्टर रिजवान पटेल यांना आयुक्त् शितल तेली उगले यांच्या हस्ते पुष्पगुच्छ प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आला. यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, अतिरिक्त आयुक्त रवी पवार, उपायुक्त आशिष लोकरे, उपायुक्त तैमूर मूलाणी, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, सफाई अधीक्षक अनिल चराटे आणि अधिकारी व कर्मचारी सर्व उपस्थित होते.



### योगविहार येथे ओंकार साधना शिबीर उत्साहात

**सोलापूर, दि. २१ डिसेंबर-**

आंतरराष्ट्रीय प्रार्थनायोग मंडळातर्फे आयोजित ओंकार साधना शिबिर दि. १६ ते २० डिसेंबर या ५ दिवसाच्या कालावधीमध्ये महातपस्वी श्री कुमारस्वामीजी आश्रम, इंदिरानगर जवळ, सोलापूर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. ज्येष्ठ साहित्यिक, कवयित्री श्रीमती सुनेत्रा पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडले. ओंकार उच्चारणाचे विविध प्रकार असून १५ प्रकार त्यांनी या शिबिरामध्ये सांगितले व प्रात्यक्षिक करून घेतले. आंतरराष्ट्रीय प्रार्थनाय योग मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र मायनाळ यांनी संस्थेच्या विविध उपक्रमाचे माहिती या सांगता समारोपाच्या कार्यक्रमात दिली. याप्रसंगी विश्वनाथ मेहत्रे, संध्यारजनी दानवे, शितोळे यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच याप्रसंगी सुभाष मुंडेवाडीकर सेवानिवृत्त पोलीस अधीक्षक यांचा सत्कार श्रीमती सुनेतत्रा पंडित यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी उषा लोणी, सावित्री मुंडेवाडीकर, दयानंद माशाळकर, महेश नरूनी, वेदमूर्ती बसवराज स्वामी उपस्थित होते. संस्थेचे सचिव बाबासाहेब कुलकर्णी यांनी आभार मानले. सूत्रसंचालन नागनाथ चौगुले यांनी केले. सामूहिक मंगल आरतीने कार्यक्रमाचे सांगता झाली.

### रोहिणी चौधरी यांना शरद पवार इन्स्पायर फेलोशिप जाहीर

**सोलापूर, दि. २१ डिसेंबर-**

नू.म.वि. मराठी शाळेतील उपक्रमशील व तंत्रस्नेही शिक्षिका रोहिणी सचिन चौधरी यांची यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई यांच्यातर्फे शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन साठी निवड झाली. यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई यांच्या वतीने मानाची समजली जाणारी फेलोशिप शिक्षण क्षेत्रात नवे काही करू पाहणाऱ्या देहाने झपाटलेल्या व त्यासाठी कष्ट करण्याची तयारी असणाऱ्या होतकरू गुणवंत शिक्षकांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे या उद्देशाने कृषी साहित्य



शिक्षण या विविध क्षेत्रात दरवर्षी फेलोशिप जाहीर होते. त्यामध्ये वीस प्राथमिक शिक्षक आणि दहा माध्यमिक शिक्षकांनाही फेलोशिप दिली जाते यासाठी सुमारे राज्यभरातून ७३० अर्ज आले होते या फेलोशिपची रक्कम ६०००० सन्मानपत्र सन्मानचिन्ह असे स्वरूप असणार आहे. फ ेलोशिप प्रदान करण्याचा सोहळा ८ डिसेंबर रोजी मुंबई येथे यशवंतराव चव्हाण सभागृहात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. अनिल काकोडकर, यशवंतराव चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे, एमकेसीएलचे विवेक सावंत, डॉक्टर चारुदत्त माई सह्याद्रीचे विलास शिंदे, साहित्य फेलोशिपचे समन्वयक प्राध्यापक नितीन रिंढे आदी उपस्थित होते. या यशाबद्दल शाळा समितीचे अध्यक्ष राजेश पटवर्धन, मुख्याध्यापिका वर्षा जेधे, मोतीबने, नू.म.वि. शिशु शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी यांनी अभिनंदन केले.

### ब्रिजधाम येथे आज बकेट लिस्ट सांगितिक प्रोग्राम

**सोलापूर दि. २१ डिसेंबर-**

विजापूर रोड सोरेगांव येथील ब्रिजधाम आश्रमात रविवारी दि. २२ डिसेंबर रोजी सायंकाळी ४.३० ते ६ या वेळेत 'बकेट लिस्ट' हा सांगीतिक कार्यक्रम होणार आहे. यामध्ये मेंडोलीन, गिटार, सिंथेसायजर, व्हायोलिन, मेलोडिका, माऊथ ऑर्गन अशा भन्नाट इन्स्ट्रुमेंट्सवरील जुन्या हिंदी चित्रपटगीतांची ही मैफिल असेल. दुर्मिळ वाद्य मानले गेलेल्या हवाई गिटारवरील गीत हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य असेल. राजन कंपली, शेखर जेऊरकर, अवधूत दिवाणजी, अविनाश पत्की हे हौशी कलाकार ही गाणी सादर करतील. आदित्य गाडगीळ यांचे निवेदन असेल. रसिक श्रोत्यांनी याचा आनंद घ्यावा असे आवाहन ब्रिजधाम आश्रम यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# घराप्रमाणेच सर्वांनी शहर स्वच्छ ठेवले पाहिजे

### पालिका आयुक्त शितल तेली-उगले यांचे आवाहन

### विशेष स्वच्छता मोहिमेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांचा गौरव



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ डिसेंबर-**

सोलापूर महापालिकेच्या वतीने सर्व विभागाअंतर्गत कर्मचाऱ्यांनी सांघिक पद्धतीने विशेष स्वच्छता मोहीम यशस्वी केली. यामुळे शहर चकाचक झाले. शहराचा चेहरा मोहरा पालटला. पूर्वीचे आणि मोहिमेनंतरचे रस्ते पाहता सम ाधानकारक बदल पाहायला मिळाला. प्रत्येकाने आपल्या घराप्रमाणेच शहराचीही स्वच्छता राखली पाहिजे, असे आवाहन महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी केले.

सोलापूर महापालिकेच्या वतीने दिनांक २ ते १९ डिसेंबर दरम्यान आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांचे संकल्पनेतून मुख्य रस्ते व परिसर विशेष स्वच्छता मोहीम यशस्वीपणे राबविण्यात आली. या मोहिमेत उल्लेखनीय काम केलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचा गौरव समारंभ आज सकाळी हुतात्मा स्मृती मंदिरात आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी विचार मंचावर यावेळी अतिरिक्त आयुक्त रवि पवार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, उपायुक्त तैमुर मुलाणी, मुख्य लेखापरीक्षक रुपाली कोळी, उपसंचालक मनीष भिष्णूरकर, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित, कृष्णा पाटील, मनीषा मगर, सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे, अंतर्गत लेखापरीक्षक राहुल कुलकर्णी, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी ओमप्रकाश वाघमारे, मुख्य सफाई अधिक्षक नागनाथ बिराजदार, सफाई अधिक्षक अनिल चराटे आदींसह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. या विशेष स्वच्छता मोहीम स्पर्धे चे तज्ञ परीक्षक म्हणून महापालिका पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण बनसोडे, प्रा. मोहन चव्हाण, प्रा. बाळासाहेब भास्कर या तिन्ही तज्ञ परीक्षकांचा सन्म ान करण्यात आला. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि महात्मा गांधी, संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांनी आभार मानले. या मोहिमे अंतर्गत ११७ रस्ते अतिशय उत्तम प्रकारे स्वच्छ करण्यात आले. शहराचा चेहरा मोहरा पालटला आहे. मोहिमेत ४५० कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक भाषणात अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी विशेष स्वच्छता मोहिमेची माहिती दिली.

#### आरआरआर सेंटर उभारणार

सोलापूर शहरात महापालिकेच्या माध्यमातून स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्यातून आरआरआर सेंटर उभारण्याचे नियोजन आहे. या सेंटरमध्ये नागरिक जुने कपडे, फर्निचरसह इतर साहित्य आणून देतील. ते साहित्य दुरुस्त करून गरजू लोकांना मोफत देण्यात येईल. त्यासाठी प्रदर्शन भरविण्यात येणार असल्याचेही यावेळी अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी सांगितले.

#### शहर स्वच्छतेसाठी सर्वांचे योगदान महत्त्वाचे

देशात इंदोर हे शहर गेल्या सहा वर्षापासून तब्बल ६५० शहरांमध्ये स्वच्छतेमध्ये प्रथम क्रमांक पटकावत आहे. तेथील लोक स्वच्छता पाळतात. आपलं शहर देशात एक नंबर ठेवण्यासाठी माझंही योगदान महत्त्वाचे आहे, अशी तेथील लोकांची भावना आहे. त्याप्रमाणेच सोलापूर शहरातील सर्वांनी खारीचा वाटा स्वच्छतेसाठी उचलला पाहिजे. ती प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे आवाहनही महापालिका आयुक्त तेली-उगले यांनी केले.

#### स्वच्छता मोहिमेतील स्पर्धेचा निकाल

प्रथम क्रमांक - विभागीय कार्यालय क्र.१, द्वितीय क्रमांक - विभागीय कार्यालय क्र. ७ व तृतीय क्रमांक - विभागीय कार्यालय क्र. २ आणि ४ मध्ये विभागून देण्यात आला तसेच या सोबत उद्यान अधिक्षक किरण जगदाळे, अतिक्रमण अधिकारी हेमंत डोंगरे व त्यांचे कर्मचारी यांनाही प्रशस्तीपत्र देण्यात आले. या मध्ये विभागीय अधिकारी, कनिष्ठ अभियंता, मुख्य आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक, मजूर, बिगारी व झाडूवाला, झाडूवाली कर्मचाऱ्यांचा आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या हस्ते प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला. या विशेष स्वच्छता मोहीम स्पर्धेचे तज्ञ परीक्षक म्हणून महापालिका पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण बनसोडे, प्रा. मोहन चव्हाण, प्रा. बाळासाहेब भास्कर यांनी काम पाहिले.

## देगाव ग्रामपंचायतीजवळ महिलेसह दोघांना मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ डिसेंबर -**

देगाव ग्रामपंचायतीजवळ भावाचे भांडण सोडविण्यास गेलेल्या महिलेसह दोघांना मारहाण करून जखमी करण्यात आले. करूणा सचिन गिड्डे (वय ३२, रा. देगाव, ता. उत्तर सोलापूर) आणि चैतन्य मुकुंद जाधव (वय ३६, रा. देगाव) अश जखमींची नावे आहेत. २० डिसेंबर रोजी रात्री पावणे आकराच्या सुमारास देगाव येथील ग्रामपंचायत ऑफीसजवळ करुणा यांच्या भावाचे भांडण चालू होते. त्यावेळी करूणा या भांडण सोडविण्यास गेल्या असता त्यांना अमित आप्पासाहेब आडके याने लाकडाने मारहाण करून जखमी केले. त्यामुळे त्यांना भाऊ निरंजन बुरजे यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. तर चैतन्य जाधव हा ग्रामपंचायत ऑफीसजवळ थांबला असता त्यासदेखील अमित आडके याने लोखंडी रॉड व लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी के. जाधव यास त्याचा भाऊ योगेश जाधव याने शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



## महिलेशी लज्जास्पद वर्तन; ग्रामसेवकाविरूध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२१ डिसेंबर-**

एका कार्यक्रमास पायी चालत जाणाऱ्या ४२ वर्षीय महिलेला मोटर सायकल थांबवून माझ्या गाडीवर बसा तुम्हाला सोडतो असे म्हणताच सदर म हिलेने नकार दिला असता तुम्ही माझ्यावर नाराज आहात का? तुम्ही मला खूप... खूप आवडता चला आपण मंगळवेढ्याला जाऊ असे म्हणून मनास लज्जा वाटेल असे कृत्य केल्या प्रकरणी गुंजेगाव येथील ग्रामपंचायतीत कार्यरत असलेले ग्रामसेवक अभिजीत अशोक लाड (रा. रड्डे) याच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

यातील पिडीत महिला तथा फिर्यादी दि.१८ रोजी पंचायत समितीचे विस्तार अधिकारी नरळे यांनी फिर्यादीने ग्रामसेवक यांच्या विरोधात दिलेल्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने चौकशी कामे बोलावले होते. सदरची चौकशी पूर्ण झाल्यानंतर दुपारी दोन च्या दरम्यान पिडीता ही भावकीतील लग्नाच्या बांगड्याचा कार्यक्रम असल्याने त्या खोमनाळ ते मंगळवेढा रोडने घराकडे जात असताना मुरशीदबाबा दर्गाजवळ पाठीमागून आरोपी तथा ग्रामसेवक अभिजीत लाड हे मोटर सायकलवर आले व त्यांनी फिर्यादीस पाहून गाडी थांबविली व माझ्या गाडीवर बसा मी तुम्हाला सोडतो असे म्हणाला. त्यावेळी फिर्यादीने त्यास साफ नकार दिल्यानंतर आरोपीने तुम्ही माझ्यावर नाराज आहात का? तुम्ही मला खूप खूप आवडता, चला आपण मंगळवेढ्याला जाऊ असे ते म्हणाले. त्यावर फिर्यादी ह्या खूपच घाबरल्याने त्यांनी त्यांच्या पतीला फोन लावून बोलावून घेत असताना आरोपीने मंगळवेढ्याकडे पलायन केले. दरम्यान यानंतर फिर्यादीचे पती, त्यांचे मित्र प्रभू इंगळे, रघुनाथ पवार व मुलगा प्रतिक असे सर्वजण घटनास्थळी आले असता फिर्यादीने घडला प्रकार सांगितला असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## कुत्र्याला वाचविण्याच्या प्रयत्नात कारची झाडाला धडक

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२१ डिसेंबर-**

पंढरपूरहून मंगळवेढ्याकडे येणाऱ्या इनोव्हा कारच्या आडवे कुत्रे आल्याने त्याला वाचविण्याच्या नादात झाडावर आदळून कारचे मोठ्या प्रमाणात निष्काळजीपणे वाहन चालवून नुकसान केल्याप्रकणी चालक गुरुदिपसिंह सभरवाल (रा.वर्सोवा अंधेरी,मुंबई) याच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. यातील फिर्यादी सोपान सुखदेव खुळे हे मुंबई येथे ट्रान्सपोर्टचा व्यवसाय करतात दि.२० डिसेंबर रोजी रात्री ९.३० वाजता फिर्यादी हे पाठखळ येथे घरी असताना इनोव्हा कार क्र.एम.एच.१३ बी.एन.६०३० वरील चालक तथा आरोपी गुरुदिपसिंह सभरवाल यांनी फोन करुन कळविले की, पंढरपूरहून मंगळवेढ्याकडे येत असताना मंगळवेढा शहरा हद्दीतील हॉटेल संजय जवळ अचानक कुत्रा आडवा आल्याने त्याला वाचविण्याच्या प्रयत्नात कार रस्त्याच्या बाजूला असलेल्या झाडास जोराची धडक बसल्याने कारचे समोरील बंपर,बोनेट,रेडीएटर टाकी,चेस व इंजिनला धडक होऊन मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. याची फिर्याद खुळे यांनी दिल्यावर निष्काळजीपणे वाहन चालवून अपघात केल्या प्रकरणी चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महिलेस चाकूने मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ डिसेंबर -**

शहरातील कुमठा नाका परिसरातील हुडको कॉलनी येथे महिलेस चाकूने मारहाण करण्यात येऊन जखमी करण्यात आले. शबाना सत्तार शेख (वय ५०, रा. कुमठा नाका, हुडको कॉलनी) असे जखमी महिलेचे नाव आहे. २० डिसेंबर रोजी रात्री नऊ च्या सुमारास शबाना या त्यांच्या आईच्या घरी इंदिरा नगर येथे गेल्या होत्या. त्या तिथे घराला गिऱ्हाईक आले आहे असे शबाना म्हणाल्या असता तुझा काय संबंध म्हणून त्यांना इम्रान शब्बीर इनामदार याने चाकूने व लाथाबुक्क्याने मारहाण केली. त्यामध्ये शबाना या गंभीर जखमी झाल्याने त्यांना महंमद शेख याने शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## डॉ. माधव जोशी यांची जामिनावर मुक्तता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ डिसेंबर -**

एक लाख रुपयांची लाच घेतल्या प्रकरणात अटकेत असलेले डॉ. माधव जोशी यांची जामीनावर मुक्तता करण्यात आली आहे.

तक्रारदार यांच्या साई डायग्नोस्टिक लॅबला श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथे कार्यान्वित असलेल्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत दाखल होणाऱ्या रुग्णांचे रक्त व लघवीचे नमुने तपासून रिपोर्ट सादर करण्याचे काम निविदेद्वारे मिळालेले होते. तक्रारदार यांच्या लॅबच्या विरोधात आलेल्या तक्रारी अर्ज हा पुढील चौकशीकामी महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचे, जिल्हा समन्वयक, डॉक्टर माधव जोशी यांच्याकडे होता. सदर तक्रारीच्या अनुषंगाने डॉक्टर माधव जोशी यांनी तक्रारदार यांना संपर्क साधून त्यांच्या लॅबचे कामाबाबत माझ्याकडे तक्रार प्राप्त झाल्याचे सांगून तुमच्या बाजूने वरिष्ठांना अहवाल पाठवतो, असे सांगून तुमच्या लॅबच्या विरोधात मी अहवाल पाठवल्यास महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अंतर्गत केलेल्या कामाचे उर्वरित बिल निघणार नाही, अशी भीती दाखवून सकारात्मक अहवाल पाठवण्यासाठी आरोपी डॉक्टर माधव जोशी यांनी तक्रारदार यांच्याकडे दोन लाख रुपयांची मागणी केली. तक्रारदार यांच्याकडून लाचेच्या पहिल्या हप्ताची एक लाखाची लाच स्वीकारताना जोशी यांना रंगेहात पकडण्यात आले व त्यांच्याविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याच्या कलमानुसार सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आली होती. त्यांना सोलापूर येथील मे. जिल्हा व सत्र न्यायालयासमोर हजर करण्यात आले. आरोपी डॉ. जोशी यांच्यावतीने ॲड. निलेश जोशी यांनी जामीनासाठी अर्ज दाखल केला होता. सदर जामिनाच्यावेळी ॲड. निलेश जोशी यांच्यावतीने करण्यात आलेला युक्तिवाद ग्राह्य धरून सोलापूर येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. जी. कटारिया यांनी आरोपी डा. माधव जोशी यांची २५ हजारांच्या जामीनावर मुक्तता केली. आरोपीच्यावतीने ॲड. निलेश जोशी, ॲड. यशश्री जोशी, ॲड. राणी गाजूल, ॲड. ओंकार परदेशी यांनी काम पाहिले.

## दुर्मिळ नाणी, तिकिटांचा संग्रह पाहण्यात सोलापूरकर दंग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ डिसेंबर -**

दुर्मिळ नाणी, तिकिटे आणि स्वाक्षऱ्यांचा संग्रह पाहण्यात सोलापूरकर दंग झाले. निमित्त होते चंडक परिवार, एसपीएम इंग्लिश स्कूल आणि रोटरी क्लब ऑफ सोलापूरतर्फे आयोजित उद्योजक किशोर चंडक यांनी ६१ वर्षांपासून संग्रहित केलेल्या दुर्मिळ आणि जगप्रसिद्ध नाणी, तिकिटे आणि स्वाक्षऱ्यांच्या प्रदर्शनाचे.



उद्घाटन वास्तु विशारद सीमांतिनी चाफळकर, इतिहास अभ्यासिका प्रा. डॉ. नभा काकडे यांनी केले. याप्रसंगी संयोजक किशोर चंडक, श्रुती चंडक, शिक्षण प्रसारक मंडळी सोलापूरचे शाळा समितीचे अध्यक्ष सी. ए. राजेश पटवर्धन, मुख्याध्यापक शिवानंद शिरगावे, रोटरी क्लब ऑफ सोलापूरचे अध्यक्ष सी. ए. सुनिल माहेश्वरी, सचिव ब्रिजकुम ार गोयदानी, वेदांत चंडक, नम्रता चंडक उपस्थित होते.हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराजांचे दुर्मिळ सुवर्ण होन, चांदीच्या रुपया, सुवर्ण फनम आणि काकतीय (वारंगळ साम्राज्य) यांची दुर्मिळ सुवर्ण नाणी, २ हजार ते २५०० वर्षांपूर्वीची जनपदे, गुप्त आणि इतर शासकांची सुवर्ण, चांदी व तांब्याची नाणी, स्वतंत्र भारताची १९ वेगवेगळ्या किमतीची चांदीची स्मारक नाणी, स्वातंत्र्यपूर्व काळातील चलनी रुपये व नोटा अशा वस्तूंचा समावेश या प्रदर्शनात आहे.याशिवाय मुघल काळातील सोलापूरची नाणी, राशीवर आधारित मुघलांची दुर्मिळ सुवर्ण नाणी, जगातील पहिले तिकीट, पहिले पाकीट, भारतातील पहिली तिकिटे अशा अनेक ऐतिहासिक वस्तू या प्रदर्शनात ठेवण्यात आल्या आहेत. महात्मा गांधींच्या जीवनावर आधारित नाणी आणि तिकीट संग्रह तसेच हिटलरने काढलेली चित्रे देखील पाहायला मिळत आहेत. याशिवाय जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक, भारतरत्न पुरस्कार विजेते, चंद्रावर पाऊल ठेवणारे चांद्रवीर, भारतातील महान विभूती तसेच ब्रिटिश राजे, राणी यांच्या स्वाक्षऱ्या या प्रदर्शनात पाहायला ठेवण्यात आल्याने सोलापूरकरांसाठी ही एक पर्वणी आहे.

## ५०० प्रकारच्या गुलाबांचे प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ डिसेंबर-**

द रोज क्लब ऑफ सोलापूरच्या वतीने दि. २८ व २९ डिसेंबर रोजी सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत सोलापुरातील जुना वालचंद कॉलेज रोडवरील लोटस मल्टिपर्पज हॉल येथे ३६ वर्षानंतर गुलाब प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती अध्यक्ष ममता बोलाबत्तीन आणि सचिव सुनील पवार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या गुलाब प्रदर्शनात विविध जातींची व विविध रंगांची ५०० प्रकारचे गुलाब पाहायला मिळणार आहेत. यावेळी सोबतच गुलाब पुष्प, पुष्पगुच्छ, पुष्परचना व फुलांची रांगोळी या स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येकास प्रमाणपत्र आणि विजेत्यांना प्रथम, द्वितीय व तृतीय अशी बक्षिसे देण्यात येणार आहेत. या प्रदर्शनात प्रवेश विनामूल्य आहे. परिसंवाद दि. २८ डिसेंबर रोजी दुपारी २ ते ३ या वेळेत याच ठिकाणी परिसंवाद आणि दि. २९ डिसेंबर रोजी दुपारी २ ते ३ या वेळेत कार्यशाळा घेण्यात येणार आहे. प्रदर्शनासाठी आयोजन समितीचे दत्ता सुरवसे, मनोरमा बँक परिवाराचे श्रीकांत मोरे, लायन्स क्लब ऑफ सोलापूरचे अध्यक्ष दिनेश बिराजदार, लोटस मल्टिपर्पज हॉलच्या संचालिका संजीवनी देवसानी, पुष्पा गुंगे, रोज सोसायटी ऑफ पुणेचे अध्यक्ष गणेश शिर्के यांनी ५०० पॉट उपलब्ध करून दिले आहेत. यावेळी वैशाली कुलकर्णी, शिरीष गोळवलकर, शांता येळबंकर उपस्थित होते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## तरूणास मारहाण; दोघांवर गुन्हा दाखल


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ डिसेंबर -**
राग मनात धरून शिवीगाळ करत तरुणास मारहाण केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १९ डिसेंबर रोजी रात्री दहा वाजण्याच्या दरम्यान शेळगी येथील आदेश नगर येथील बागवान यांच्या किराणा दुकानाच्या समोरील सार्वजनिक रस्त्यावर घडली.

याप्रकरणी शेकुंबर गुंडुलाल तांबोळी (वय २७, रा. मित्र नगर, आर के हॉलच्या समोर, शेळगी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन प्रदीप गोरख कांबळे (रा. बालाजी सोसायटी) व अब्दुल जावीद मणियार (रा. आदेश नगर, शेळगी) यांच्याविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. तांबोळी हे त्यांच्या ताब्यातील पिकअप वाहन मधून मंडपाचे साहित्य आणण्यासाठी जात होते. तांबोळी हे शेळगी येथील आदेश नगर येथील बागवान यांच्या किराणा दुकानाच्या समोरील सार्वजनिक रस्त्यावर आले असता, अब्दुल मणियार याने एकमेकांशी रस्त्यावरती जोरजोरात शिवीगाळ करून गच्ची पकडून भांडण करीत असताना तांबोळी यांनी त्यांना रस्ता सोडा जाऊ द्या असे म्हणाले. त्यावेळी अब्दुल याने तो राग मनात धरून तांबोळी यास शिवीगाळ करून वाहनातून खाली ओढून लाथा बुक्क्यांनी मारहाण करून खाली पडलेला दगड वाहनावर मारून काच फोडून आर्थिक नुकसान केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोलीस हवालदार जगताप हे करीत आहेत.

## क्राईम वृत्त...

### तरूणाची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर, दि. २१ डिसेंबर -**
शहरातील एमआयडीसी परिसरातील शिवलिंग नगरात राहणाऱ्या तरूण चालकाने गळफास घेऊन आत्महत्या केली. प्रभाकर जटींगराया देसाई (वय ३१, रा. शिवलिंग नगर भाग ५ सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या तरूणाचे नाव आहे. प्रभाकर देसाई हे चालक म्हणून काम करीत होते. २१ डिसेंबर रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास प्रभाकर देसाई यांनी अज्ञात कारणावरून घरातील लोखंडी अँगलला साडीने गळफास घेतला. ही बाब निदर्शनास आल्यानंतर एमआयडीसी पोलिस ठाण्यातील पोलिस हवालदार ए एन शिंदे यांनी देसाई यांना खाली उतरवून बेशुध्दावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. पुजा यांनी देसाई यांना मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



### धाकट्या राजवाड्यात विषारी औषध पिऊन एकाचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. २१ डिसेंबर -**
शहरातील कोंतम चौक येथील धाकटा राजवाड्यात एकाने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. दिपक विश्वनाथ गायकवाड (वय ५५) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्याचे नाव आहे. दिपक गायकवाड यांनी २१ डिसेंबर रोजी दुपारी राहत्या घरी अज्ञात कारणावरून विषारी औषध प्राशन केले. त्यामुळे त्यांना त्रास होऊ लागल्याने पत्नी लक्ष्मी गायकवाड यांनी दिपक यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### थांबलेल्या वाहनाला धडक दिल्याने एक जण जखमी

**सोलापूर, दि. २१ डिसेंबर -**
सोलापूर ते मंगळवेढा रोडवरील कामती गावाजवळील कटरे मंगल कार्यालयाजवळ रोडवर थांबलेल्या चारचाकी वाहनास धडक दिल्याने एक जण जखमी झाला. किसन तातोबा चौगुले (वय ४५, रा. डोंगरगाव, ता. मंगळवेढा) असे जखमीचे नाव आहे. २१ डिसेंबर रेजी दुपारी किसन चौगुले हे मंगळवेढा ते सोलापूर शहर असे निघाले होते. त्यावेळी कटर मंगल कार्यालयाजवळ रस्त्यावर थांबलेल्या चार चाकी वाहनास पाठीमागून धडक दिल्याने त्यास किसन चौगुले हे जखमी झाले. त्यामुळे त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### शेतीच्या वादावरून तरूणीस मारहाण

**सोलापूर, दि. २१ डिसेंबर -**
कातेवाडी (ता. मोहोळ) येथील तरूणीस शेतीच्या वादावरून मारहाण करून जखमी करण्यात आले. मुक्ताबाई प्रताप साळुंखे (वय १९, रा. कातेवाडी) असे जखमी तरूणीचे नाव आहे. २१ डिसेंबर रोजी सकाळी ९ च्या सुमारास राहत्या घराजवळ शेतीच्या वादावरून मुक्ताबाई हिस विकास साळुंखे व इतर तीन जणांनी मिळून दगडाने व लाथाबुक्क्याने मारहाण केली. यामध्ये मुक्ताबाईच्या सर्वांगास मार लागून जखमी झाल्याने तिला उपचारासाठी पती प्रताप यांनी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



### बोळकोट नगरात हॅण्डल लॉक तोडून दुचाकी पळवली

**सोलापूर, दि. २१ डिसेंबर -**
बोळकोटे नगर येथे हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी चोरट्याने चोरून नेली. याबाबत विजय गोपाळ कुरापट्टी (वय २८, रा. शिरालिंग नगर, जुना विडी घरकुल) यांनी एमआयडीसी पोलीस ठाणे फिर्याद दाखल केली आहे. १० डिसेंबर रेजी रात्री आकराच्या सुमारास कुरापट्टी यांनी त्यांची मोटारसायकल क्रमांक एमएच १३ डीएफ ९४२८ ही बोळकोटे नगर येथे हॅन्डल लॉक करून पार्क करून ठेवलेली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याने अज्ञात चोरट्याविरुद्ध जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार उबाळे हे करीत आहेत.

# कांद्याचा वांदा २० कोटींची उलाढाल ठप्प

## दोन दिवस कांदा मार्केट यार्डमध्ये पडून | माथाडी कामगारांचे कामबंद आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ डिसेंबर-**
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल अवमानकारक शब्दांचा वापर केल्याने सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती मधील हमाल माथाडी कामगारांनी कामबंद आंदोलन पुकारले. कामबंद आंदोलनामुळे यार्डामध्ये विक्रीसाठी आणलेला शेतकऱ्यांचा कांदा जागेवरच पडून राहिला. माथाडी कामगारांच्या कामबंद आंदोलनामुळे कांद्याचा लिलाव झाला नाही. तब्बल दोन दिवस कांदा बाजार समितीमध्येच पडून असल्याने, शेतकऱ्यांचे मोठ्या नुकसान झाले तर पर्यायाने बाजार समितीची देखील कोटींची उलाढाल ठप्प पडली आहे.



केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या वक्तव्याचे शहरात पडसाद उमटत आहेत.

दरम्यान, यारामध्ये दुसऱ्या दिवशीही माथाडी कामगारांचे आंदोलन झाले. लिलाव झालेला कांदा ट्रकमध्ये भरण्यास कामगारांनी नकार दिला. त्यामुळे सुमारे ४० हजार ७१४ क्विंटल कांदा बाजार समितीमध्येच पडून राहिला. गुरुवार दि. १९ डिसेंबर रोजी झालेल्या आंदोलनाने शेतकरी अडचणीत आले, होते तर शुक्रवार दी.२० डिसेंबरच्या आंदोलनामुळे व्यापारी अडचणीत आले आहेत. कामगारांनी रात्री अचानक कामबंद आंदोलन केल्यामुळे बुधवार दि.१८ डिसेंबर या रात्री आलेला ४०७ ट्रक कांदा गेल्या ६० तासांपासून बाजार समितीच्या सेल हॉलमध्ये पडून आहे. बाजार समितीत सलग दोन दिवस कांद्याची आवक नसल्याने तब्बल २० कोटी रुपयांहून अधिक रकमेची उलाढाल ठप्प झाली आहे. आज शनिवारी नवीन कांद्याची आवक झाली नाही त्यामुळे, देखील कांद्याची लिलाव बंदच होते. हमाल माथाडी कामगारांनी कामबंद आंदोलन पुकारल्याने आमचा कांदा कवडीमोल दराने विक्री करण्याची वेळ आली आहे.



### शनिवारी उलाढाल ठप्प

शनिवारी कोणताही नवीन कांदा बाजार समितीमध्ये लिलावासाठी आणला नाही. यापूर्वीचा ४० हजारहून अधिक क्विंटल कांदा लिलाव करून तो बाजार समिती मधून बाहेर काढण्यात येईल. त्यानंतर नवीन कांद्याचे लिलाव होतील. परंतु आज कांद्याची आवक झाली नाही. दोन दिवसांमध्ये सुमारे २० कोटीहून अधिक रुपयांची उलाढाल ठप्प झाली.

**- दत्तात्रय सूर्यवंशी, सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती सोलापूर.**

### कांद्याचे दर घसरणार

कामगारांनी अचानक लिलाव न करण्याचे घोषित करून बंद पुकारला. त्यामुळे बाजार समितीत आलेल्या शेतकऱ्यांना मानसिक व शारीरिक त्रास झाला. ७७ पाकिटे कांदा विक्रीसाठी आणला होता. कांदा चोरीला जाण्याच्या भीतीने रात्रभर पोत्याजवळ बसून होतो. कांदा लिलाव होणार नसल्याचे कळल्यानंतर दर घसरण्याची चिंता सतावत आहे. रात्रभर आणि दिवसा शेतकऱ्यांना कोणतीही सुविधा मिळाली नाही.

**- सुनील पाटील, कांदा उत्पादक शेतकरी हत्तुर.**

### कांद्याचे भाव वाढल्यानंतर डोळ्यात पाणी येते

केवळ कांद्याचे भाव वाढल्यानंतर गृहिणींच्या डोळ्यात पाणी येते का? इतर वस्तू महाग झाल्यानंतर तुम्ही गप्प का बसता. जेव्हा कांद्याचे दर घसरतात तेव्हा शेतकऱ्यांच्या डोळ्यातून पाणी निघते. साधे उत्पादन खर्च देखील निघत नाही. आज कांदा लिलाव बंद पडला उद्या दर घसरणार अशावेळी आम्ही काय करायचे.

**- शशिकांत पाटील, कांदा उत्पादक शेतकरी**



## सोलापुरातून तत्काळ विमानसेवा सुरू करा

### खा.शिंदे यांचे केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्र्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ डिसेंबर -**
गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सोलापुरातील विमानसेवेच्या प्रश्नावर खासदार प्रणिती शिंदे यांनी पुन्हा एकदा पाठपुरावा सुरू केला आहे. सोलापुरातून लवकरात लवकर विमानसेवा सुरू व्हावी यासाठी खासदार प्रणिती शिंदे यांनी शुक्रवारी केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री राममोहन नायडू किंजरापु यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले.

सोलापूरच्या विकासासाठी विमानसेवा अत्यावश्यक असल्याचे नमूद करत त्यांनी मुंबई, दिल्ली, हैदराबाद, तिरुपती यासारख्या प्रमुख शहरांमध्ये थेट विमानसेवा सुरू करण्याची मागणी केली आहे. तसेच, बोरामणी येथील विमानतळाचा विकास करावा, अशी मागणीही त्यांनी निवेदनाद्वारे सादर केली. खासदार प्रणिती शिंदे यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत मंत्री नायडू यांनी येत्या काही दिवसांत सोलापुरातून नियमित विमानसेवा सुरू करण्यासंदर्भात कार्यवाही केली जाईल व बोरामणी आंतरराष्ट्रीय विमानतळाचा प्रश्नही लवकरच मार्गी लावू असे आश्वासन दिल्याचे प्रणिती शिंदे यांनी सांगितले.

### होटगी विमानतळाचा प्रश्न प्रलंबित...

सोलापूर शहरातील होटगी येथील विमानतळाचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. काही महिन्यांपूर्वीच या विमानतळाचे नुतनीकरण करण्यात आले आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते त्याचे लोकार्पण करण्यात आले. त्यानंतर सोलापुरातून विमानसेवा लवकरच सुरू होईल अशी अपेक्षा होती. सोलापूर विमान प्राधिकरणाने काही विमान कंपन्यांशी बोलणी केली होती. यानुसार, फ्लाय ९१ या विमान कंपनीने २३ डिसेंबरपासून सोलापूर-मुंबई आणि सोलापूर-गोवा या मार्गांवर विमानसेवा सुरू करण्याची घोषणा केली होती. परंतु, अद्याप कोणत्याही प्रकारची सेवा सुरू झालेली नाही. विमानतळ उड्डाणासाठी सज्ज असले तरी काही त्रुटी असल्याचे विमान कंपन्यांकडून सांगण्यात येत आहे. विशेषत: इंधन भरण्याची सुविधा उपलब्ध नसल्याने विमानसेवा उशीराने सुरू होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## प्रवासी करणाऱ्या महिलेचे सव्वा लाखांचे गंठण लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ डिसेंबर -**
एस टी बसमधून प्रवास करणाऱ्या महिलेच्या पर्समधून चोरट्याने १ लाख २५ हजार रूपये किंमतीची सोन्याचे गंठण अज्ञात चोरट्याने चोरून नेले. ही घटना २० डिसेंबर रोजी दुपारी रंगभवन ते शांती चौक पाण्याची टाकी या दरम्यान घडली.

याबाबत रूपाली पवन कवडे (वय ३०, रा. क्रिस्टल गार्डन, ब्लॉक नं. २, प्लॉट नं. ८, डी मार्ट, किवळे देहू रोड, पिंपरी, पुणे सध्या रा. शिरवळ, ता. अक्कलकोट) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



२० डिसेंबर रोजी रूपाली कवडे या पुणे येथून रेल्वे गाडीने सोलापुरात आल्या. दुपारी तीनच्या सुमारास सोलापूर रेल्वे स्थानकासमोरील बस स्टॉप येथून अक्कलकोट येथे जाणाऱ्या बस मध्ये रुपाली कवडे या बसल्या. तेथून ही बस सात रस्ता-रंगभवन-सिव्हील रुग्णालय-पोलिस मुख्यालय-व्हिको प्रोसेस मार्गे अक्कलकोट रोडवरील शांती चौक पाण्याची टाकी येथे आली. त्यावेळी रुपला यांनी त्यांच्याकडील पर्स पाहिली असता त्यांना पर्समध्ये २५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे साखळीतील मिनी गंठण मिळून आले नाही. अज्ञात चोरट्याने कवडे यांच्या पर्समधून सोन्याचे गंठण चोरून नेल्याची नोंद जेलरोड पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार गंगावणे हे करीत आहेत.

## आंतरजातीय विवाह केलेल्या जोडप्यांसाठी सुरक्षागृह

### ● शासकीय विश्रामगृहातील एक कक्ष आरक्षित राहणार : राज्य शासनाचे आदेश

**तभा वृत्तसेवा । अमोल व्यवहारे**
**सोलापूर, दि. २१ डिसेंबर -**
आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह केलेल्या जोडप्यांसाठी शासकीय विश्राम गृहावरील एक कक्ष आरक्षित राहणार आहे. असा विवाह केलेल्या जोडप्यांना सुरक्षा देण्यासाठी राज्य शासनाने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. त्यानुसार प्रत्येक जिल्ह्यात सुरक्षागृहाची व्यवस्था केली जाणार आहे. हे सुरक्षागृह शासकीय विश्रामगृहात उपलब्ध करून दिले जाणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्य शासनाने आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना सुरक्षा देण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत १३ सप्टेंबर रोजी परिपत्रक काढण्यात आले होते. त्यात शासनाने सुधारणा केली आहे. या सुधारित परिपत्रकानुसार अशा जोडप्यांना सुरक्षा देण्याबाबत करण्यात येणाऱ्या उपाय



योजना स्पष्ट केल्या असून त्याची अंमलबजावणी करण्याचे आदेशही संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत.

आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह केलेल्या जोडप्यांसाठी विशेष कक्ष स्थापन करण्यात येणार आहेत. या कक्षाचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक, त्या कक्षातील सदस्यांची नावे ही सर्व अद्ययावत माहिती जिल्हानिहाय पोलिस महासंचालक तसेच संबंधित जिल्हा पोलिस अधीक्षक तसेच पोलिस आयुक्त यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अशा जोडप्यांना मदत तसेच माहितीसाठी ११२ या हेल्पलाईनवर फोन करता येणार आहे. अशा जोडप्यांची सर्व माहिती गुप्त ठेवली जाणार आहे. तसेच त्यांच्यासाठी असणाऱ्या सर्व सुविधांची माहिती देण्याबाबत सूचना करण्यात आल्या आहेत. त्यानुसार कर्मचाऱ्यांनी कार्यवाही करणे बंधनकारक असल्याचेही राज्य शासनाने काढलेल्या या परिपत्रकात स्पष्ट केले आहे. अशा जोडप्याला काही काळासाठी सुरक्षित राहण्याची व्यवस्था व्हावी याकरिता आता सुरक्षागृहे उभारण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. याकरिता प्रत्येक जिल्ह्यातील शासकीय विश्रामगृहाच्या ठिकाणी एक कक्ष आरक्षित ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. काही कारणास्तव या ठिकाणी कक्ष उपलब्ध न झाल्यास जिल्हा अथवा तालुक्याच्या ठिकाणी रिक्त शासकीय निवासस्थान याकरिता दिले जाणार आहेत.

**▸▸ जोडप्यांना मिळणार सुरक्षा...**
अजूनही अनेक ठिकाणी आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहाला विरोध होतो. त्यातून वादाचे, हाणामारीचेही प्रसंग उद्भवतात. परिणामी अशा जोडप्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न असतो. या सर्व पार्श्वभूमीवर विवाह झाल्यानंतर परिस्थिती पूर्वपदावर येईपर्यंत अथवा निवासाची व्यवस्था होईपर्यंत अशा जोडप्यांना सुरक्षा मिळणार आहे.

**▸▸ प्रसंगी भाडेतत्त्वावर खासगी निवासस्थान देणार**
विशेष म्हणजे याप्रमाणे निवास व्यवस्था करणे शक्य नसल्यास खासगी निवासस्थान भाडेतत्त्वावर घेण्यात येऊन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद सामाजिक न्याय विभागाकडून केली जाणार आहे.

## आता 'एक राज्य, एक गणवेश' संकल्पना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ डिसेंबर**
राज्यात येत्या शैक्षणिक वर्षापासून 'एक राज्य, एक गणवेश' ही संकल्पना राबवण्यात येणार आहे. त्यानुसार राज्यातील पहिली ते आठवीपर्यंतच्या सर्वच विद्यार्थ्यांना गडद निळ्या रंगाची पॅण्ट तर आकाशी रंगाचा शर्ट असा गणवेश असणार आहे. पूर्वीप्रमाणे मोफत गणवेशाची अंमलबजावणी शाळा व्यवस्थापन समितीमार्फत करण्यात येणार आहे. त्यासाठी केंद्र शासनाने निश्चित केलेल्या गणवेशाची रक्कम शाळा व्यवस्थापन समितीच्या खात्यावर जमा करण्यात येणार आहे; तसा शासन निर्णय शुक्रवारी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून महाराष्ट्र शासनाचे उपसचिव तुषार महाजन यांच्या स्वाक्षरीने काढण्यात आला आहे.

चालू शैक्षणिक वर्षात केंद्रीकृत पद्धतीने मोफत गणवेश योजनेचा लाभ देण्यासाठी इचलकरंजीच्या एका ठेकेदाराला ठेका देण्यात आला होता. मात्र, त्या ठेकेदारामार्फत विद्यार्थ्यांना वेळेत गणवेश मिळाले नाहीत. यासंदर्भात प्रसारमाध्यमांसह पालक, शिक्षक संघटना, लोकप्रतिनिधी यांनी राज्य शासनाकडे पूर्वीप्रमाणेच विकेंद्रीकरण पद्धतीने पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शालेय गणवेश देण्यात यावा, अशी मागणी लावून धरली होती. यावर शासनाने सकारात्मक निर्णय घेत पूर्वीप्रमाणेच गणवेश वाटपाची जबाबदारी शालेय व्यवस्थापन समितीवर सोपवली आहे.

दरम्यान 'एक राज्य, एक गणवेश' या संकल्पनेनुसार



पहिली ते आठवीमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना एकसारखे दोन गणवेश देण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या गणवेशाची रचना आकाशी रंगाचा शर्ट आणि गडद निळ्या रंगाची हाफ-फुल पॅण्ट अशी असणार आहे. विद्यार्थिनींच्या गणवेशाची रचना आकाशी रंगाचा बाह्या असलेला शर्ट व गडद निळ्या रंगाचा पिनो-फ्रॉक, आकाशी रंगाचा शर्ट व गडद निळ्या रंगाचा स्कर्ट तसेच ज्या शाळांमध्ये विद्यार्थिनींना सलवार-कमीज असा गणवेश असेल तर गडद निळ्या रंगाची सलवार व आकाशी रंगाची कमीज असा गणवेश असणार आहे. विद्यार्थिनींना केंद्र शासनाने निश्चित केलेल्या गणवेशाच्या रकमेमध्ये राज्य शासनाने निर्धारित केलेल्या रंगानुसार इयत्तेनिहाय पिनो-फ्रॉक,शर्ट-स्कर्ट,सलवार-कमीज देण्याचा निर्णय घेण्याची व योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी शाळा व्यवस्थापन समितीवर सोपवण्यात आली आहे.

## शिक्षक भारतीचे बोंबाबोंब आंदोलन तात्पुरते स्थगित

### सीईओ कोहिनकरांनी मागण्या पूर्ण करण्याचे दिले आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ डिसेंबर**
सोलापूर जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग व संघटना यांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना सीईओ यांच्याकडून देण्यात आल्याने संघटनेने शुक्रवार दि.२० डिसेंबर रोजी पुकारलेल्या बोंबाबोंब आंदोलनाला आज शनिवारी तात्पुरती स्थगिती दिली आहे. तसेच संघटनेच्या निवेदनावरती तात्काळ कार्यवाही करण्यात येईल आणि गुरुवार दि. २६ डिसेंबर रोजी याबाबत संघटनेची आढावा बैठक घेण्यात येईल असे आश्वासन सीईओ यांच्याकडून देण्यात आल्याचे संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुजितकुमार काटमोरे यांनी सांगितले.

दरम्यान, सोलापूर जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी जगताप यांच्या विरोधात बोंबाबोंब आंदोलन करण्याचे निवेदन शिक्षक भारतीच्या वतीने जिल्हा परिषदेच्या सीईओ यांना देण्यात आले होते. यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर यांनी माध्यमिक शिक्षणाधिकारी व शिक्षक भारती संघटनेचे पदाधिकारी यांची गुरुवार दि. १९ डिसेंबर रोजी सुनावणी घेतली होती.

शिक्षक भारती संघटनेच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनातील विषयावर आठ दिवसात कामकाज पूर्ण करावे, असे सीईओ यांच्याकडून सांगण्यात आले. बोगस मान्यता चौकशी व कारवाई बाबत शिक्षण उपसंचालक पुणे विभाग यांच्याशी चर्चा करून माध्यमिक शिक्षण विभागास पत्र व्यवहार केला जाईल असे सीईओ यांनी सांगितले.

माहितीच्या अधिकारातील माहिती अर्जदारास उपलब्ध करून देण्याविषयी सूचना करण्यात आल्या. यावेळी विजयकुमार गुंड, देवदत्त मेटकरी, शाहू बाबर, मायाप्पा हाके, बाळकृष्ण गायकवाड, शिवराज विभुते आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### शुक्रवारचे बोंबाबोंब आंदोलन तात्पुरते स्थगित

माहिती अधिकार व बोगस मान्यता कारवाई या प्रमुख मागण्या पूर्ण होण्यासाठी संघटनेने प्रदीर्घ लढा दिलेला आहे. तक्रारीची दखल माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी न घेतल्याने बोंबाबोंब आंदोलन करण्याचा निर्णय संघटनेच्या वतीने घेण्यात आला होता. परंतु सीईओ कोहिनकर यांनी दिलेल्या आश्वासनामुळे शुक्रवारचे बोंबाबोंब आंदोलन तात्पुरते स्थगित करीत आहोत.

**- सुजितकुमार काटमोरे, जिल्हाध्यक्ष शिक्षक भारती, सोलापूर**

# संघविचाराची ७५ वर्षे जगलेला माणूस



**विश्वनाथ बेंद्रे आणि महापालिका हे समीकरण सोलापुरातील सर्व जनता जनदिनापर्यंत पोहचलेले सूत्र आहे. वास्तविक १९८५ ते २००२ असा १७ वर्षांचा काळा बेंद्रेंनी महापालिकेत नगरसेवक म्हणून गाजवला. या १७ वर्षात महानगरपालिकेची ५ वेळा विरोधी पक्षनेता म्हणून जबाबदारी स्वीकारली.**

या विरोधी पक्षनेत्यांच्या काळातच सत्ताधारी पक्षाशी अनेक विषयात सोलापूरच्या ज्वलंत प्रश्नांवर वादविवाद करून त्यांनी स्वतःची वेगळी ओळख करून दिली. आणि ती ओळख म्हणजेच बेंद्रे व महापालिका हे समीकरण.

विश्वनाथ बेंद्रे हे लहानपणापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांशी बांधील राहिले आहेत. वडील पोलीस खात्यात काम करत होते त्यांच्या घरात दरारा होता. मात्र आई ही एखाद्या कार्यकर्त्याची आई कशी असावी याचा आदर्श होती.

विश्वनाथ बेंद्रे यांनी लहानपणापासून स्वतःच्या करियरचा किंवा भविष्याचा विचार न करता सामाजिक प्रश्न व सामाजिक काम यातच गुंतून राहण्याचा अग्रक्रम दिला. महाविद्यालयीन काळापासून ते त्यावेळेच्या जनसंघ युवक आघाडीचे काम करीत. महाविद्यालयीन काळात महाविद्यालयीन विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून निवडणूक लढवून त्यात ते यशस्वी झाले. त्यानंतर आईच्या आग्रहाखातर मा. वसंतराव भागवतांच्या सहकार्याने लक्ष्मी विष्णू मिलमध्ये नौकरी केली. मधल्या काळात रसपानगृह चालविणे, फटाके विक्रीचा व्यवसाय करणे त्यातही फटाके विक्रेत्यांची संघटना असावी म्हणून त्यांची ही संघटना बांधणी १९८५ च्या काळात महाराष्ट्राच्या राजकारणात काँग्रेसविरोधी सर्व पक्ष एकत्र येऊन पुलोद आघाडीच्या नावाने महापालिकेच्या निवडणूका झाल्या. त्यात विश्वनाथ बेंद्रे हे जनसंघाच्या विचाराचे नगरसेवक निवडून आले. महाराष्ट्राच्या राजकारणातील त्यावेळचे अग्रगण्य नेते मा. वसंतराव भागवत, मा. प्रमोदजी महाजन, मा. गोपीनाथजी मुंढे, मा. उत्तमराव पाटील, आ. विश्वास गांगुर्डे, मा. प्रकाश जावडेकर यासर्वांशी त्यांचे अत्यंत घरोबाचे संबंध होते. या सर्वांच्या पाठिंब्यावर त्यांनी महानगरपालिकेत अनेक प्रश्नांना वाचा फोडली व एक अभ्यासू नगरसेवक म्हणून स्वतःची वेगळी प्रतिमा निर्माण केली. सत्ताधारी पक्षात सतत धारेवर धरणारे विश्वनाथ बेंद्रे यांचे सर्वच राजकिय पक्षाच्या नगरसेवकांच्या मैत्रीचे संबंध ठेवण्यात त्यांची वेगळी हातोटी होती. एक परिवाराच्या विचाराचा नगरसेवक असल्यानेच महानगरपालिकेच्या एका शाळेत स्व. शामाप्रसाद मुखर्जी यांचे नाव देण्याचा आग्रह धरून तो यशस्वी करणे हे इतरांपेक्षा वेगळेपणसिद्ध करणारे आहे.

विश्वनाथ बेंद्रे यांची नगरसेवकांच्या कामाव्यतिरिक्त सावरकर प्रेमी अशी ही ओळख आहे. सोलापुरात सावरकरांचा पुतळा असायला हवा हा त्यांच्या अनेक वर्षांचा आग्रह होता. यासाठी अनेक वर्ष लढा देवून शेवटी महानगरपालिके समोर उपोषणाचा मार्ग अवलंबिला. तत्कालीन मनपा पक्षनेते मा. आ. युनूस भाई शेख यांनी मध्यस्थीकरून हा पुतळा बसविण्याचे ठरले. कालांतराने अशोक चौक येथील उद्यानात दिमाखात विराजमान झाला. पण एवढ्यावर स्वस्त बसणारे बेंद्रे कसे? सावरकरांच्या जीवनावरील प्रसंग व काव्य अत्यंत सुंदर पद्धतीने साकारून घेतले त्यासाठी निरनिराळ्या आमदारांकडून निधी उपलब्ध करून घेतला. शासनाच्या माध्यमातूनही सहकार्य मिळविले. शासनाचे सर्व अधिकारी कामाला लावून पाठपुरावा करून चिकाटीने हे सर्व काम केले. आता तो पुतळ्याचा परिसर उड्डाण पुलाखाली जाणार असल्याने पुतळा दुसऱ्या बागेत स्तलांतरित करणे पुन्हा त्याचे सुशोभीकरण, बाग सावरकरांच्या जीवनावरील प्रसंग दृकश्राव्य पद्धतीने सादरीकरण यासाठी शासनाकडे पाठपुरावा करून तीन कोट रुपये मंजूर करून घेतले व थोड्याच दिवसात त्याचे काम सुरु होईल. या विषयावर सर्व सावरकर प्रेमींच्या सदिच्छा त्यांच्या बरोबर आहेतच.

याशिवाय विश्वनाथ बेंद्रे यांनी त्यांचे आदर्श स्वर्गीय वसंतराव भागवत यांची कायम स्मृती ठेवण्यासाठी त्यांच्या नावाने संस्था सुरु केली. त्यामध्ये अशोक नावरे, रवी बंडे, डॉ. गुंजोटीकर, सुधीर देव, चंद्रकांत येरनाळे, संजय ननवरे, संजय चाबुकस्वार, संतोष कुलकर्णी या सर्वांच्या सहकार्याने संस्था उभी करून नावारूपाला आणली. या संस्थेच्या माध्यमातून अनेक गोरगरिबांचे मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर भरवून केल्या. याचे श्रेय कै. डॉ. श्याम तोष्णीवाल यांना द्यावे लागेल, त्यांनी खूप मोठे सहकार्य बेंद्रे यांना केले.

सिव्हिल हॉस्पिटलच्या पाठीमागे असणाऱ्या महात्मा फुले झोपडपट्टीस आम्ही विद्यार्थी परिषदेचे कार्य करित असताना संस्कार केंद्र चालवत होतो. त्याचा कायापालट करण्यासाठी तेथील आमचे सहकारी श्री जकप्पा कांबळे यांच्या सहकार्यानले पक्की घरे देण्याचा प्रयत्न केला. व दीनदयाळ समाज मंदिर उभे केले. राजकीय व सामाजिक कार्य करित असताना अनेक विषयावर पुस्तके लेखनाचेही कार्य त्यांनी केले. सोलापूर महानगरपालिका पाणीपुरवठा दृष्टीकोन यावर पुस्तक लिहून त्यांनी महाराष्ट्र स्तरावरचा पुरस्कार मिळविला. तर जनसंघ ते भारतीय जनता पार्टी या विषयावर अनेक लेख संपादित करुन अनेक जुन्या ज्येष्ठ नेत्यांचा परिचय करुन दिला. यासाठी ज्येष्ठ पत्रकार मा. अरविंद जोशी यांनी मोलाची मदत केली. तसेच वसंत सेवा हे मा. वसंतराव भागवतांच्या वरती पुस्तक लिहून त्यांच्या प्रती असणारा आदर व्यक्त केला. महाराष्ट्राच्या सध्याच्या राजकीय पक्षातील हेवेदावे व विरोध करण्याच्या पध्दती पाहिल्यावर विश्वनाथ बेंद्रे यांच्या त्या काळातील सर्वच राजकीय पक्षातील कार्यकर्त्यांना हेवा वाटू लागतो. वैचरिक वाद सोडून कौंटुबिक मैत्री व सामाजिक मैत्री कशी जपावी याची उजळणीच विश्वनाथ बेंद्रे यांच्या पंच्याहत्तरी निमित्ताने कराविशी वाटते. विश्वनाथ बेंद्रे यांनी सुरुवातीच्या काही व्यवसाय केले असतील. पण केवळ उपजिविका हाच दृष्टीकोन होता. उद्योगपती होण्याचे स्वप्न नव्हते. मात्र सामाजिक कार्यात अनेक उद्योग व लष्कराच्या भाकरी भाजले हे प्रांजळपणे केले. कौटुंबिक यशस्वीतेबाबत संपूर्ण श्रेय आमच्या बेंद्रे वैहीणी सौ. वैजयंती बेंद्रे यांच्याकडे जाते. दोन्हीही सुपुत्र चि.वैभव व गौरव त्यांना संस्कार व शिक्षण हे चांगल्या पद्धतीने दिल्याने ते आज स्वत:च्या पायावर चांगल्या रितीने उभे असून समाजात मुलांनी स्वत:चे स्थान निर्माण केले आहे. दोन गोड नातवासह ते आज पूर्ण समाधानी आयुष्य जगत आहे.

विश्वनाथ बेंद्रे हे अशा अर्थाने संघ विचाराने भारलेले व्यक्तिमत्व म्हणणेच योग्य वाटते. समाज जीवनातील अनेक टप्पे ओलांडून विश्वनाथ बेंद्रे हे ७५ वर्षांचे झाले. हे सांगून खरे वाटत नाही. अशा माझ्या मोठ्या भावाना निरामय दिर्घायुष्य लाभो, हिच सिद्धरामेश्वराच्या चरणी प्रार्थना.



**- रोहिणी तडवळकर,**
**सरचिटणीस, भारतीय जनता पार्टी,**
**सोलापूर शहर, जिल्हा**


# सावरकर प्रेमी माजी नगरसेवक : विश्वनाथ बेंद्रे...

**माजी नगरसेवक विश्वनाथ बेंद्रे यांचा आज ७५ वा वाढदिवस साजरा होत आहे. त्यानिमित्त...**

सोलापूर महानगरपालिकेतील माजी नगरसेवक विश्वनाथ बेंद्रे यांचा अमृत महोत्सवी वाढदिवस गांधीनगर येथील हेरिटेज लॉन्स वर आयोजित करण्यात आला आहे. १९८५ ते २००२ अशी तब्बल १८ वर्षे त्यांनी महानगरपालिकेत काम केले. त्यापैकी दोन वेळा ते विरोधी पक्षनेता होते. यानिमित्ताने त्यांच्याशी झालेल्या अनौपचारिक गप्पा.

राजकीय जीवनात चार वेळा लाठीमार सोसल्याचे सांगत बेंद्रे यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉक्टर हेडगेवार जन्मशताब्दी सांगता सोहळ्यामध्ये आम्ही एक रॅली काढली होती. त्यावेळी मुश्रीफ यांनी अचानक लाठीमार सुरू केला. डॉक्टर हेडगेवार यांचा फोटो रस्त्यावर पडल्यामुळे तो फोटो उचलण्यासाठी माझी धडपड चालू होती. त्याचवेळी पोलिसांनी जोरदार लाठीमार केल्यामुळे डोक्याला आठ टाके पडले होते. संपूर्ण पाठीवर लाठीमाराचे लाठीमाराचे वळ उमटले होते. सोलापुरात नवरात्रामध्ये झालेल्या दंगलीत २००२ मध्ये लाठीमार झाला होता. त्यावेळीही पोलिसांच्या लाठ्या सहन केल्या. अयोध्या येथून वादग्रस्त ढाच्या पडल्यानंतर परतत असताना एका कॉलेजमध्ये डांबून ठेवण्यात आले होते. तेथेही पोलिसांनी अचानक येऊन सर्वांनाच लाठीमाराचा प्रसाद दिला होता.

जॉर्ज फर्नांडिस यांनी महिनाभर रेल्वे बंद घडवून आणला होता.त्यावेळी झालेल्या लाठीमारात मला पहिल्यांदा लाठीमार झेलावा लागला होता. दलित आणि हिंदू यांच्या परस्पर विरोधी आंदोलनामध्ये १९... मध्ये एकदा लाठीमार सहन करावा लागला. १९७५ मध्ये आणीबाणी लागू झाल्यानंतर मला तुरुंगवासही भोगावा लागला होता. महापालिकेतील कारकिर्दीची सुरुवात कशी झाली या प्रश्नावर बेंद्रे म्हणाले की दहा ते बारा वर्षे राजकारणात निष्ठेने काम केल्यानंतर नगरसेवक पदासाठी पक्षाने उमेदवारी दिली होती. रमेश महामुनी राजन कामत आणि धर्मा भोसले या तिघांचा पराभव करून तीन वेळा महापालिकेची निवडणूक जिंकली होती अशी आठवण त्यांनी सांगितली. रफिक हत्तुरे यांच्याकडून मात्र मला पराभव स्वीकारावा लागला होता. २००२ च्या दंगलीतील एक आठवण सांगताना बेंद्रे म्हणाले की, पेंटर चौकातील डॉक्टर गुंजोटीकर रुग्णालयातून मला दूरध्वनी आला. या रुग्णालयातील पेशंट तसेच कर्मचारी खायला काहीही न मिळाल्याने अत्यंत अडचणीत आले होते. शहरात संचारबंदी असल्यामुळे पेशंटच्या नातेवाईकांना घरी देखील जाता येत नव्हते. चार खणाचे जेवणाचे डबे दोन पिशव्यात भरून मी आणि माझा मुलगा दुचाकीवरून जात असताना पोलिसांनी अडवले. महापालिकेचे अधिकारी राजेंद्रकुमार त्याच वेळेस पेंटर चौकातून जात होते. पोलीस लाठीमार करण्यासाठी येत असल्याचे त्यांनी पाहिले आणि गाडीतून खाली उतरून पोलिसांना रोखले. महापालिकेतील हे माजी नगरसेवक आहेत. अतिशय शिस्तबद्ध काम करणारे म्हणून यांची ख्याती आहे. विनाकारण रस्त्यावर येणार नाहीत असे सांगत त्यांनी चौकशी केली. आम्ही रुग्णालयात जात असून रुग्णांना जेवणाचे डबे पोहोचवत असल्याचे सांगितले. त्यांनी तातडीने दखल घेऊन आम्हाला रुग्णालयात पाठवण्याची व्यवस्था केली आणि नंतर संचारबंदीचा स्पेशल पास देखील घरपोच पाठवला. त्या वेळचे गृहमंत्री आर. आर. पाटील राजेश कुमार यांना माझ्यासमोरच म्हणाले की, अशी कामे फक्त संघ परिवाराचेच लोक करू शकतात. दोन वर्षांपूर्वी हृदयाच्या बायपास सर्जरीला सामोरे गेलेले बेंद्रे काहीसे थकल्यासारखे जाणवतात मात्र त्यांचा उत्साह आणि आत्मशक्ती कायम आहे. सोलापूर आतील सावरकर पुतळा आठवड्याचे काम करावयाचे आहे. त्यासाठी संपूर्ण आराखडा आर्किटेक्ट हरी संगम यांनी तयार केला होता. परंतु त्यांचे अचानक निधन झाल्यामुळे आता वारसदार करण्याचे नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेट आणावे असा सल्ला महापालिकेत देण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. चार कोटी रुपयांचा हा मोठा प्रोजेक्ट असून योग्य आर्किटेकच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करावयाचा आहे अशी तळमळ त्यांनी बोलून दाखवली. सावरकरांच्या पुण्यतिथीला सोलापुरात त्यांनी मान्यवरांची व्याख्याने आयोजित केलेली आहेत. सोलापुरात विद्यानगर परिसरात त्यांचे घर होते. राजकीय गुरू स्व. वसंतराव भागवतांच्या नावाने धर्मादाय संस्था सुरू करून मोफत नेत्र चिकित्सा व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीरे भरवून स्वा. सावरकरांनी दिलेल्या देहाकडून देवाकडे जाताना मध्ये देश लागतो व त्या देशाचे मी देणं लागतो या संदेशाप्रमाणे त्याचे आचरणही केले. श्री बेंद्रे यांचा मुलगा वैभव सुरत येथे अंडरग्राउंड मेट्रो कंपनीत मोठ्या पदावर आहे. धाकटा मुलगा गौरव केअर हेल्थ इन्शुरन्स मध्ये मॅनेजर म्हणून सोलापुरात कार्यरत आहे. दोन्ही मुलांना एकेक मुलगा आहे. संघाचे संस्कार मुलांवर असले तरी, सध्याचे सरसंघचालक मोहन भागवत कधी कधी अडचणीत आणणारे सल्ले( कमीत कमी तीन मुले ) देत असतात,असे त्यांनी सांगितले. पत्नी सौ. वैजयंती यांनी त्यांना मोलाची साथ दिली आहे. आणि संसार सांभाळत मुलांना राजकारणात येऊ नका असा सल्ला देत वाढविले आहे.




### अयोध्या अनुभव आणि पोलीस प्रोटेक्शन

अयोध्या येथील वादग्रस्त ढाचा पाडण्यात आल्यानंतर सोलापुरातील एका दैनिकाला बेंद्रे यांनी मुलाखत दिली होती. अयोध्येतील ढाचा पाडण्याचे अनुभव त्यांनी कथन केले होते. त्यावेळी वातावरण अत्यंत गढुळलेले असल्यामुळे पोलीस आयुक्तांनी त्यांना कार्यालयात पाचारण केले. सबुरीचा सल्ला दिला आणि घरापाशी दोन पोलिसांचा बंदोबस्त पाठवला होता. अर्थात त्यावेळी पोलीस आयुक्तांनी देखील आयोध्यातील तुमचे अनुभव सांगा, असे म्हटल्यावर माझा तणाव दूर झाला होता, असेही बेंद्रे यांनी स्पष्ट केले.

# अजान आणि चालिसा

मुबारक शेख हे चतु:रस्त्र प्रतिभेचे कवी आहेत. रुळलेली, मळलेली वाट नाकारून वेगळ्या अन् नव्या वाटेने त्यांची कविता प्रवास करते.' अजान आणि चालिसा हा त्यांचा कवितासंग्रह! पुण्याच्या राजहंस प्रकाशनने प्रकाशित केला आहे. 'अजान आणि चालिसा' हा विषय सर्वश्रुत असला तरी या विष्यच्या अनुषंगाने कुणी लिहिल्याचे वाचनात आलेले नाही. मुबारक शेख यांनी मात्र यावर रोखठोक भूमिका मांडत सभोवतालात निर्माण झालेल्या व्दव्यांदात्मक परिस्थितीवर मार्मिक भाष्य नोंदविले आहे. सामाजिक प्रश्नांचे भान सजग असलेल्या या कवीने राजकारण धर्म-कारण, सत्ताकारण, अर्थकारण यात घडत असलेल्या स्थित्यंतरातील वास्तवाची निष्पक्षपणे नोंद घेतली आहे. वर्षानुवर्षे इथे एकोप्याने राहणाऱ्या विविधांगी समाजात केवळ सत्तेसाठी व व्दषाची पेरणी करून त्यांना आपापसात सतत झुंजवत ठेवणे, ही गोष्ट खचितच देशहिताची ठरू शकत नाही, या संविधान ही अनुमती देत नाही. ही बाब सगळ्यांनीच ध्यानात घ्यायला हवी. त्यांच्या अजानचा आवाज खाली आणण्यासाठी यांनी चालिसाचा घाट घातला दबला गेला, दाबला गेला अवामचा आवाज आतला सत्तापिपासू नेत्यांच्या स्वार्थापणावर कवीने कोरडे ओढले आहेत. तसेच स्व:ताचा सौदा न करायाचे तमाम जनतेला आवाहन ही केले आहे. स्वत्वाचा दरख्त लोकशाहिच्या मातीतून इतपत... आता तरी आपणच देऊ आपल्याला इज्जत! एखादया विशिष्ट समाजावर राजकीय बहिष्कार टाकून त्याच्याकडे कानाडोळा करण्याने आपल्या देशांची एकात्मतेची प्रतिमाच पूर्ण होऊ शकत नाही, त्याच सगळेच रंग दिसले पाहिजेत, अनेक कवितामधून




कवीने असा सकारात्मक हुंकार भरला आहे, तेव्हा निश्चितच माणुसकीचा, निर्भयतेचा सूर्य या क्षितिजावर लवकरच उगवणार याचा ठाम विश्वास वाटू लागतो. या सकारात्मक विचारातूनच समाजाच्या पुनर्बांधणीसाठी नैतिक अधिष्ठान प्राप्त होऊ शकतो. यातून कवीचा निर्मळ दृष्टिकोन दिसून येतो.

मुस्लीम समाज चित्रण हा कवीच्या अत्यंत जिव्हाळयाचा विषय आहे, हे अर्पणपत्रिके वरून स्पष्टपणे दिसून येते. मुहल्ल्या मुहल्ल्यातून कशीबशी जिंदगी बसर करणा-या माझ्या तमाम बहेना अन् भाईना भावनांचा पोकळ डोलारा न उभारता मुबारक शेख यांची कविता ओढग्रस्तीत राबणाऱ्या, भीषणजीवन संघर्ष सोसणा-या समाज-बांधांशी, भगिनींशी हितगुज करते. त्यांचे जगणे केंद्रभागी घेते. बांधकामावर मजूर म्हणून काम करणे,

विड्या, अगरबत्त्या वळणे, हॉटेलात खरकटी साफ करणे, झाडू-पोछा, धुणी भांडी करणाऱ्या महिलांच्या अनेक दर्दभरया कहाण्या अनेक कवितांमधून समोर येतात. वाचकांच्या हृदयाला हात घालतात. वहिदा गाळुनी पसीना, बदन मोडून करिते काम, घमेली भरून देते मिस्त्रीला, कसंबसं मिळविते दाम, बिडीसारखी जळतेय, रेशमाची तमाम हयात तरीही झिडकरीत जाते वासनेची नजर वाह्यात शिक्षण घेण्याची ऐपत नाही. रोजगाराची सुरक्षेची हमी नाही कुणाच्याही खिजगणतीत नाही. अशा अवस्थेत भंगार गोळा करणारा अहमद लग्न समारंभात मंडप उभारणारा उस्मान, रोजगाराच्या शोधात महानगरीत भटकणारा मुजीब, तुटपुंज्या पगारावर कारखान्यात राबणारा गुल्लू, बाजारात हातगाडी ओढणारा अब्दुल सायकलीचे पंक्चर काढणारा रहिमचाचा, कब्रिस्तानात खड्डे खोदणारा बाबूलाल ही खत्म न होणारी यादी आहे अशा कितीतरी कष्टक-क्रत्यांचे जगणे कवितेतून अक्षरबद्ध होत जाते. मुश्किलीनं रोटीचा तुकडा कलका कैसा, सवाल हमेशा खड़ा अब्दुल स्वतंत्र भारताचा स्वतंत्र नागरिक! सांगा यात त्याची काय आगळीक स्वातंत्र्यानंतर मुस्लीम समाजाला सच्चा नेताच लाभला नाही. एकीकडे नेत्वृत्ताचा अभाव, दुसरीकडे धर्माची चिरेबंदी चौकट अशा विश्चित्र कोंडील हा समाज सापडलेला आहे. आपमतलबी पुढाऱ्या विषयी कवीचा काहीसा उपरोधिक सूर उमटतो. हरेकांनी कळप धरूनच चालायचं त्यांच्या इशा-यावर डोलायचं ते म्हणतील तसा धरायचा ठेका फिर भी टेन्शन नहीं लेने का... बेगम हजरत महल, फातिमा शेख, मनाकुमारी, बिस्मिल्ला खाँ मकबूल फिदा हुसेन साहिर लुधियानवी या व्यक्ती चरित्रात्मक कवितांबरोबरच जलते मुहल्ले, फकिरांची जिंदगानी, जमातीची परफट हजार चूहे खाक, ये क्या जगह है दोस्तो, जातीला जात' दुश्मन,यहाँ करीम कव्वाल गा रहा है यासारख्या कितीतरी कविता वाचण्यासारख्या आहेत.

**- अय्यूब अ. लतीफ नल्लामंदू**
सचिव : अ.भा. मुस्लीम मराठी साहित्य परिषद, सोलापूर

# आयुष्याची मौल्यवान माती : शिल्पकार करमरकर

**लेखक : सुहास बहुळकर**

आज हे पुस्तक पुन्हा आवर्जून वाचण्याचे कारण म्हणजे अगदी अलीकडेच झालेले रतन टाटा यांचे निधन ! त्यांच्या निधनाने एकंदरीतच टाटा कार्यसंस्कृती हा विषय सध्या चर्चेत आहे. या पुस्तकात पान क्रमांक १२५-१२६-१२७ यावर टाटा समूहाची कार्यसंस्कृती विषद करणारा एक प्रसंग नमूद करण्यात आला आहे. त्यानुसार जे. आर.डी. टाटा यांना काही कारणाने जमशेदजी टाटा यांचा एक पुतळा तयार करून हवा होता. तो पुतळा शिल्पकार करमरकर यांनी तयार केला. त्यावेळी घडलेल्या प्रसंगातून टाटा आणि शिल्पकार करमरकर यांची कार्यसंस्कृती स्पष्ट होत राहाते. म्हणून आज हे पुस्तक पुन्हा वाचले.

एका नामवंत शिल्पकाराच्या नामवंत कामगिरीचे दुसऱ्या नामवंत शिल्पकाराने केलेल्या नामवंत वर्णनाचे नामवंत प्रकाशकाने (राजहंस प्रकाशन) प्रकाशित केलेले नामवंत पुस्तक म्हणजे शिल्पकार करमरकर ऑक्टोबर २०१५ मधे पहिली आवृत्ती आणि नोव्हेंबर २०२२ मधे दुसरी आवृत्ती प्रसिध्द झालेल्या या ३०९ पानी पुस्तकाचे पूर्ण नाव आहे. आयुष्याची मौल्यवान माती : शिल्पकार करमरकर! या शीर्षकातले प्रत्येक अक्षर आणि प्रत्येक शब्द इतका सार्थ आहे की त्यातील कोणत्याच शब्द-समूहाला उपशीर्षक म्हणणे त्या शब्द समूहाचा अवमान ठरेल. हे संपूर्ण पुस्तक म्हणजे एक नितांत सुंदर शब्दशिल्प आहे. याची प्रचिती पुस्तकाच्या सुरुवातीपासूनच यायला लागते.

पुस्तकाच्या पाचव्याच पानावर ओळ आहे. सर्व गोष्टींची मी किंमत सांगितली, पण शिल्प घडवताना एक फार मौल्यवान अशी चिमूटभर माती त्यात घालावी लागते. त्या चिमूटभर मातीसाठी ती उरलेली रक्कम आवश्यक आहे. आम्ही कलावंत आमच्या आयुष्याची जी माती करतो, त्यातल्या चिमूटभर मातीची ती किंमत आहे. कारण कलावंताचे आयुष्य म्हणजे अपार वेदना आणि निर्मितीच्या उत्कट आनंदासह, साफल्याच्या भावनेला स्पर्श करणाऱ्या घटनाक्रमांचा एक पटच असतो. या पुस्तकाचे मला वाटलेले सगळ्यात महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे याची सर्वांगीणता! शिल्पकार विनायक पांडुरंग करमरकर (१८९१- १९६७) उर्फ नानासाहेब करमरकर असा कथा विषय असताना करमरकर यांचे सरळसोट चरित्र लिहिले असतें तरी ते वावगे ठरले नसते. पण असे न होता, शिल्पकला, त्यातील संकल्पना, त्यातील प्रक्रिया, शिल्पकलेची आपल्या देशात व परदेशात असणारी तत्कालीन स्थिती-परिस्थिती-वस्तुस्थिति याचे या पुस्तकात येणारे नेमके चित्रण सर्वसामान्य वाचकाच्या सोयीचे ठरते.

शिल्पकार करमरकर यांना अश्वारूढ शिवाजी महाराज या प्रकल्पाचे काम ज्या गणपतराव म्हात्रे यांच्याकडचे काम काढून मिळाले त्या गणपतराव म्हात्रे यांची सुद्धा सविस्तर दखल हे पुस्तक घेते. सविस्तर संदर्भांची अशी या पुस्तकातील असंख्य उदाहरणे वाचकाला तृप्त आणि पुस्तकाच्या प्रतिपाद्य विषयाला संतृप्त करत राहते. या पुस्तकाचा अजून एक लक्षणीय भाग म्हणजे यातील शब्द-रचना किंवा शब्द-संपदा मुळातच माझ्यासारख्या सर्वसामान्य वाचकाचा शिल्पकला या विषयाशी आणि त्यातील तांत्रिकतेशी दुरान्वयेसुद्धा संबंध येण्याची शक्यता नसते. अगदी जाता-येता एखादे शिल्प दिसले तरी त्याचे नेमके सौंदर्य टिपण्याची ना माझी क्षमता आहे ना तेवढा वेळ आहे. त्यामुळे शिल्पकार नानासाहेब करमरकर यांनी निर्माण केलेली विविध शिल्पे बघताना आपण नेमके काय पाहीले पाहिजे याचे वर्णन अतिशय आर्जवाने लेखक सुहास बहुळकर या संपूर्ण पुस्तकात करत राहतात. लेखक सुहास बहुळकर इथे इतके छान लिहून जातात. शिल्पाकृती म्हणजे केवळ मूळ वस्तूची अनुकृती नव्हे, अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराज यांचा एक संध पुतळा निर्माण करण्या आधी शिल्पकार करमरकर यांनी शिवाजी महाराज यांचा जसा अभ्यास केला तसा घोडे, अरबी घोडे, या विषायाचाही अभ्यास केला. हे पुस्तक हातात घेतल्यापासून ते वाचून पूर्ण करून खाली ठेवेपर्यंत मला सारखी आमच्या गुंतवणूक क्षेत्राची आठवण होत होती. अशी आठवण येण्याचे पहिले आणि महत्त्वाचे कारण म्हणजे या पुस्तकाच्या तपशीलांवार प्रस्तुत लेखकाने घेतलेली प्रचंड मेहनत! आमच्या गुंतवणूक क्षेत्रात नेहमीच म्हणले जाते की Deal with the details first as Details decide the deeds. अन्यथा अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराजांचा एकसंध पुतळा निर्माण करण्याचे इतके तपशीलवार वर्णन सहजासहजी शक्यच नाही .... शिवाजी महाराजांची उंची ५ फूट ४ इंच होती आणि घोड्यावर स्वार असताना त्यांच्या हातात असणारी तलवार ५४ इंच लांब होती ही माहिती मी इतिहासकार आणि इतिहासतज्ञ मंडळींनी लिहिलेल्या पुस्तकातसुध्दा याआधीं कधी वाचली नव्हती !* हे पुस्तक वाचताना गुंतवणूक क्षेत्राची आठवण येत राहण्याचे दुसरे कारण म्हणजे मनाच्या उर्मीला प्रमाण मानत व प्राधान्य देत काम करावे लागणे हा सदगुण (किंवा दुर्गुण) या दोन्ही क्षेत्रात निर्णायक ठरतो.

* या दोन्ही क्षेत्रात इतिहास निर्माण करणे आणि इतिहासजमा होणे यातली विभाजन रेषा नको इतकी अस्पष्ट आहे. अशी गुंतवणूक क्षेत्रातील असंख्य उदाहरणें माझ्या व्यावसायिक आयुष्याने मला दाखवली आहेत ; तर अशा स्वरूपातील शिल्पकार करमरकर यांच्या आयुष्यातील काही प्रसंग या पुस्तकात दिले आहेत.

* शिल्पकला आणि गुंतवणूक या दोन्ही क्षेत्रातील कामे शारीरिक , बौद्धिक व मानसिक अशी सर्वच बाजूनी परीक्षा पाहणारी असतात.

* शिल्पकला आणि गुंतवणूक या दोन्हीं क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या मंडळींचा या ना त्या स्वरूपात , या ना त्या मार्गाने , या ना त्या कारणाने ज्योतिष शास्त्रावर किंवा एखाद्या ज्योतिषावर विश्वास असतो.

* या दोन्ही क्षेत्रात अचूक वेळ साधणे अत्यावश्यक असते आणि त्यात मनोधारणा (ध्यास या अर्थाने)आणि साधना (अभ्यास या अर्थाने) अतिशय महत्त्वाची भूमिका बजावतात.

* शिल्पकला आणि गुंतवणूक या दोन्ही क्षेत्रात कार्यरत राहून यशस्वी होण्यासाठी आत्मविश्र्वासाची आवश्यकता असते. प्रस्तुत पुस्तकाचे लेखक सुहास बहुळकर यांच्याच शब्दांत सांगायचे तर असा आत्मविश्वास माध्यमावरील प्रभुत्व , अभ्यास , चिंतन , मनन आणि कार्यसंस्कृतीच्या अवघड पायऱ्या चढल्यावरच मिळतो

* लेखक सुहास बहुळकर या पुस्तकात एके ठिकाणी शिल्पकला या संबंधात लिहितात ... ज्ञान , कौशल्य , सराव असल्याशिवाय सफाई येतं नाही . हे गुंतवणूक क्षेत्राविषयीही खरे आहेच की !

*. या पुस्तकात दुसऱ्या एका प्रसंगात लेखक सुहास बहुळकर म्हणतात ... शिल्पकाराला मन , डोळे आणि डोके सतत वापरावे लागते ! गुंतवणूक तशीच असतें की !

* कलावंताला स्वातंत्र्य , सोय आणि सहकार्य लागते हे या पुस्तकातले वाक्य म्हणजे तर शिल्पकला आणि गुंतवणूक या क्षेत्राची सैद्धांतिक भूमिका ठरेल ,!

शिल्पकार करमरकर

स्वतःची व्यक्ती म्हणून, शिल्पकार म्हणून , शिल्पकाम क्षेत्राचा प्रतिनिधी म्हणून ,एकंदरीतच त्या संपूर्ण क्षेत्राची आदर्श आचार व विचार संहिता निर्माण करणारा भारतीय माती आणि मतीचा शिल्पकार म्हणजे शिल्पकार करमरकर आणि त्या आदर्श जीवनाचा आलेख शब्दबद्ध करणारा आजच्या काळाचा तसा शिल्पकार म्हणजे सुहास बहुळकर ( प्रस्तुत पुस्तकाचे लेखक )! हे पुस्तक वाचून पूर्ण करत असताना मला हिंदी व उर्दू साहित्यातला धरोहर हा शब्द वारंवार आठवत असतो . धरोहर या शब्दाचा कागदोपत्री अर्थ आहे वारसा किंवा परंपरा! पण व्यवहारात हा शब्द त्यापेक्षा कितीतरी जास्त चांगल्या अर्थाने उपयोगात आणला जातो. त्यानुसार आता कार्यरत असणाऱ्या आजच्या पिढीने आपल्या पुढील पिढीला आपल्या आधीच्या पिढीचा दाखला देत एकंदरीतच आपले क्षेत्र , त्यातील आपले घराणे समजावून सांगणे म्हणजे धरोहर! हे पुस्तक तसे आहे. जणू काही शिल्पकार नानासाहेब करमरकर या आधीच्या पिढीतील दिग्गजांच्या परिचयाच्या निमित्ताने आजच्या पिढीतले आघाडीचे शिल्पकार सुहास बहुळकर सर्वसामान्य वाचकाच्या आजच्या पिढीला शिल्पकारी समजावून सांगत आहेत अशा अर्थाने धरोहर असणारे पुस्तक म्हणजे आयुष्याची मौल्यवान माती : शिल्पकार करमरकर!

**-चंद्रशेखर टिळक,** अर्थतज्ज्ञ

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त



### माळशिरसमध्ये पेन्शनर डेनिमित्त स्नेहमेळावा उत्साहात

**अकलूज, दि. २१ डिसेंबर-**

जागतिक पेन्शनर डेनिमित्ताने माळशिरस तालुका सेवानिवृत्त कर्मचारी संघटना व म. रा. सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व अधिकारी संघटना तालुका माळशिरस यांच्या संयुक्त विद्यमाने माळशिरस तालुक्यातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी वार्षिक सर्वसाधारण सभा व स्नेहमेळावा पार पडला. अध्यक्षस्थानी माजी गटशिक्षणाधिकारी धनंजय देशमुख होते. यावेळी माजी केंद्रप्रमुख बी. एम. पाटील यांनी सेवानिवृत्तीनंतर प्रत्येक व्यक्तीने आपल्या आरोग्य कसे जपावे व आनंदी लाईफ स्टाईल ठेऊन उर्वरित जीवन चांगल्या प्रकारे व्यतीत करण्याबद्दल नेहमीच्या विनोदी शैलीमध्ये आणि प्रभावी वक्तृत्वद्वारे मार्गदर्शन केले. या स्नेहमेळाव्यात २०० पेक्षा जास्त सेवानिवृत्त शिक्षक उपस्थित होते. यावेळी सरवदे यांच स्वरमिलाफ कार्यक्रम झाला. संघटनेचे माजी अध्यक्ष महादेव लिंबोरे यांच्या वतीन स्नेहभोजन दिले. विष्णूसिंग भैस गुरूजी यांना जीवनगौरव पुरस्कार, ९२ वर्ष पूर्ण केलेले उरणे गुरूजी यांच्याबरोबरच ७५ वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या सर्व ज्येष्ठ सेवानिवृत्त शिक्षकांचे सत्कार करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष विनोदकुमार दोशी, नयना शहा, शिक्षण विस्तार अधिकारी महामुनी, माजी शिक्षण विस्तार अधिकारी महालिंग नकाते, हर्षवर्धन नाचणे, सायरा मुलाणी उपस्थित होते. सूत्रसंचालन राजाराम गुजर, सुहास उरवणे, शहाजादी काझी यांनी केले.



### सांगोला-गोवा-सांगोला सायकल राईड पूर्ण

**सांगोला, दि. २१ डिसेंबर-**

सांगोला सायकलस क्लबच्यावतीने सांगोला-गोवा-सांगोला ही निसर्गाचा मनमुराद आनंद घेत ८७७ किमीची यशस्वीरीत्या सायकल राईड पूर्ण केली. श्रीदत्त जयंतीचे दिवशी रायडर्सनी पहाटे ४ वाजता सांगोल्यातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील अश्वारुढ पुतळ्याचे दर्शन घेऊन सुरूवात केली. मिरज मार्गे निपाणी येथे १७५ किमीचा पहिला टप्पा पुर्ण झाला. दुसऱ्या दिवशीचा टप्पा कोल्हापूर-बेंगलोर महामार्गाने आंबोली मार्गे बांदा या शहरात १३० किमीची राईड करत पोहचला. तिसऱ्या दिवशी बांदा-पणजी (गोवा-मुंबई) महामार्गने प्रवास करत पत्रादेवी मार्गे पेडणे शहरात प्रवेश केला. यावेळी पणजी, जुन्या गोव्यातील मंदिरे, चर्च अशा ऐतिहासिक, पर्यटन विविध स्थळांना भेटी देऊन प्रदूषणमुक्तीचा, निसर्ग संवर्धनचे महत्व यविषयी सायकलींग द्वारे प्रबोधन त्यांनी केले. परतीच्या प्रवासात कुडाळ, कणकवली, फोंडा, दाजीपूर अभयारण्य, राधानगरी मार्गे कोल्हापुरात राईड पोहचली. कोल्हापूर-सांगोला १५५ किमी अंतर रायडर्सनी रेकॉर्ड ब्रेक विना थांबा ११ तासात यशस्वीरित्या पूर्ण केले. या सायकल प्रवासामध्ये प्रकाश खडतरे, निलकंठ शिंदे, बाळकृष्ण टापरे या रायडर्सनी हे अंतर पार करून जागोजागी निसर्गसंवर्धनाची जागृती केली.



### वागदरीत क्रीडा स्पर्धा उत्साहात

**अक्कलकोट, दि. २१ डिसेंबर-**

तालुक्यातील वागदरी येथील श्री. एस. एस शेळके प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात महाविद्यालयीन हिवाळी आंतरवर्गिय क्रीडा स्पर्धा मोठ्या उत्साहात सुरुवात करण्यात आली. यावेळी एस. एस. शेळके प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय विभाग प्रमुख प्रा. संतोष हत्ते, क्रीडा विभागप्रमुख प्रा. बसवंत गायकवाड, प्रा. सुजाता कणगी प्रा. सुनील शिदोरे, प्रा. विपुल जाधव, प्रा. अनिल देरेकर, सोलंकर आदींनी परिश्रम घेत आहेत.



### वळसंग पोलिस ठाण्यातर्फे पोलिस पाटलांचा सत्कार

**वळसंग, दि. २१ डिसेंबर-**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील पोलीस ठाण्याच्या वतीने पोलिस पाटलांचा पोलीस पाटील दिनानिमित्त सत्कार करण्यात आला. पोलिस पाटील हा पोलिस आणि गाव यांच्यामध्ये समन्वय साधणारा महत्त्वाचा दुवा असल्याचे मत वळसंग पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक अनिल सनगल्ले यांनी व्यक्त केले. यावेळी शशिकांत चोपडे, रेणुका इंगळे, पॅरन मुल्ला, बिराजदार, कपाळे, रामचंद्र पवार, सिध्दाराम वळसंगे, रेवणासिद्ध कोरे आदी पोलिस पाटील उपस्थित होते. पोलिस उपनिरीक्षक सागर पाटील यांनी आभार मानले.

# दार उघड बया आता ट्रामा केअरचे दार उघड...

**ट्रामा केअर सेंटर कर्मचाऱ्यांअभावी बंदच; विद्युत पुरवठाही नाही**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २१ डिसेंबर-**

१३ मार्च २०२४ रोजी ग्रामीण रुणालय अक्कलकोट येथील ट्रामा केअर सेंटर नूतन इमारतीचा लोकार्पण सोहळा झाला. मात्र तेव्हापासून ट्रामा केअर सेंटर पुरेसे कर्मचाऱ्याअभावी दार कुलुप बंद असल्याने इमारत धुळखात आहे.

यासाठी विद्युत पुरवठा चालू करावा. पुरेसा कर्मचारी वर्ग नेमावा. रुणाच्या सेवेत योग्य पात्रतेच्या क्षमतेचा कर्मचारी वर्ग व सर्व सोयीनियुक्त ट्रामा केअर सेंटर सुरु करून रुणांना सर्व प्रकारच्या सेवा द्यावेत, गरीब रुणाना सोलापूर येथे उपचारासाठी जाण्याची आवश्यकता भासू नये, अशी लेखी मागणी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे सोलापूर जिल्हा उपप्रमुख सुनिल कटारे यांनी निवेदनाद्वारे आरोग्य उपसंचालक पुणे यांच्याकडे केली आहे.

अक्कलकोट ग्रमीण रुणालय येथील ट्रामा केअर सेंटर तात्काळ चालू करावे. नर्स स्टॉफ तात्काळ भरावा सध्या दोनच नर्स आहेत. ट्रामा केअर सेंटर मधील विद्युत पुरवठा बंद आहे तो तात्काळ चालू करण्यात यावा. शवविच्छेदन करणारे कर्मचाऱ्यांची नेमणूक तात्काळ करावी. कार्यालयातील क्लर्क लोकांनी कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक न भरता अपूरे ठेवले आहेत. मनमानी कारभार केलेले आहेत, त्याची चौकशी व्हावी. सीसीटीव्ही फुटेजमधून माहिती घेऊन कर्मचारी कर्तव्यावर आहेत का याची तपासणी करावी. शाळा तपासणाऱ्या वाहन अक्कलकोट तालुक्यात शाळा दैनंदिन तपासणीसाठी वाहन नेमलेले आहेत. ते दैनंदिन जात नाहीत. तरी देखील महिन्याचे पूर्ण बिल घेतात. तरी शाळा तपासणीसाठी वाहन व कर्मचारी दैनंदिन जाणे गरजेचे आहे. प्रत्येक वाहनाल जीपी आर एस प्रणाली बसवावेत. कार्यालयात बायोमेट्रीक प्रणाली बसवण्यावरील विषयावर तात्काळ लक्ष घालून कारवाई करण्यात यावी. अन्यथा २६ जानेवारी २०२५ रोजी ग्रामीण रुणालय येथे मी स्वतः उपोषणास बसणार आहे, असे लेखी निवेदन सुनिल कटारे यांनी दिला आहे.

**अन्यथा आंदोलन करणार**

याबाबत त्वरीत कार्यवाही व्हावी अन्यथा मागणीच्या पूर्ततेकरिता २६ जानेवारी २०२५ पासून ग्रमीण रुणालय अक्कलकोट येथे आमरण उपोषण करण्याचा इशारा सुनिल कटारे यानी दिला आहे. निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी सोलापूर, जिल्हा आरोग्य अधिकारी, ग्रामीण पोलीस अधिक्षक, तहसिल कार्यालय अक्कलकोट, उत्तर पोलीस अक्कलकोट यांनाही देण्यात आल्याचे शिवसेना जिल्हा उपप्रमुख सुनिल कटारे यांनी सांगितले आहे.




## सुळेवाडी येथील गुंडखोरी तलावाचे काम निकृष्ट

**कामाची चौकशी करण्याची विक्रम सुळे यांची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २१ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी येथील गुंडखोरी तलावाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून, याची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी विक्रम सुळे यांनी केली आहे.

१९७२ साली रोजगार हमी योजनेंतर्गत या तलावाचे काम झाले होते. यामुळे या तलावात मोठ्या प्रमाणावर पाणी साचत होते. शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होत होता. तो तलाव आतापर्यंत सुस्थितीत होता. पण शासनाने काही अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार सदरच्या तलावाचे दुरुस्तीचे काम हाती घेतले. यासाठी शासनाने मोठा निधी टाकला खरे. पण या ठिकाणी घडले. उलटच पहिला जुना तलाव हा पूर्णपणे फोडण्यात आला व त्या ठिकाणी नवीन भरावा टाकण्यात आला. सदरचे बांधकाम एक दीड महिन्यात ठेकेदाराने उरकले. या ठिकाणचा पहिला तलाव नाहीसा करुन बांधकाम करण्याचा हा डाव पूर्णपणे फेल गेला आहे. कारण एकतर सुळेवाडी भागात पाऊस एकदम कमी पडतो. याच दुरुस्ती केलेल्या बंधाऱ्यात सध्या अत्यल्प पाणी आहे. यापूर्वी या बंधाऱ्यातील पाण्याचा उपयोग शेतीला व जनावरांना होत होता. पण सध्या त्या ठिकाणी पाणीच साचले नाही. पूर्णपणे याला गळती लागली असून काम करुन शासनाने लाखो रुपये खर्च करुनही हे पैसे वाया तर गेलेच. पण सुळेवाडीकरांना याचा फायदा शून्य झाला आहे. याचा फायदा झाला. तो फक्त संबंधित काम करणाऱ्या ठेकेदाराला सदरच्या निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी करुन संबंधित ठेकेदार तसेच अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी युवा नेते विक्रम सुळे यांनी मृद व जलसंधारण मंत्री महाराष्ट्र शासन यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. यावर आता शासन काय कारवाई करणार याकडे तमाम सुळेवाडीकरांचे लक्ष लागले आहे.



## अध्यात्मिक भावना निर्माण करण्यात माध्यमांची भूमिका महत्त्वाची

**श्री बसवलिंग महास्वामी : विजयपूरच्या ज्ञानयोगाश्रमात गुरु नमन कार्यक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**विजयपूर, दि. २१ डिसेंबर-**

वातावरणात फुलांचा सुगंध पसरवणाऱ्या वाऱ्याप्रमाणे समाजात अध्यात्मिक भावना निर्माण व विचारांचा प्रसार करण्यात माध्यमांची भूमिका अत्यंत पवित्र असते, असे मत ज्ञानयोगाश्रमाचे अध्यक्ष श्रीबसवलिंग महास्वामी यांनी व्यक्त केले.

श्री सिद्धेश्वर स्वामींच्या गुरुनमन कार्यक्रमाच्या दुसऱ्या वर्षाचा एक भाग म्हणून आश्रमात आयोजित प्रचार समितीच्या प्राथमिक सभेच्या अध्यक्षस्थानी बोलताना ते म्हणाले की, प्रसारमाध्यम समाजात चांगला संदेश देण्याचे चांगले काम करत आहेत. श्री सिद्धेश्वर स्वामीजींचा प्रसारमाध्यमांवर प्रचंड विश्वास होता. दैनिक वृत्तपत्र वाचन हा त्यांच्या दिनचर्येचा महत्त्वाचा भाग होता. त्यांच्या अखेरच्या काळात त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी आलेल्या प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींची विचारपूस करताना श्रींनी त्यांना प्रसाद दिल्याची आठवण करून दिली.

श्री हर्षनानंद स्वामींनी यापूर्वीच गावोगावी ज्ञान दासोह कार्यक्रम आयोजित केला आहे आणि लोकांना गुरु नमन कार्यक्रमाची माहिती दिली आहे. १ जानेवारीला गुरुदेवांना दीपनाम आणि २ जानेवारीला पुष्पनामाचा कार्यक्रम होणार असल्याचे त्यांनी सांगितले. पत्रकार संघाचे अध्यक्ष संगमेश चुरी हे समन्वयक म्हणून काम पाहणार आहेत. यावेळी हर्षनानंद स्वामीजी, महानगरपालिकेचे माजी सदस्य राजेश देवगिरी, व्हीडीएच्या माजी अध्यक्ष मिलिंदा चंचलकर उपस्थित होते.



**बुधवारपासून विविध कार्यक्रम**

२५ डिसेंबर ते २ जानेवारी या कालावधीत गुरु नमन कार्यक्रमाचा एक भाग म्हणून आश्रमात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून सुधारित शेती, ज्ञानाची उपासना, ग्रामसंस्कृती, योगजीवन, मातृभक्ती, जागतिक तात्त्विक विचार, सेवाभाव आणि गुरुदेवांचे जीवन या विषयांवर परिसंवाद होणार आहेत.

### बार्शी रेल्वे स्टेशनचा अमृत योजनेतून विकास करा : खा. राजेनिंबाळकर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २१ डिसेंबर-**

लातूर-मुंबई रेल्वे मार्गावरील बार्शी हे मोठे व्यापारी पेठ आहे. या शहरातून पंढरपूर, पश्चिम महाराष्ट्रात रेल्वेने जाणाऱ्या प्रवाशी, व्यापारांची मोठी संख्या आहे. सरकारच्या अमृत भारत योजनेत समावेश करुन स्थानकाचा विकास करण्याबाबतची मागणी खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी लोकसभेत बोलताना केली.

गतवर्षी रेल्वे मंत्रालयाकडून महाराष्ट्रातील अनेक रेल्वे स्थानकांचा समावेश करुन विकास करण्यास सुरुवात केली आहे. स्थानकातील परिसरांचे सुशोभीकरण रुन सुधारीत स्थानकात रुपांतर करण्यात येणार असून स्थानिक सांस्कृतिक व अन्य महत्त्वाचे प्रसंग साकारण्यात येत असल्यामुळे रेल्वे स्थानकाविषयी प्रवाशांमध्ये जिव्हाळा निर्माण होत आहे. धाराशिव लोकसभा मतदारसंघातील बार्शी या स्थानकाचा विकास अमृत भारत योजनेतून करण्यात यावा, अशी मागणी लोकसभेत रेल्वेच्या संदर्भात बोलताना अधिवेशनात खा. राजेनिंबाळकर यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली.




## समाजातील सर्व घटकांनी स्वच्छता अभियानात सहभागी व्हावे : कल्याणशेट्टी

**कल्याणशेट्टी महाविद्यालयात संत गाडगेबाबा पुण्यतिथी**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २१ डिसेंबर-**

संत गाडगे महाराजांनी अंधश्रद्धा, रूढी, परंपरा विरुद्ध बंड पुकारले, दांभिकतेवर प्रहार केला, त्यामुळे जन सामान्यात जागृती निर्माण झाली. त्यांनी स्वच्छता अभियानाचा देखील पुरस्कार केला. आता शासनाने सुद्धा स्वच्छता अभियान चळवळ कार्यान्वित केली आहे. त्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक तसेच समाजातील सर्व घटकांनी सहभागी होऊन स्वच्छ, निर्मल नवभारताची निर्मिती करावी, असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने संत गाडगेबाबा पुण्यतिथी निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक राजशेखर पवार, प्राध्यापिका शितल झिंगाडे भस्मे, उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, शहर व ग्रामीण परिसरात पर्यटकांची संख्या वाढली आहे, त्यामुळे नागरिकांकडून कमालीची अस्वच्छता होत आहे. प्लास्टिकचा सर्रास वापर होत आहे. त्यामुळे पर्यावरण धोक्यात आले आहे. अशा स्थितीत संत गाडगे महाराज यांचे स्वच्छता अभियानाचे विचार कृतीत उतरवणे आवश्यक आहे. स्वच्छ भारत अभियान ही केंद्र सरकारची संकल्पना संत गाडगे महाराजांच्या विचारामधूनच साकार झाली आहे. या अभियानामध्ये समाजातील सर्व घटकांनी सहभागी झाले पाहिजे. प्रास्ताविक प्रा प्राची गणाचारी यांनी केले सूत्रसंचलन प्रा शितल झिंगाडे-भस्मे यांनी केले तर आभार प्रा. मधुबाला लोणारी यांनी मानले.

## सांगोला तालुक्यातील अवैध व्यवसाय बंद करा

**आ. बाबासाहेब देशमुख यांची विधानसभा अधिवेशनात मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२१ डिसेंबर-**

सांगोला तालुक्यात सुरु असलेला अवैध वाळू व्यवसाय व इतर अवैद्य व्यवसाय बंद करण्याची मागणी विधीमंडळात आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी लावून धरली. यावेळी त्यांनी तालुक्यातील अवैध व्यवसायाचा पाढाच वाचला. यामुळे अवैध व्यवसाय करणार्यांचे धाबे दणाणले आहेत.



विधीमंडळात बोलताना आ. डॉ. बाबासाहेब देशमुख म्हणाले, सांगोला तालुक्यातील माण, बेलवन, कोरडा व अप्रुफा या नदीपात्रातील बेकायदेशीर वाळु उत्खनन मोठ्या प्रमाणात केले जात आहे. त्यामुळे पर्यावरणाचे व भूजल पातळीची हानी होत असून याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. त्यामुळे शासनाचा कोट्यावधींचा महसूल बुडत आहे. वाळू उत्खनन व इतर बेकायदेशीर व्यवसाय चालू असल्यामुळे तालुक्यातील गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे वाळू व्यवसाय व अवैद्य व्यवसाय बंद करावेत त्याचप्रमाणे कायदेशीर रित्या बांधकामासाठी गोर गरिबांना वाळू उपलब्ध करून देण्याची मागणी केली. तसेच सांगोला मतदार संघामध्ये एसटी बसेसची सुविधा अपुरी पडत आहे. ग्रामीण भागातील मुले शिक्षणासाठी शहरात येत असतात.

शाळेसाठी येताना जाताना अनेक विद्यार्थ्यांना ताटकळत बसावे लागत असते त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी विशेष बसेसची सेवा उपलब्ध करून द्यावी अशी मागणीही त्यांनी विधीमंडळामध्ये केली.

## शिवस्मारकाच्या लोकार्पण सोहळ्यामुळे २०२४ ठरले ऐतिहासिक वर्ष




**तभा वृत्तसेवा । दीपक भाकरे**
**सांगोला, दि. २१ डिसेंबर-**

सांगोला शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे लोकसहभागातून उभारण्यात आलेले शिवस्मारक याचा ऑक्टोबर महिन्यातील झालेला लोकार्पण सोहळा हा सन २०२४ या वर्षातील सांगोलकरांसाठी ऐतिहासिक क्षण ठरला. शिवप्रेमी तरुण मंडळाने सदर लोकार्पण सोहळा सर्व जाती धर्मातील प्रमुख मान्यवरांच्या हस्ते केल्यामुळे हा एक कौतुकाचा व चर्चेचा विषय ठरला.

लोकसभा व विधानसभा निवडणुकीमुळे सन २०२४ गाजले. चालूवर्षी लोकसभा व निवडणूक पार पडल्या. त्यामुळे सर्व पक्षांचे कार्यकर्ते, पदाधिकारी व नेते मंडळी हे व्यस्त असल्याचे दिसून आले. लोकसभा निवडणुकीत माढा मतदारसंघातून सांगोला विधानसभेतून महायुतीला मताधिक्य मिळाले परंतु विधानसभेला शेकापचा उमेदवार निवडून आल्यामुळे हा एक चर्चेचा विषय झाला. सदर लोकसभा व विधानसभा निवडणुकीमुळे सन २०२४ हे चांगलेच गाजले. उन्हाळ्यानंतर पावसाळ्यात झाला समाधानकारक पाऊस



सन २०२४ चा उन्हाळा हा ऋतू सांगोलकरांसाठी चांगलाच स्मरणात राहील असा पार पडला. कारण उन्हाळ्यात सांगोलकर उकाड्याने हैराण झाले होते. तसेच ऊन पण चांगलेच कडक पडत होते. त्यानंतर समाधानकारक पाऊस झाल्यामुळे शेतकरी राजा सुखावला. व चांगल्या प्रमाणात पिकांच्या पेरण्या झाल्या.

**लाडकी बहीण योजनेमुळे बँकेत झाली महिलांची गर्दी**

चालू वर्षी शासनाने लाडकी बहीण योजना चालू केल्यानंतर महिला वर्ग मोठ्या प्रमाणात बँकेत खाती चालू करण्यासाठी घरातून बाहेर पडला. सदर योजनेमुळे बँकेत महिलावर्ग मोठ्या प्रमाणात दिसून आला व आर्थिक व्यवहार वाढला असल्याचे निदर्शनास आले.

**मनाला चटका लावून गेलेली घटना**

चालू वर्षी जून महिन्यात कटफळ येथील महिला शेतमजुरांचा चिकमहुद येथे झालेल्या अपघातात सात जणांचा मृत्यू झाला. सदर घटना सांगोलकरांच्या मनाला चटका लावून गेली व सर्वत्र हळहळ व्यक्त झाली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# पैलवानांना खुराक देण्याचे उपक्रम कौतुकास्पद : माजी खा. पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २१ डिसेंबर-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली महाप्रसाद सेवेबरोबरच तालुक्यातील कुस्तीगीरासाठी न्यासाकडून खुराक दिला जातो. ही बाब अत्यंत उल्लेखनीय असल्याचे मनोगत सांगलीचे माजी खासदार संजयकाका पाटील यांनी व्यक्त केले.



ते सहपरिवार श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता, न्यासाचे विश्वस्त भाऊ कापसे यांनी त्यांचा सत्का केला. याप्रसंगी आनंदगिरी महाराज, पुरोहित विश्वंभर पुजारी, अमित थोरात, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, नामा भोसले, बाळासाहेब घाटगे, एस.के.स्वामी, दत्ता माने, तानाजी पाटील, शरद भोसले, प्रसाद हुल्ले, रमेश हेगडे, महांतेश स्वामी, शिव स्वामी, धनंजय निंबाळकर, विशाल घाटगे, मल्लिनाथ कोगनुरे, शावरेप्पा माणकोजी, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### बांग्लादेशातील घटनेच्या निषेधार्थ मैंदर्गीत शांतता रॅली

**अक्कलकोट, दि. २१ डिसेंबर-**

तालुक्यातील मैंदर्गी येथे बांगलादेशमध्ये हिंदू समाज बांधवावर होत असलेल्या अन्याय, अत्याचार विरोधात सकल हिंदू समाज, श्री राम प्रतिष्ठान व बहुउदेशीय सामाजिक संस्था मैंदर्गी यांचा वतीने मैंदर्गी शहरातून शांतेत रॅली काढण्यात आली. मैंदर्गीतील सकल हिंदू समाज चा वतीने शांतता रॅली नगरपालिका चौक, जय भवानी चौक, संगमेश्वर चौक, शिवाजी चौक अक्कलकोट नाका या प्रमुख मार्गाने रॅली काडण्यात आली. यावेळी हिंदू सकल समाज सोलापूर समन्यवक शिवराज गायकवाड, हिंदू महासभा जिल्हाध्यक्ष सुधीर बहिरवाडे, मैंदर्गी सकल हिंदू अध्यक्ष देवराज जकापुरे, उपादक्ष अप्पू नागणसुर, अनिल पाटील, लक्ष्मीपुत्र निंबळ, नागेश सिंदगी, प्रवीण रामपुरे, सिध्दाराम चीनमगेरी, खाजप्पा पुजारी, शिवा जकापुरे, सागर मठपती, सचिन करजगी, गौरीशंकर डमामी, अनिल नागणसुर आदींच्या प्रमुख उपस्थित मैंदर्गी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तसेच फौजदार धायगुडे यांना निवेदन दिले. या शांतता रॅलीमध्ये कृष्णा मंजुळकर, संकेत बिज्जरगी, राजेंद्र मुंडोडगी, शिवनिंगप्पा नागूर, समर्थ हुलमनी, पंकज कोलाटी, प्रभू दोडमनी, विश्वनाथ येणगुरे, सिध्दाराम हुग्गी, कृष्णा निंबाळ, शिवा अळगी, श्रीकांत गुंदगी, अजय जग्गे, विजय हडलगी, लक्ष्मीकांत इसापुरे, निलेश कांबळे, बबलू चव्हाण सहभागी झाले होते.



### सोलापूर-अजमेर एक्सप्रेसला जेऊर येथे थांबा देण्याची मागणी

**करमाळा, दि. २१ डिसेंबर-**

सर्व हिंदू-मुस्लीम धर्माचे श्रद्धास्थान असणारे हजरत. ख्वाजा गरीब नवाज अजमेर शरीफ यांच्या दि. ०७ जानेवारी २०२५ रोजी होणाऱ्या ऊरूसानिमित्त सोलापूर येथून जाणारी गाडी क्र. (०९६२७-२८) सोलापूर- अजमेर एक्सप्रेस गाडीला जेऊर येथे कायमस्वरूपी थांबा देण्यात यावा. या मागणीचे निवेदन आमदार नारायण आबा पाटील,जेऊरचे सरपंच पथ्वीराज भैय्या पाटील, शहिद भगतसिंग प्रवासी संघटना करमाळा तालुका,संभाजी ब्रिगेड, किरकोळ व्यापारी कल्याणकारी संस्था, महाराष्ट्र प्रदेश युवक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम फाउंडेशन करमाळा, सकल मुस्लिम समाज जेऊर यांच्या वतीने आज दि. २१ डिसेंबर रोजी जेऊर रेल्वे स्टेशन येथे निवेदनाद्वारे करण्यात आली.यावेळी निवेदन देताना पंचायत समिती करमाळा मा.सभापती अतुल भाऊ पाटील, संभाजी ब्रिगेड प्रदेश अध्यक्ष श्री.नितीन खटके, शहीद भगतसिंग प्रवासी संघटना करमाळा तालुका अध्यक्ष श्री.प्रवीण करे, किरकोळ व्यापारी संघटना अध्यक्ष पवन कोठारी,व रेल्वेचे रेल्वे सलगर समितीचे सदस्य श्री.प्रदीप पवार,जेऊर गावचे आजी-माजी ग्रामपंचायत सदस्य व ग्रामीण भागातील ग्रामस्थ तसेच मुस्लिम बांधव उपस्थित होते.



### निराधारांना बालसंगोपन योजनेचा मोठा आधार : दयानंद काळुंके

**अणदूर, दि. २१ डिसेंबर-**

'घरातल्या घरकर्त्याचे अचानकच निधन झाले, कुटुंब, मुलं बाळं उघड्यावर पडले त्यामुळे मुलांची शाळा बंद करुन बालविवाहासारखा विचार, आत्महत्येसारखा विचार डोक्यातून काढून महाराष्ट्र शासनाच्या सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना पदरात पाडून घ्यावी, निराधारांना बालसंगोपन योजनेचा मोठा आधार आहे 'असे मत धाराशिव जिल्हा बालकल्याण समितीचे सदस्य तथा पत्रकार दयानंद काळुंके यांनी व्यक्त केले. जि. प. प्रा. शाळा निलेगाव येथे आयोजित केलेल्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय योजना या चर्चासत्रात दयानंद काळुंके बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी जाधव हे होते तर आशा कार्यकर्ती तनुजा वाघाळे,अलका मुळे यांची होती. दयानंद काळुंके म्हणाले की, योजनेचा लाभ घरातील दोन बालकांना देता येतो, मासिक बावीससे पन्नास रुपये एका बालकांना मिळतात.कागदपत्रे, प्रस्ताव महिला व बालविकास अधिकारी कार्यालयात दाखल करावीत. बालकांना पगार चालू करतो म्हणून आपणाकडून पैसे उकळणाऱ्या दलालांना थारा देऊ नये असे आवाहन काळुंके यांनी शेवटी केले. यासाठी मुख्याध्यापक शिवाजी जाधव, गुरुलिंग ढावणे,शुभदा कुलकर्णी, बसवेश्वर परकाळे, शिवानंद ढम्मे, राजेंद्र सुतार, गोविंद नांदे यांनी पुढाकार घेतला होता.

# सोलापूरच्या नवउद्योजकांना मिळाले गुजरातच्या कौशल्याचे धडे

**खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास दौरा**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २१ डिसेंबर-**

माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली खासदार नवउद्योजक विकास कार्यक्रम ंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील नवोदित उद्योजकांसाठी गुजरातच्या गांधीनगर येथे आयोजित खाद्यखुराक महाकुंभ मेळाव्याचा अभ्यास दौरा यशस्वीरीत्या पार पडला. या उपक्रमासाठी शिवरत्न शिक्षण संस्था आणि शिवामृत दूध संघ शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट यांचे विशेष सहकार्य लाभले.

या दौऱ्यादरम्यान भाग घेतलेल्या उद्योजकांना फूड प्रोसेसिंग, डेअरी, पॅकेजिंग, ब्रँडिंग, लघुउद्योग, यंत्रसामग्री यासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांची सखोल माहिती मिळाली. खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी यावेळी सांगितले, **सोलापूर जिल्ह्यातील आणि माढा लोकसभा मतदारसंघातील तरुणांनी व्यावसायिक क्षेत्रात पुढे यावे यासाठी आम्ही विविध उपक्रम राबवत आहोत. हे उपक्रम रोजगारनिर्मितीबरोबरच परिसराचा आर्थिक विकास घडवून आणतील. सांगोला तालुक्यातील सहभागी संकेत बोत्रे यांनी सांगितले की, या अभ्यास दौऱ्यातून गुजरातमधील आधुनिक तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन कौशल्ये शिकता आली. माझ्या उद्योगासाठी अनेक नवीन संकल्पना मिळाल्या. या दौऱ्यातून आधुनिक पॅकेजिंग तंत्रज्ञान आणि इनोव्हेटिव्ह उत्पादने तयार करण्याचे धडे मिळाले. करमाळा तालुक्यातील महिला




### उपक्रमाचा प्रमुख उद्देश

- नवीन उद्योजक निर्माण करणे आणि सध्याच्या उद्योजकांना सक्षम करणे.
- केंद्र व राज्य सरकारच्या योजनांबाबत माहिती देऊन त्यांचा लाभ मिळवून देणे.
- बँकांकडून कर्ज प्राप्तीसाठी मदत करणे.
- उद्योग क्षेत्रातील महत्त्वाच्या संस्थांशी करार करण्याची संधी उपलब्ध करून देणे आहे.

व्यावसायिक तेजस्विनी घाडगे व रेश्मा जाधव या म्हणाल्या या अभ्यास दौऱ्यातून गुजरातच्या अन्न प्रक्रिया उद्योगाच्या प्रगतीबद्दल सखोल माहिती मिळाली. येथील शाश्वत व्यावसाय उद्योग विकास पद्धती प्रभावी वाटल्या.गुजरातमध्ये खाद्य चव आणि गुणवत्ता कशी राखली जाते, याचा अनुभव घेतला. माझ्या व्यवसायासाठी नवी रणनीती तयार करता आली. या मेळाव्यामुळे तरुण उद्योजकांना आपल्या व्यवसायासाठी प्रेरणा मिळाली असून सोलापूर जिल्ह्यातील व्यावसायिक क्षेत्राला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## एकाग्रता, स्मरणशक्ती वाढण्यासाठी मेडिटेशन महत्त्वाचे : प्रा. धनंजय देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २१ डिसेंबर-**

स्पर्धेच्या युगात शालेय जीवनामध्ये मुलांमध्ये करिअरमुळे ताणतणाव निर्माण होत आहेत हे ताणतणाव कमी होऊन मुलांची एकाग्रता व स्मरणशक्ती वाढावी यासाठी मेडिटेशन महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन आर्ट ऑफ लिव्हिंग व आयुष मंत्रालय भारत सरकार मान्यता प्राप्त योग शिक्षक प्रा.धनंजय देशमुख(एम.ए योगशास्त्र) यांनी केले.



महर्षि शंकरराव मोहिते प्रशाला यशवंतनगर येथे २१ डिसेंबर पहिला जागतिक ध्यान दिन साजरा करण्यात आला. त्या पार्श्वभूमीवर प्रा. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ध्यान सत्राचे आयोजन करण्यात आले होते. प्रास्ताविकामध्ये प्राशालेचे मुख्याध्यापक संजय गळीतकर यांनी बंगळुरू येथील येथील आर्ट ऑफ लिव्हिंग चे संस्थापक पद्मभूषण श्री श्री रविशंकर गुरुजी यांच्या प्रयत्नातून जागतिक मेडिटेशन दिनास संयुक्त राष्ट्रांनी मान्यता दिली आहे. नियमित मेडिटेशन मुळे तणाव कमी होऊन विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता वाढीस मदत होते अशी माहिती दिली.

या ध्यान सत्रामध्ये प्रा. देशमुख यांनी ध्यान म्हणजे काय? ध्यान का करावे? व कसे करावे याचे प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शनही केले. उपस्थित विद्यार्थी व शिक्षक यांना ध्यानाद्वारे मन कसे शांत आणि उत्साही करता येते तसेच एकाग्रता व स्मरणशक्ती वाढवण्यासाठी योग आणि मेडीटेशन कसे महत्त्वाचे आहे हे पटवून सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांकडून सूक्ष्म व्यायाम, योगासने आणि कपालभाती, अनुलोम विलोम, भस्त्रिका, भ्रमरी, ओंकार यासारखे प्राणायाम करून घेऊन शेवटी अत्यंत शांततापूर्ण वातावरणात सुमधुर संगीताच्या सोबत मेडीटेशन, ध्यान घेण्यात आले. आभार पर्यवेक्षक अंकुश एकतपुरे तर सूत्रसंचालन किरण सूर्यवंशी यांनी केले. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक उपस्थित होते.

## वटवृक्ष मंदिरात डोंबिवली-बदलापूर स्वामीभक्त मंडळींची ११९ वी मासिक सेवा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२१ डिसेंबर -**

अक्कलकोट येथील श्री.वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरात डोंबिवली-बदलापूर स्वामीभक्त मंडळींची विविध धार्मिक कार्यक्रमांची ११९ वी मासिक सेवा जल्लोष्यात साजरी केली.



प्रारंभी सर्व मान्यवरांचा मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी सन्मान केला. याप्रसंगी बोलताना डोंबिवली-बदलापूर स्वामीभक्त मंडळीचे प्रमुख सोमदत्त आसोलकर यांनी सद्गुरु चैतन्यस्वरूप अण्णा लिमये यांच्या श्री स्वामी समर्थ नामाचा प्रचार आणि प्रसार या कार्याअंतर्गत पदयात्रा, जप, नामस्मरण, मानसपुजा, कीर्तन, भजन, गायन या सेवेत, अध्यात्मिक उन्नती सोबत स्वामी सेवकांसाठी हक्काचे मनोरंजनाचे व्यासपीठ हे ध्येय समोर ठेवून अक्कलकोट मासिक कीर्तन सेवेचे आयोजन श्री वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्वामी हो गृप आणि डोंबिवली, बदलापूर स्वामीभक्त मंडळी करत आलेले असल्याचे मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन भरत डिंगोरकर आणि संतोष रहाटे यांनी केले. नेहमीच्या प्रथेप्रमाणे गृप सोबत प्रथम आलेल्या स्वामी सेवकांकडून मानसपूजेचा प्रसाद श्री वटवृक्ष देवस्थान अक्कलकोट स्वामी समर्थ महाराजांच्या चरणाशी अर्पण करण्याचे भाग्य आपणा सर्वांस लाभले. त्यानंतर मार्गशीर्ष गुरुवार निमित्ताने वैभव लक्ष्मी पुजा आणि श्रीमहालक्ष्मी माहात्म्य कथेचं पठण करण्यात आले. त्यानंतर मानसपूजेचा प्रसाद वाटप करण्यात आले. दुपारच्या दुसऱ्या सत्रात २.३० ते ३.३० या वेळेतसौ.अनिता सपकाळ संचालित सरगम भजनी मंडळ अंबरनाथ यांच्या सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम झाला. मासिक कीर्तन सेवा हभप बळवंत तेंडोलकर बुवा, बदलापूर यांच्या नारदीय कीर्तनाने संपन्न झाली. तबला वादक सुनील शेलार, अंबरनाथ व हार्मोनियम वर मयूर स्वामी, अक्कलकोट यांनी कीर्तनकारांना उत्तम साथसंगत केली.

## शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूलमध्ये भरला बाजार

**प्रमुख पाहुण्यांसह पालकांनी लुटला खरेदीचा आनंद; विद्यार्थ्यांना मिळाले व्यवहायाचे ज्ञान**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २१ डिसेंबर-**

आज शनिवार दिनांक २१ डिसेंबर रोजी शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूलमध्ये शेतकरी दिनाचे औचित्य साधून आठवडी बाजाराचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन आणि शेतकी अवजारांचे पूजन करुन पाहुण्यांच्या हस्ते झाली. या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले प्रमुख पाहुणे शिवरत्न शिक्षण संस्थेचे संचालक शिवदास माधव शिंदे आणि अध्यक्ष ज्येष्ठ एलएमसी मेंबर एच. डी. भोसले तसेच मंचावर उपस्थित शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूलचे चेअरमन रामकृष्ण पांडुरंग काटकर, शंकर काशिनाथ गायकवाड, जिल्हा परिषद माजी केंद्रप्रमुख विठ्ठल नष्टे, जिल्हा परिषद यशवंतनगर शाळेचे मुख्याध्यापक बंडू खडतरे, माता पालक संघाच्या उपाध्यक्ष सुषमा शिंदे आणि शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष सचिन बोरावके आदी मान्यवरांचा सन्मान प्रशालेचे मुख्याध्यापक जितेंद्र माने-देशमुख यांनी केला. प्रास्ताविक जितेंद्र माने-देशमुख यांनी केले.

आठवडी बाजारामध्ये विद्यार्थ्यांचा अतिशय उत्स्फूर्त सहभाग पाहुण्यांना पाहायला मिळाला. गावात ज्याप्रमाणे आठवडी बाजार भरतो अगदी त्याच पद्धतीने सर्व भाज्या, फळे, स्नॅक्स, कोल्ड्रिंक्स या सर्वांचा समावेश विद्यार्थ्यांनी आठवडी बाजारामध्ये केला होता. प्रमुख पाहुण्यांसमवेत सर्व शिक्षक तसेच पालक वर्गदेखील सर्व खरेदी करताना पाहायला मिळाला. विद्यार्थ्यांना व्यावसायिक ज्ञान मिळावे तसेच फायदा तोटा याची आकलन व्हावे आणि मार्केटमध्ये गेल्यानंतर कशा पद्धतीने खरेदी करावी याचे ज्ञान मिळवण्याच्या दृष्टीने हा कार्यक्रम अतिशय उपयुक्त ठरणार आहे. आनंददायी वातावरणात हा आठवडी बाजार सोहळा संपन्न झाला. सूत्रसंचालन शिल्पा जाधव तर आभार अजरिन मुजावर यांनी मानले.



### गुणदर्शन कार्यक्रमाला प्रतिसाद

यानंतर विद्यार्थ्यांचे विविध कला गुणदर्शनपर कार्यक्रमात भाषण तसेच शेतकरी समूहनृत्य यांचे सादरीकरण अतिशय उत्कृष्टरित्या विद्यार्थ्यांनी केले. प्रमुख पाहुणे आणि अध्यक्षांच्या भाषणानंतर मान्यवरांच्या हस्ते आठवडी बाजाराचे उद्घाटन रिबीन कट करून करण्यात आले.

## 'कान्होबा तुझी घोंगडी'मुळे भिमसेन जोशींचे स्मरण

**सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सवात विराज जोशी यांच्या स्वरांनी रसिक मंत्रमुग्ध**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२१ डिसेंबर-**

जागतिक किर्तीच्या सर्वात मोठ्या अभिजात शास्त्रीय संगीताचे माहेरघर असलेल्या आर्य प्रसारक मंडळ पुणे आयोजित ७० व्या सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सवात भारतरत्न पं. भिमसेन जोशी यांचे नातू विराज जोशी यांचे गायनाने आपल्या आजोबांची स्वरांची छाप सर्व उपस्थित संगीत रसिकांवर पाडली आणि भिमसेन जोशी यांची किराणा घराण्याची दमदार गायकी समर्थपणे पेलणार यांचा अनुभव याची देही याची डोळा रसिकांना अनुभवला मिळाला.

सुरुवातीला विराज जोशी यांनी किराणा घराण्याचा खास असलेला राग पुरीया विलंबित एकतालामध्ये हे पिया गुणवंता गात आपल्या आजोबांच्या चरणी गायन सेवा समर्पित केली.त्यामध्ये आलाप दमदार ताना घेत रसिकांना मंत्रमुग्ध करत होता.त्यानंतर तीन तालातील अप्रतिम बंदिश मैं तो घर आयी त्याला जोडून ठुमके




पग पायल बाजे अतिशय सुंदर रचना गात आनंद देऊन गेली. शेवटी भिमसेन जोशी म्हटले की, अभंग हा आलाच त्यांनी अजरामर केलेला कान्होबा तुझी घोंगडी चांगली अतिशय सुंदर गात रसिक श्रोत्यांना पांडुरंगाच्या गजराने टाळ्यांचा ठेका धरला.तो अविस्मरणीय क्षण सर्वांनी अनुभवला. शांत संयत रागाची मांडणी हे गायनाच वैशिष्ट्य ठरले. त्यांना तितकीच सुंदर आणि दमदार साथसंगत (तबला)पांडुरंग पवार, (हार्मोनियम) अविनाश दिघे, (पखवाज) ज्ञानेश्वर दुधाणे, ऑर्गन राहुल गोळे, (टाळ) माऊली टाकळकर, स्वरसाथ अभयसिंह वाघचौरे, दशरथ चव्हाण तर तानपुरा दिगंबर शेड्युळे, मोबीन मिरजकर यांनी करत कार्यक्रमाची अधिक रंगत वाढली. यावेळी आर्य संगीत प्रसारक मंडळाचे वतीने सर्व कलाकारांचा सन्मान केला. प्रभावी तितकच सुंदर सूत्रसंचालन आनंद देशमुख यांनी केले. या कार्यक्रमाला पुण्यासह इतर ठिकाणांवरुन आलेले रसिक-श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आश्वासक प्रतिसाद

पं. श्रीनिवास जोशी, शिल्पा ताई जोशी यांचे व आर्य संगीत प्रसारक मंडळ विश्वस्त मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या महोत्सवात रसिकांची अभिजात शास्त्रीय संगीत ऐकण्याची ही मोठी संधी आणि त्याला मिळणारा प्रतिसाद भविष्यकाळात निश्चितच ही शास्त्रीय संगीताची मोठी परंपरा प्रभावीपणे पुढे नेण्यासाठी आश्वासक ठरत आहे.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## स्वामी विवेकानंद शाळेत संस्कृती ज्ञान परीक्षा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२१ डिसेंबर -**

उमरगा दि.२१ डिसेंबर रोजी शहरातील स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिरात विद्याभारती संस्कृती शिक्षा संस्था देवगिरी प्रांत द्वारा आयोजित सांस्कृतिक ज्ञान परीक्षेत इयत्ता ४ थी ते ७ वीच्या वर्गातील एकूण ५० विद्यार्थ्यांनी संस्कृती ज्ञान परीक्षा दिली.



आपल्या विद्यार्थ्यांमध्ये भारताची महान अध्यात्मिक संस्कृती, थोर परंपरा, जीवनमूल्ये, महापुरुषांचे आदर्श जीवन चरित्र, आपल्या पूर्वजांनी दिलेले ज्ञान-विज्ञान हा आपला अमोल ठेवा विद्यार्थ्यांच्या बालमनावर प्रतिबिंबित व्हावा. यासाठी दरवर्षी या परीक्षेचे आयोजन विद्याभारती मार्फत केले जाते.

संस्कृती ज्ञान परीक्षा शाळेत आयोजित करण्यासाठी आमच्या संस्थेचे कार्यवाह डॉ. कपिलजी महाजन यांच्याकडून प्रेरणा घेऊन शाळेच्या मुख्याध्यापिका सविता लोहार यांच्या मार्गदर्शनाखाली बेबीसरोजा पवार व गोविंद जमादार यांनी परीक्षा यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले.



### संक्षिप्त वृत्त...



### जयप्रकाश विद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रशस्ती प्रमाणपत्र देऊन सत्कार

**धाराशिव, दि.२१ डिसेंबर -**

जयप्रकाश माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे बालविवाह निर्मूलनासाठी घेण्यात आलेल्या स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांचे प्रशस्ती प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी सुभाष कोळगे यांच्या अध्यक्षतेखाली विद्यालयाच्या प्रांगणात महिला व बाल विकास विभाग, जिल्हा प्रशासन शिक्षण विभाग, युनिसेफ व सेंटर फॉर सोशल अँड बिहेवियर चेंज कम्युनिकेशन, मुंबई यांचा संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या सक्षम बालविवाह निर्मूलन प्रकल्प अंतर्गत बालविवाह निर्मूलनाकरिता विद्यार्थी सक्षमीकरण कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध स्पर्धेत यश प्राप्त केल्याबद्दल इ. नववी मधील माने आनंदी, कानवले सायली, नलावडे तनुजा, जाधव अनुष्का, तर इ. आठवीतील गुंड श्रद्धा, कस्पटे अनुष्का, गव्हाणे ईश्वरी, निर्मले समीक्षा यांचा प्रशस्ती प्रमाणपत्र व पुष्प देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी माजी जि.प. सदस्य रामदास कोळगे, माजी ग्रा.प. सदस्य राजनारायण कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, पर्यवेक्षक डोंगरे के.ए., शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार सचिन कांबळे यांनी मानले.

### विद्यार्थी कल्याण मंडळाच्या समन्वयकपदी डॉ.संदीप देशमुख

**धाराशिव, दि.२१ डिसेंबर -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात विद्यार्थी कल्याण मंडळाच्या जिल्हा समन्वयकपदी डॉ.



संदीप बाळासाहेब देशमुख यांची निवड करण्यात आली आहे. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची नुकतीच बैठक घेऊन ही निवड करण्यात आली. विद्यार्थी कल्याण मंडळाच्यावतीने केंद्रीय युवक महोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम व विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. यासाठी धाराशिव जिल्हयातून डॉ. संदीप देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली. डॉ. देशमुख हे रामकृष्ण परमहंस महाविद्यालय सहायक प्राध्यापकपदी कार्यरत आहेत. या नियुक्ती बद्दल माजी व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख, डॉ. अंकुश कदम, डॉ. वैलास अंभुरे, डॉ. सुयोग अमृतकर यांनी अभिनंदन केले आहे.



### कृषी विभागाकडून श्रमदानातून संजितपूर येथे केला वनराई बंधारा

**येरमाळा, दि.२१ डिसेंबर -**

कळंब तालुक्यातील संजीतपूर येथे कृषी विभागा मार्फत श्रमदानातून वसंत मुकदम बाराते यांच्या शेताजवळ तेरणा नदीकाठी वनराई बंधारा तयार करण्यात आला. यावेळी तालुका कृषी अधिकारी सरडे, मंडळ कृषी अधिकारी ओव्हाळ तसेच कृषी पर्यवेक्षक चौधरी, कृषी सहाय्यक बी.डी. खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली तेरणा नदीवर वनराई बंधारा श्रमदानातून तयार करून शेतकऱ्यांना वनराई बंधारे विषयी तसेच पाणी व्यवस्थापन विषय सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी संजीतपूर येथील प्रगतशील शेतकरी विष्णू बाराते, समाधान बाराते, वसंत बाराते, चंद्रकांत राऊत, मधुकर बाराते, प्रवीण पुणेकर, विश्वास बाराते आधी शेतकरी उपस्थित होते.

### सोमनाथ क्षिरसागर यांचे निधन

**तुळजापूर, दि.२१ डिसेंबर -**



येथील विशाल प्रिंटिंग प्रेसचे मालक सोमनाथ काशिनाथ क्षीरसागर यांचे (वय ६९) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर तुळजापूर खुर्द येथील स्मशानभूमीत दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी सर्व क्षेत्रातील व्यक्ती उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन विवाहित मुली व भावंडे आहेत.

### सुहासनी शेटे यांचे निधन

**तुळजापूर, दि.२१ डिसेंबर -**



येथील सुहासिनी शशिभाल शेटे (वय ८६) यांचे शनिवार सकाळी ६:३० वाजता वृध्दापकाळाने निधन झाले. आंत्यविधी दुपारी घाटशीळ येथील स्मशानभूमी करण्यात आले. त्यांच्या पक्षात पश्चात दोन मुले, दोन मुली, नातवंडे आहेत. विधीज्ञ गिरीश शेटे यांच्या त्या वहिनी होत.

## श्री तुळजाभवानी मंदिरासमोर भक्तीमय वातावरण शिवीगाळीमुळे गढूळ...

# बांगड्या विकणाऱ्या महिलांचा मंदिर महाद्वारासमोर धिंगाणा

- अर्वाच्य भाषा वापरून अतिक्रमण धारकाचा राडा
- नगर परिषद कर्मचाऱ्यांना शिवीगाळ !
- कडक कारवाईची व्यापाऱ्यांसह भाविकांची मागणी

**तभा वृत्तसेवा /सचिन ताकमोघे**
**तुळजापूर, दि.२१ डिसेंबर -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी महाराष्ट्रासह इतर राज्यातून मोठ्या श्रद्धेने भक्ती भावाने भाविक दर्शनासाठी येतो. पण दर्शनासाठी आल्यानंतर मंदिर महाद्वारासमोर काटीवाले, दोऱ्यावाले, छोटे-मोठे फेरीवाले, गाड्यावाले, आणि बांगड्या विकणाऱ्या महिला यांचे नेहमीच आपापसात भांडणं तंडे एकमेकाला अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून भक्तीमय वातावरण दूषित करण्याचे काम मोठ्या प्रमाणात चालू आहे. देवाच्या दरबारात आपापसात शिव्याशाप देऊन अतिक्रमण धारक व्यापारी भक्तिमय वातावरण गढूळ करत आहेत. भाविकांना नको ते शब्द कानावर पडतात. येणारे भाविक कुटुंबासह लहान मुलांसह वृद्ध आई-वडिलांसह दर्शनासाठी आलेले असतात त्यावेळी त्यांना या सर्वांचे भांडण तंटे पाहून नको ते शब्द ऐकावे लागत आहेत.

दैनिक तरुण भारतच्या २० डिसेंबर रोजी आलेल्या शहरात मोठ्या प्रमाणात झालेल्या अतिक्रमण बातमीमुळे संपूर्ण शहरसह तालुक्यात खळबळ माजली होती. प्रशासन खडाडून जागे झाले आणि दि.२१ डिसेंबर रोजी नगरपालिकेचे एक पथक अतिक्रमण हटवण्यासाठी मंदिर महाद्वारासमोर गेले असता बांगड्या विकणाऱ्या महिलांनी नगरपरिषद कर्मचाऱ्यास शिवीगाळ करून नंतर आपापसात भांडणे चालू केली. अतिक्रमण हटवण्यासाठी गेलेल्या कर्मचाऱ्यांसमोर एकमेकाला भांडणे चालू केल्याने नगरपरिषद कर्मचारी अतिक्रमण हटवण्याऐवजी यांचे भांडणं सोडवायचे काम करू लागले. तर यातील काही महिला कर्मचाऱ्यांच्या अंगावर जाऊन कर्मचाऱ्याला देखील मारहाण करण्यापर्यंत या अतिक्रमण करणाऱ्या महिलांची मजल गेल्याचे दिसून आले. पोलीस प्रशासन सदरील घटनेची गांभीर्याने दखल घेणार का नाही, असा प्रश्न शहरवासीयांना पडला आहे. बघ्यांची गर्दी आणि भाविकांची गर्दी मोठ्या संख्येने असताना देखील मंदिरासमोर जवळ जवळ अर्धा तास हा राडा चालू होता. अतिक्रमण धारकावर कारवाई करण्यासाठी गेले असता हे अतिक्रमण धारक भांडण करतात. अतिक्रमण काढले असता पुन्हा अतिक्रमण करतात. भाविकांना त्रास होऊ नये असे रोडच्या बाजूस देखील बसत नाहीत. पोलीस प्रशासन, मंदिर, व्यापारी सर्वांनी मिळून अतिक्रमण हटवण्यासाठी सहकार्य करायला हवे. ग्राऊंड लेवलला काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना होणारा त्रास अधिकारी यांना माहित नसतो. २४ तास यांच्यावर पाळत ठेवणे शक्य नाही. नगरपरिषदसह पोलीस प्रशासनाने अतिक्रमणधारकांवर कडक कारवाई करणे गरजेचे आहे, असे मत नगरपरिषद स्वच्छता निरीक्षक दत्तात्रय साळुंके यांनी मांडले आहे.

**दै. 'तरुण भारत'च्या बातमीची दखल घेत अतिक्रमण धारकांवर कारवाई**



### आरोपींना कठोर शिक्षा होईपर्यंत आम्ही देशमुख कुटुंबियासोबत : खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ डिसेंबर -**

मस्सा (जो) (जि.बीड) येथील सरपंच संतोष देशमुख यांची दि.९ डिसेंबर रोजी निर्घुण हत्या करण्यात आली. याचे पडसाद महाराष्ट्राच्या विधानमंडळासह सर्वत्र पडले. खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी संसदेचे अधिवेशन संपताच मस्सा (जो.) येथे जावून मयत सरपंच देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेवून सांत्वन केले.

खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना महाराष्ट्र सरकारने या प्रकरणात नेमलेल्या एसआयटीला निपक्षपातीपणे तपास पुर्ण करणेबाबत निर्देश देण्याची विनंती केली आहे. आज कुटुंबियांची भेट घेतल्यानंतर महाराष्ट्र सरकारने चौकशी करुन निर्घुणपणे एखाद्याचे जिवन व कुटुंबास उध्दवस्त करणाऱ्या वृत्तीला कायद्याव्दारे कठोर शिक्षा करावी व भविष्यात अशा प्रकारेचे कृत्ये करण्याची कोणाची हिम्मत होणार नाही. अशा कठोर उपाययोजना करुन त्याची आंमलबजावणी करावी, अशी मागणी केली आहे.

### येडशी परिसरात वाघाची दहशत; दोन गाई जखमी



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ डिसेंबर -**

धाराशिव जिल्ह्यात पहिल्यांदाच वाघाचे दर्शन झाले असून, येडशी परिसरात त्याचा मुक्त संचार असल्याचे समोर आले आहे. गेल्या दोन महिन्यांपासून बिबट्याच्या दहशतीने त्रस्त असलेल्या जिल्ह्यात आता वाघाच्या भीतीने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

या वाघाने दोन गाईंवर हल्ला करून त्यांना जखमी केले आहे. वन विभागाने लावलेल्या ट्रॅप कॅमेऱ्यात हा वाघ कैद झाला असून, वन विभागाकडून त्याचा फोटोही प्रसारित करण्यात आला आहे.

धाराशिव जिल्ह्यात बिबटेही तुरळक प्रमाणात आढळत होते, मात्र आता वाघाचे आगमन झाल्याने जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. या वाघाला पकडण्यासाठी वन विभाग सतर्क झाला असून, त्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात येत आहे. वन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, वाघाला जेरबंद करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या जात आहेत. धाराशिव जिल्ह्यातील भूम, परंडा, वाशी तालुक्यात तसेच येडशी भागात बिबट्याचा संचार वाढल्याने शेतकरी भयभीत झाले आहेत. आतापर्यंत दोन बिबटे आणि एक वाघ आढळून आला असून, वन विभागाला तो अद्याप सापडलेला नाही. या प्राण्यांमुळे आतापर्यंत चार जनावरे मृत्युमुखी पडली असून, दोन माणसांवर हल्ला झाला आहे.

वन विभागाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन बिबटे आणि वाघाला लवकरात लवकर जेरबंद करावे, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

### जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे ६२ वर्षीय महिलेचा मृत्यू

**२० तास जिल्हा रुग्णालयात ठेवले प्रेत... डॉक्टरवर कारवाई करण्याची नातेवाईकांची मागणी...**



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ डिसेंबर -**

तालुक्यातील शिंगोली येथील शांताबाई दत्तू गवळी या रुग्णास जिल्हा सामान्य रुग्णालयातील डॉक्टर व परिचारिका यांनी वेळेवर औषध उपचार न केल्यामुळे त्यांना आपला जीव गमविण्याची दुर्दैवी घटना दि.२१ डिसेंबर ऊघडली आहे. दरम्यान, संबंधित डॉक्टर व कर्मचाऱ्यांवर जोपर्यंत कारवाई केली जाणार नाही. तोपर्यंत ताब्यात घेणार नसल्याचा पवित्रा नातेवाईकांनी घेत ते प्रेत तब्बल २० तास रुग्णालयातच ठेवले.

दरम्यान, दुसऱ्या दिवशी दि.२१ डिसेंबर रोजी पोलीस अधिकारी व रुग्णालयातील डॉक्टर यांनी रुग्णालयात येऊन नातेवाईकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही. त्यामुळे ते नातेवाईकांनी जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन चक्क निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांच्या केबिनमधील फरशीवरच ठिय्या मांडला. जोपर्यंत संबंधितावर कारवाई करणार असल्याचे लेखी आश्वासन देत नाहीत. तोपर्यंत आम्ही येथून जाणार नसल्याचा पवित्रा घेतला. त्यामुळे परिस्थितीचे गांभीर्य ओळखून जिल्हाधिकाऱ्यांच्या प्रतिनिधींनी शिष्टमंडळाचे म्हणणे ऐकून घेत चौकशी अहवाल आल्यानंतर संबंधितावर कारवाई केली जाईल असे लेखी आश्वासन दिले. त्यानंतर नातेवाईकांनी तेथून काढता पाय घेत प्रेत ताब्यात घेतले. त्यामुळे शासकीय जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांचा निष्काळजी व दुर्लक्षितपणा पुन्हा चव्हाट्यावर आला असून सर्वसामान्य रुग्णांच्या जीवाशी खेळ करून शासकीय नोकरीवर असणारे डॉक्टर स्वतःच्या खाजगी दवाखान्यात थांबवून रुग्ण व रुग्णांच्या नातेवाईकांची कशी पिळवणूक करतात? हे समोर आले आहे. विशेष म्हणजे नातेवाईकांनी हा कत्तलखाना आहे का दवाखाना ? हे संबंधित डॉक्टरांनी जाहीर करावे असे खुले आव्हान देत विविध प्रश्न विचारले आहेत.

मात्र जिल्हाधिकाऱ्यांशी शिष्टमंडळ भेटल्यानंतर त्यांनी चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यात येईल असे लेखी आश्वासन दिल्यानंतर ते प्रेत गावाकडे नेऊन त्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

यावेळी जिल्हा सचिव शांतिनाथ शेरखाने, शहराध्यक्ष शहाजी शेरखाने, राज्य कार्यकारणी सदस्य धोंडीराम वाघमारे, जिल्हा उपाध्यक्ष संपत शेरखाने, जिल्हा संघटक साहेबराव शेरखाने, तालुका उपाध्यक्ष दादासाहेब गवळी आदींसह चर्मकार समाज बांधव उपस्थित होते.

### लालबहादूर शास्त्री विद्यालयात संविधान व अंधश्रद्धा जनजागृती

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ डिसेंबर -**

खेड येथील लालबहादूर शास्त्री उच्च व माध्यमिक विद्यालयात भारतीय संविधान अमृतमहोत्सवी वर्ष व अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या ३५ व्या वर्षानिमित्त संविधान व अंधश्रद्धा जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. गेल्या काही दिवसांपासून खेड किणी विमानतळ रस्त्यालगत परिसरात भानामती करणी सारखा प्रकार आढळुन आल्याने येथील नागरिक भयभीत झाले होते.

अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या टिमने पोलिस प्रशासन सह तिथे भेट देऊन नागरिकांना अंधश्रद्धेचा प्रकार आहे असे सांगितले व त्याला स्मरुनच अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या वतीने आज रोजी खेड येथील लालबहादूर शास्त्री उच्च व माध्यमिक विद्यालयात अंधश्रद्धा जादुटोणा विरोधी चमत्कार व विज्ञान हा कार्यक्रम घेऊन अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे जिल्हाध्यक्ष ॲड. अजय वाघाळे प्रात्यक्षिक करून विद्यार्थ्यांना अंधश्रद्धा निर्मुलन चमत्कारा मागील विज्ञान व जादुटोणा प्रतिबंधक कायदा सांगण्याचा प्रयत्न केला.

तर तस्लीम काझी यांनी केलेल्या प्रात्यक्षिक प्रयोगाचे विश्लेषण सांगितले.

भारतीय संविधान अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त मतदार जनजागरण समितीच्या वतीने भारतीय संविधान जनजागृती करण्यात येत असुन कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधान उद्देशिका व विश्लेषण पत्रक वाचुन करण्यात आली. आलेल्या मान्यवरांचे स्वागत शाळेतील शिक्षकांनी पुष्प बुके देऊन केले.

यावेळी अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे जिल्हाध्यक्ष ॲड. अजय वाघाळे, बुबासाहेब जाधव, अब्दुल लतिफ, सिध्देश्वर बेलुरे, गणेश वाघमारे, बलभीम कांबळे, तस्लीम काझी, रोहिदास भिसे, शेख आर.ए., शिंदे शाळेतील शिक्षक वर्ग विद्यार्थी अन्य इतर उपस्थित होते.

## संघटित गुन्हेगारी खपवून घेतली जाणार नाही : आ. राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ डिसेंबर -**

राज्यातील अन्य जिल्ह्यांप्रमाणे आपल्या धाराशिव जिल्ह्यातील काही तालुक्यात संघटित गुन्हेगारीचे प्रकार घडत असल्याचे समोर येत आहे. गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक एकत्र येऊन सामान्य नागरिकांना त्रास देत असल्याच्या तक्रारी येत आहेत. अशाप्रकारे सामान्य नागरिकांना जर कोणी जाणून बुजून त्रास देण्याचा प्रयत्न करत असेल तर असे प्रकार अजिबात खपवून घेतले जाणार नाहीत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील याबाबत कठोर भूमिका घेतली आहे. त्यामुळे अन्याय सहन न करता संबंधितांनी याबाबत पुराव्यांसह पोलिस अधिक्षकांडे तक्रार द्यावी. आपण स्वतः व्यक्तीशी या बाबींची गांभीर्याने दखल घेऊ, अशा संघटित गुन्हेगारांना कायदेशीर अद्दल घडवू असे प्रतिपादन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.

सध्या जिल्ह्यात अनेक भागात पवनचक्की व सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याची कामे सुरू आहेत.

याअनुषंगाने संघटित गुन्हेगारी क्षेत्रातील लोक दुष्प्रवृत्ती सक्रिय झाल्याचे दिसून येत आहे. सामान्य नागरिकांना वेठीला धरून त्यांना त्रास देणे, दबाव टाकणे अशा स्वरूपाची कृत्ये समोर आली आहेत. विविध स्तरातून याबाबत ऐकीव माहिती आपल्यापर्यंत पोहचली आहे.



याअनुषंगाने जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांना अशा प्रकरणात कायदेशीर कारवाई करण्याच्या सक्त सूचना दिल्या आहेत.

जिल्ह्यातील शेतकरी असो की सामान्य नागरिक त्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आपले महायुती सरकार पूर्णतः कटिबद्ध आहे. त्यामुळे अशा प्रकारे कोणाला जाणीवपूर्वक कोणी त्रास देत असेल तर त्यांनी रीतसर आवश्यक त्या पुराव्यासह पोलिसांकडे तक्रार द्यावी व त्याची पोच घ्यावी. आपण स्वतः योग्य ती दखल घेऊन पोलिसांच्या माध्यमातून त्याला पायबंद घालण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचेही आमदार पाटील यांनी सांगितले आहे.

बीड जिल्ह्यातील मस्साजोग प्रकरणी विधानसभेत उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील याबाबत कठोर पावले उचलणार असून संघटित गुन्हेगारी संपवण्यासाठी मोक्कासारखा कायदा वापरला जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

त्यामुळे आपल्या धाराशिव जिल्ह्यात देखील संघटित गुन्हेगारीचे प्रकार घडत असतील तर नागरिकांनी याबाबत पुढे येऊन तक्रार द्यावी.

बीड प्रमाणेच इथे देखील अशा गुन्हेगारांना पायबंद घालण्यासाठी मोक्का कायद्याचा वापर करण्यात येणार असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### प्रेमकुमार राजाराम गुंड यांच्या रेल्वे भरतीतील निवडी बद्दल सत्कार

**धाराशिव, दि.२१ डिसेंबर -**

डॉ. वेदप्रकाश पाटील शैक्षणिक संकुल येथील एस.पी. पॉलिटेक्निक मध्ये तृतीय वर्षात शिक्षण घेत असलेला विद्यार्थी प्रेमकुमार राजाराम गुंड यांची भारतीय रेल्वेमध्ये टेक्निकल विभागात कॅरेज अँड वॅगनपदी निवड झाली आहे. या निवडीबद्दल त्यांचा एस.पी. पॉलिटेक्निकच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना गुंड यांनी सांगितले की,कॉलेजमध्ये चालू असलेल्या स्पर्धा परीक्षा केंद्राचा फायदा झाला आहे. इतर विदयार्थ्यांनी ही त्याचा फायदा घ्यावा. या यशाबद्दल धनेश्वरी शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील प्राचार्य अमरसिंह कवडे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



### बप्पांच्या पुण्यतिथीनिमित्त संस्थेच्या शाखेत विविध कार्यक्रमाचे आयोजन

**धाराशिव, दि.२१ डिसेंबर -**

येथील आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सरचिटणीस गुरुवर्य के.टी. पाटील सरांच्या पुण्यतिथी निमित्त प्रशालेच्या भव्य प्रागंणावरील त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास संस्थेचे अध्यक्ष सुधीर पाटील, तुळजाभवानी बँकेचे अध्यक्ष संजय पाटील, अखिल भारतीय वारकरी मंडळाचे अध्यक्ष हभप. प्रकाश बोधले महाराज व संस्था सरचिटणीस प्रेमाताई पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य पाटील युवा उद्योजक अभिराम पाटील यांनी पुष्पहार घालून अभिवादन केले. त्यानंतर प्रशालेच्या मुख्य इमारतीत हभप. प्रकाश बोधले महाराज यांनी कीर्तनातून थोरांचे पुण्यस्मरण का करावे शिक्षणक्षेत्रात स्वतःचा ठसा उमटवून इतिहास उभ्या करणारे कै.के.टी. पाटील सरांच्या कार्यांचा उजाळा या निमित्ताने दिला. या कार्यक्रमास त्यांचे आतेष्ट व माजी विद्यार्थी, धाराशिव नगरातील बप्पांवर प्रेम करणारे नागरिक, कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.



### निराधारांना बालसंगोपन योजनेचा मोठा आधार : दयानंद काळुंके

**इटकळ, दि.२१ डिसेंबर -**

घरातल्या घरकर्त्याचे अचानकच निधन झाले, कुटुंब, मुलं बाळं उघड्यावर पडले त्यामुळे मुलांची शाळा बंद करुन बालविवाहासारखा विचार, आत्महत्येसारखा विचार डोक्यातून काढून महाराष्ट्र शासनाच्या सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना पदरात पाडून घ्यावी, निराधारांना बालसंगोपन योजनेचा मोठा आधार आहे असे मत धाराशिव जिल्हा बालकल्याण समितीचे सदस्य तथा पत्रकार दयानंद काळुंके यांनी व्यक्त केले. जि.प.प्रा. शाळा निलेगाव येथे आयोजित केलेल्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय योजना या चर्चासत्रात दयानंद काळुंके बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी जाधव हे होते. तर प्रमुख पाहुण्या म्हणून आशा कार्यकर्ती तनुजा वाघाळे, अलका मुळे यांची होती. पुढे बोलताना दयानंद काळुंके म्हणाले की ही योजनेचा लाभ घरातील दोन बालकांना देता येतो, मासिक बावीससे पन्नास रुपये एका बालकांना मिळतात, यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे, प्रस्ताव महिला व बालविकास अधिकारी कार्यालयात दाखल करावीत, असे आवाहन काळुंके यांनी शेवटी केले. यासाठी मुख्याध्यापक शिवाजी जाधव, गुरुलिंग ढावणे, शुभदा कुलकर्णी, बसवेश्वर परकाळे, शिवानंद ढम्मे, राजेंद्र सुतार, गोविंद नांदे यांनी यासाठी पुढाकार घेतला होता.

### हसरी शाळा या बाल काव्यसंग्रहास उत्कृष्ट बाल वाड.मयाचा पुरस्कार

**तेर, दि.२१ डिसेंबर -**

प्रतिभा जगदाळे यांच्या हसरी शाळा या बाल काव्यसंग्रहास, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर,



यांचा २०२४ चा 'उत्कृष्ट बाल वाङ्मयाचा' पुरस्कार मिळाला. हा पुरस्कार, शाहू स्मारक भवन सभागृह, दसरा चौक, कोल्हापूर येथे भारतीय साहित्य समीक्षक आणि भाषाशास्त्रज्ञ, पद्मश्री डॉ. गणेश देवी आणि माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी दमसासचे अध्यक्ष प्रा. भीमराव धुळबुळू, विजय चोरमारे, दि.बा. पाटील, डॉ. विनोद कांबळे, डॉ. रामकली पावसकर आणि मान्यवर उपस्थित होते.

### महानोर यांच्या पुस्तकाची निवड

**जळकोट, दि.२१ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मुर्टा येथील प्राथमिक पदवीधर शिक्षिका श्रीमती बबीता महानोर यांची समग्र शिक्षा आणि पीएश्री ग्रंथालय उपक्रम अंतर्गत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था धाराशिव जिल्ह्यातून मुलांनो, आपण बोलू या...या पुस्तकाची उत्तम ग्रंथ म्हणून राज्यस्तरावर निवड झाल्यामुळे जळकोट बीटच्यावतीने जिल्हा परिषद प्रशाला, जळकोट या ठिकाणी सत्कार करण्यात आला.

# शहरातील रस्त्याच्या कामाची नऊ महिने निविदा का उघडली नाही याची चौकशी करा

## आमदार कैलास पाटील यांनी विधानसभेत केली मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ डिसेंबर -**

धाराशिव शहरातील रस्त्यांसाठी १४० कोटींचा निधी मंजूर झाला होता. या कामांची निविदा २९ मार्च २०२४ रोजी उघडणे अपेक्षित होते. मात्र नऊ महिने उलटूनही निविदा उघडली नाही. कामे न झाल्याने कित्येक अपघात झाले, नागरिकांचे बळी गेले आहे. याला जबाबदार कोण? असा सवाल करत विलंब का लागला याची चौकशी करावी अशी मागणी आमदार कैलास पाटील यांनी विधानसभेत केली.



आमदार पाटील म्हणाले की, महाविकास आघाडी सरकार असताना धाराशिव शहरातील रस्ते, उद्यान, आठवडी बाजारासाठी निधी मंजूर झाला होता. आपण सरकारसोबत न गेल्याने या कामांना महायुतीने स्थगिती दिली. त्याविरोधात उच्च न्यायालयात गेलो. न्यायालयाने स्थगिती उठवण्याचा निर्णय दिला. मात्र, शासनाचा नगरविकास विभाग इतका निगरगठ्ठ आहे की अजूनही स्थगिती उठविली नाही. किमान आता तरी उच्च न्यायालयाचा आदर राखून ही स्थगिती उठविण्याची मागणी आमदार पाटील यांनी सभागृहात केली.

शहरातील स्ट्रीट लाईटचे टेंडर गुजरातच्या एका कंपनीला दिले असून त्यांचं बिल थकल्याने काहीच काम होत नाही शिवाय नगरपालिकेने हे काम त्या कंपनीकडून काढून घ्यावे असे पत्र दिले तरीही शासनाने याबाबत काहीच केलेलं नाही. या गंभीर समस्येचे वास्तव सभागृहाच्या आमदार पाटील यांनी निदर्शनास आणून दिले. धाराशिव येथे १५ मार्च २०२४ रोजी ५०० बेडचे हॉस्पिटल मंजूर करुन त्याचे उद्घाटनही तत्कालीन मुख्यमंत्री यांनी केले होते. हा प्रकल्प ३६१ कोटींचा आहे. मात्र, यासाठी तरतूद केवळ १ हजार तरतूद केली असून त्यामागून मंजूर महाविद्यालयाना निधी दिला जातो पण धाराशिवला का नाही असा सवाल आमदार पाटील यांनी उपस्थित केला.

हे सरकार मराठवाड्यावर अन्याय करत असल्याचा थेट पुरावाच आमदार पाटील यांनी सभागृहा समोर मांडला. पार गोदावरी खोऱ्यातुन मराठवाड्याला पाणी देण्याचा प्रकल्प २०१३ मध्ये मंजूर केला पण त्याच पुढे काहीच झालं नाही मात्र मागून मंजूर झालेल्या पार गिरणा प्रकल्पाचे काम सुरु देखील झाले. शिवाय कृष्णा मराठवाडा प्रकल्पाला निधी वितरण पुरेसं होत नसल्याच वास्तव आमदार पाटील यांनी मांडल. यासाठी मराठवाडा येथील सर्वच लोकप्रतिनिधीनी या अन्यायाविरुद्ध एकत्र आलं पाहिजे अशी भूमिका त्यानी मांडली.

### संकल्पपत्राची आठवण ठेवा...

आमदार पाटील यांनी भाजपने निवडणुकीत दिलेले आश्वासनाच संकल्पपत्रच सभागृहात दाखवल. त्यातील शेतकऱ्यांना तीन लाखाची कर्जमाफी देणार म्हणालात तस आता बहुमत मिळालं असून शेतकरी कर्जमाफीच्या घोषनेची वाट पाहत आहे असे पाटील यांनी मुख्यमंत्री यांना सांगितले. तसेच शेतकऱ्यांना खत, औषध व साधनसामुग्रीवरील राज्याच्या वाट्याचा जीएसटी अनुदान स्वरूपात शेतकऱ्यांना परत करण्याचा शब्द आपण संकल्पपत्रात केला होता त्याची अंम लबजावणी कधीपासून करणार याबद्दलही सरकारने उत्तर द्यावे असं पाटील यांनी सांगितले.

# ४ कोटी ५० लाख रुपये खर्चाची विकास कामे सध्या प्रगतीपथावर : मुख्याधिकारी कुंभार

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२१ डिसेंबर -**

नळदुर्ग नगरपालिकेवर प्रशासकीय कालावधी असताना सन २०२२ ते २०२४ या दोन वर्षाच्या कालावधीत नगरपालिकेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी अतिशय चांगल्या प्रकारे विकास कामांचे नियोजन करुन तब्बल ४ कोटी ७५ लाख रुपये खर्चाची विकास कामे पुर्ण करुन शहराचा विकास केला आहे. त्याचबरोबर ४ कोटी ५० लाख रुपये खर्चाची विकास कामे सध्या प्रगतीपथावर आहेत. त्यामुळे प्रशासकीय कालावधीत मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी शहराचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न केला आहे.

नगरपालिकेवर गेल्या तीन वर्षांपासुन प्रशासकीय कारभार सुरु आहे. प्रशासकीय कालावधीत नगरपालिकेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परीक्षेत्रात अधिसुचित क्षेत्रात नागरी सेवा पुरविणे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोथान महाअभियान योजना, वैशिष्ट्येपुर्ण योजना व नळदुर्ग नगरपरिषद जिल्हा नियोजन समिती या योजनेअंतर्गत शहरातील विविध भागात कोट्यावधी रुपये खर्चाची विकास कामे केली आहेत. यामध्ये सन २०२२-२३ या वर्षात एकुन ३२ कमांपैकी २३ कामे पुर्ण केली आहेत या २३ कामांवर ३ कोटी ६३ लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत. या वर्षातील २९ लाख रुपये खर्चाची २ कामे प्रगती पथावर आहेत. २०२३-२४ या वर्षात विविध योजनेअंतर्गत एकुन ३३ कामांना मंजुरी मिळाली आहे. यापैकी ८ कामे पुर्ण झाली आहेत तर ८ कामे प्रगतीपथावर आहेत. या वर्षात १ कोटी रुपये खर्चाची विकास कामे पुर्ण झाली आहेत तर सध्या ४ कोटी रुपये खर्चाची विकास कामे प्रगतीपथावर आहेत. सन २०२४-२५ या चालु वर्षात ५ कोटी रुपये खर्चाच्या विकास कामांना मंजुरी मिळाली असुन या कामाची टेंडर प्रक्रिया लवकरच सुरु होणार आहे. मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी प्रशासकीय कालावधीत शहरात विकास कामे करीत असतांना सर्व जाती धमतील लोकांसाठी ही विकास कामे केली आहेत. त्यामुळे प्रशासकीय कालावधीत मुख्याधिकारी कुंभार यांनी शहराचा विकास थांबु न देता तो वेगाने पुढे नेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी केलेला योग्य व अचुक प्रस्ताव तसेच आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी शासन दरबारी केलेल्या प्रयत्नामुळे आज नळदुर्ग शहरात ४६ कोटी रुपये खर्चाच्या पाणिपुरवठा योजनेचे काम सुरु आहे. हे काम पुर्ण झाल्यानंतर शहरवासियांना दररोज पाणी मिळणार आहे.

# येरमाळा येथे धाराशिव जिल्हा-स्तरीय उल्हास मेळावा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२१ डिसेंबर -**

येरमाळा येथील विद्यानिकेतन विद्यालय येथे, शिक्षणाधिकारी योजना जिल्हा परिषद धाराशिव आयोजित, उल्हास नवभारत साक्षरता कार्यक्रम अंतर्गत धाराशिव जिल्हास्तरीय उल्हास मेळावा २०२४-२५ चे आयोजन श्रीमती सुधा साळुंखे शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद धाराशिव यांनी विद्यानिकेतन विद्यालय येरमाळा येथे आयोजन केले होते.

यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटन माननीय डॉ. मैनाक घोष भाप्रसे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद तथा जिल्हाधिकारी धाराशिव यांनी केले. यावेळी या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती डॉ. गणपत मोरे, डॉ. अंजली सूर्यवंशी, अशोक पाटील, गजानन वाघमारे, सराफ, खुळे, फुलारी, देवगुडे, सरार सय्यद, इमानदार, शिवकुमार बिराजदार, सुभाष चव्हाण, भूमराहुल भट्टी, अर्जुन जाधव, सोमनाथ घोलप, धर्मराज काळमांते प्रत्येक तालुक्याचे सर्व गटशिक्षणाधिकारी यांची उपस्थिती होती. नव साक्षर भारत अंतर्गत शैक्षणिक साहित्याचे मेळाव्यात १५ स्टॉल लावण्यात आले होते. यात शिक्षकांनी टाकाऊ वस्तु पासून टिकाऊ वस्तू व शैक्षणिक साहित्याची निर्मिती याची मांडणी करण्यात आली होती. यावेळी धाराशिव जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून शाळातील विद्यार्थ्यांनी कार्यक्रमांमध्ये पथनाट्य, लोकगीते, नाटिका, इत्यादीचे सादरीकरण केले. कार्यक्रमासाठी सूत्रसंचालन संतोष माळी विस्तार अधिकारी धाराशिव यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यानिकेतन विद्यालयाचे संस्थापक सचिन पाटील, संचालिका स्वाती पाटील तसेच विद्यानिकेतन शैक्षणिक संकुलातील सर्व कर्मचाऱ्यांनी यांनी परिश्रम घेतले.

✲ **धाराशिव** - महाराष्ट्र कोळी समाज संघ धाराशिव व कै. शामल कोळी वधु-वर सुचक सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी २५ डिसेंबर रोजी स. १० वाजेपासून सायंकाळी ५ पर्यंत कोळी महादेव समाजाचा वधु-वर सुचक मेळावा व अनुसुचित जमातीचे जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र मिळविण्या करीता कायदेविषयक मार्गदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

# मानसिक, शारीरिक बौद्धिक विकासासाठी ध्यानधारणा आवश्यक : दिगंबर कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२१ डिसेंबर -**



श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात एनसीसी, एनएसएस, करिअर कट्टा अंतर्गत आंतरराष्ट्रीय ध्यानधारणा दिवस साजरा करण्यात आला. यावर्षापासुन पासून संपूर्ण जगामध्ये आंतरराष्ट्रीय ध्यानधारणा दिवस साजरा करण्यात येत आहे या अनुषंगाने महाविद्यालयात कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

याप्रसंगी श्री श्री रविशंकर विद्या मंदिराचे मुख्याध्यापक दिगंबर कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात ध्यानधारणा या विषयाचे महत्त्व सांगुन मार्गदर्शन केले. त्यांनी प्रत्येक व्यक्तीला जीवनामध्ये जसे शरीरासाठी योग, प्राणायाम आवश्यक आहे तसेच मनाच्या आरोग्यासाठी ध्यानधारणा तेवढीच महत्त्वाची आहे . यामुळे अनेक रोगापासून व्यक्तीला निरोगी ठेवण्यास मदत होते. शारीरिक, मानसिक, बौद्धिक या सर्व गुणांचा विकास ध्यान धारणेमुळे वृद्धिंगत करता येतो. आर्ट ऑफ लिविंग च्या माध्यमातून याचे जागतिक स्तरावर प्रचार व प्रसार करण्यात येत यासाठी शाळा महाविद्यालयात या ध्यानधारणा वरती मार्गदर्शन करणे गरजेचे आहे असे त्यांनी सांगितले. हिरानाथ सगर सरांनी आर्ट ऑफ लिव्हिंग चे प्रमुख श्री श्री रविशंकर यांचे ध्यान धारणेचे प्रात्यक्षिक कॅडेटस, विद्यार्थ्याकडुन करून घेतले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय अस्वले या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, डॉ. पदमाकर पिटले, डॉ. प्रदीप पाटील, डॉ. चंद्रसेन करे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ गिरीधर सोमवंशी व कॅप्टन डॉ ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले यांनी आभार मानले.

या कार्यक्रमास डॉ. उदय मोरे यांनी सहकार्य केले कार्यक्रमास प्राध्यापक, कॅडेटस, विद्यार्थी, कर्मचारी उपस्थित होते.

# बंकटराव कदम स्मरणार्थ पार्वती प्रशालेत वृक्षारोपण



**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२१ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील माजी सरपंच, पार्वती कन्या प्रशालेचे संस्थापक बंकटराव कदम यांच्या स्मरणार्थ शाळेत श्रद्धांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यांच्या स्मरणार्थ दोन वडांच्या झाडांची लागवड करण्यात आली.

पार्वती कन्या प्रशालेत शिक्षक पालक संघ व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा सचिव महेश कदम यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. बैठकीमध्ये पार्वती कन्या प्रशालेचे संस्थापक अध्यक्ष, माजी सरपंच, संस्थापक संचालक, तुळजाभवानी शेतकरी सहकारी साखर कारखाना नळदुर्ग, कुलस्वामिनी सहकारी सूत गिरणी तुळजापूरचे संस्थापक संचालक कै. बंकटराव कदम यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या स्मरणार्थ प्रशालेच्या तीने ०२ वडांच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीच्या सचिव तथा मुख्याध्यापिका लता सोमवंशी-कदम म्हणाल्या की, घर घर संविधान, विद्यार्थी सुरक्षिततेबाबत चर्चा तसेच केंद्र शासनाकडून नवीन नियमानुसार प्रत्येक विद्यार्थ्यांचे अपार आयडी काढण्यात आले. अपार आयडीचे ८०% काम पूर्ण, प्रशालेमध्ये वॉटर प्युरिफायर बसविण्यात येणार, विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबत व गुणवत्तेबाबत, पाचवी नवोदय परीक्षेबाबत व पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षा बाबत चर्चा तसेच इ.१० वी सराव परीक्षा १ व २, तसेच २१ फेब्रुवारीपासून दहावी बोर्ड परीक्षेला सुरुवात होणार आहे, अशी माहिती सांगितली.

कार्यक्रमासाठी उपाध्यक्ष बसवराज कवठे कोषाध्यक्ष ब्रह्मानंद कदम तसेच गावातील डॉ. संजय कदम, सचिन कदम, कलाल, प्रशालेचे शिक्षक विजय मोरे, बसवराज मडोळे, अभिमन्यू कदम, सुजाता होटकर, पंढरीनाथ कदम, रोहिणी तळेकर, सचिन गुड, विशाल कदम, लाळे व प्रशालेतील विद्यार्थी उपस्थित होते.

# तेरखेडा आठवडी बाजारात मोबाईल चोरट्यांचा धुमाकूळ

## भाजप तालुकाध्यक्षांचा मोबाईल केला लंपास...

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.२१ डिसेंबर -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा आठवडी बाजारात मोबाईल चोरट्यांनी मोठा धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे नागरिकात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दर शनिवारी तेरखेडा गावात मोठा आठवडी बाजार भरतो. वाशी तालुक्यातील नव्हे तर भूम, कळंब, परंडा तसेच सोलापूर जिल्ह्यातील व्यापारी, नागरिक भाजीपाला खरेदी विक्रीसाठी येत आहेत. त्यामुळे बाजाराचे स्वरूप मोठे असते. याच गर्दीचा फायदा घेत मोबाईल चोर बाजारात भाजीपाला घेण्यासाठी आलेल्या नागरिकांच्या मोबाईलवर डल्ला मारतात.

मागील अनेक दिवसांपासून तेरखेडा आठवडी बाजारात असे प्रकार सुरू असून मोबाईल चोरांच्या सराईत टोळीने धुमाकूळ घालत आहेत. एक आठवडा जातोयका नाही तोपर्यंत शनिवार दि.२१ रोजी बाजारात चोरट्यांनी मोबाईल लंपास केला आहे.

गेल्या एक आठवड्यात तेरखेडा बाजारात चोरट्यांनी माजी सरपंचाचा मोबाईल लंपास केला होता. तर आता कालच्या शनिवारी भाजप तालुकाध्यक्ष कामानिमित्ताने बाजारातून गावात जात असताना चोरट्यांनी त्यांच्या मोबाईलवर डल्ला मारला. नागरिक, व्यापारी, ग्राहक यांच्या गैरसोयीत वाढ झाली आहे. तरी सदरील मोबाईल चोरांच्या हरकतीस पोलिसांनी वेळीस आळा घालून जेरबंद करावे अशी मागणी नागरिकांतून केली जात आहे.

# पवनचक्की प्रकरणात लोकप्रतिनिधींचा आवाज उठवण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२१ डिसेंबर -**

शेतकऱ्यांना दमदाटी करणाऱ्या पवनचक्की उभारणाऱ्या कंपन्यावर प्रशासन कारवाई का करत नाही? उलट अन्यायग्रस्त शेतकऱ्यांनाच प्रशासन थातुरमातुर उत्तरे देऊन त्यांना समजविण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसुन येत आहे. याप्रकरणी आता लोकप्रतिनिधीनी आवाज उठवुन शेतकऱ्यांच्या मुळावर उठलेल्या या धनदांडग्या कंपन्यावर कारवाई व्हावी यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

तुळजापुर तालुक्यात आज पवनचक्की उभारणाऱ्या कंपन्यांनी अक्षरशा धुमाकुळ घातला आहे. अनेक ठिकाणी सर्व नियम धाब्यावर बसवत पवनचक्क्या उभारल्या जात आहेत. अनेक गरीब शेतकरी या पवनचक्क्या उभारणाऱ्या कंपन्यामुळे आत्मदहन करण्याच्या तयारीत आहेत. होर्टी ता. तुळजापुर येथील शेतकरी नामदेव घोडके यांनी या पवनचक्की उभारणाऱ्या कंपनीच्या मनमानी कारभाराला कंटाळुन आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. यावरून तालुक्यातील शेतकऱ्यांवर किती अन्याय होत आहे याची कल्पना येते. अशाच घटना अनेक ठिकाणी घडत आहेत हे योग्य नसुन यामुळे शेतकरी देशोधडीला लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रशासनाने पवनचक्की उभारणाऱ्या कंपन्यांची काळजी घेण्यापेक्षा शेतकऱ्यांची काळजी घेऊन त्यांना धीर देणे गरजेचे आहे.

जवळगा मेसाई येथे एका कंपनीकडुन पवनचक्की उभारली जात आहे याठिकाणी शेतकऱ्यांच्या द्राक्ष बागेतुन शेतकऱ्यांच्या समंतीशिवाय पवनचक्की उभारण्याचे साहित्य वाहुन नेण्यासाठी रस्ता केला जात आहे. एकप्रकारे हा प्रकार मनमानीचाच आहे. त्याचबरोबर काळ्या रंगाच्या गाड्यांमधुन बाऊंन्सरआणुन शेतकऱ्यांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न या कंपन्या करत आहेत. या कंपन्यांना कांही स्थानिक दलालांचे याकामी सहकार्य मिळत आहे. त्याचबरोबर या कंपन्यांनी कांही गुंडप्रवृत्तीचे लोकही पाळुन ठेवले आहेत. अशा कंपनीच्या दलाल आणि गुंड प्रवृत्तीच्या लोकांमुळेही शेतकरी त्रासुन गेला आहे.याला वेळीच प्रशासनाने आवर घालणे गरजेचे आहे.अन्यथा याचा स्फोट व्हायला वेळ लागणार नाही. त्यावेळी या कंपन्यांना पळताभुई थोडी होईल. आज पोलिस प्रशासन प्रत्येकवेळी पवनचक्की उभारणाऱ्या कंपन्यांचीच बाजु घेत असल्याचे अनेक शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. नळदुर्ग पोलिस ठाण्यातील एक अधिकारी केवळ याच कामावर नेमले आहे की काय असा संशय येत आहे. कारण प्रत्येक ठिकाणी हाच अधिकारी शेतकरी आणि पवनचक्की उभारणाऱ्या कंपन्यामधील वाद मिटवायला हजर असतात याचा अर्थ काय समजायचा. आज तालुक्यातील शेतकरी टिकला पाहिजे, शेतकऱ्यांच्या शेतजमिनी जाग्यावर राहिल्या पाहिजेत यासाठी आता सर्वांकडुन प्रयत्न होणे गरजेचे आहे अन्यथा तुळजापुर तालुका हा या पवनचक्क्यामुळे शेतीमुक्त तालुका होण्यास वेळ लागणार नाही. त्याचबरोबर प्रशासनही पवनचक्की असेल किंवा सौरऊर्जा प्रकल्प असेल हे प्रकल्प उभारण्यासाठी शासकीय जमीनी मोठ्याप्रमाणात देऊन टाकत आहे. आज नळदुर्ग येथील जवळपास २० एकर जमीन सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी देण्यात आली आहे. अशप्रकारे जमिनींचे वाटप होत असेलतर भविष्यात शासकीय जमीनच शिल्लक राहणार नाही याचाही विचार प्रशासनाने करणे गरजेचे आहे.

पवनचक्क्या उभारणाऱ्या सर्व कंपन्या या धनदांडग्यांच्या आहेत. या कंपन्या आज आहेत उद्या नाहीत त्यामुळे आपल्या तालुक्यातील शेतकरी वाचला पाहिजे, आपल्या शेतजमिनी शिल्लक राहिल्या पाहिजेत यासाठी आता सामुहिक उठाव होणे गरजेचे आहे. यासाठी लोकप्रतिनिधीनी यामध्ये लक्ष घालुन शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे गरजेचे आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# धनंजय मुंडेला मंत्रीमंडळातून काढा ; मागणी करताच अजित पवारांनी पळ काढला

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२१ डिसेंबर**

मस्साजोग येथे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मयत संतोष देशमुख यांच्या कुटूंबियांचे सात्वनपर भेट घेतली. या प्रसंगी ग्रामस्थांमध्ये मोठा असंतोष दिसत होता. संतोष देशमुख यांचे मारेकरी अजून मोकाटच आहेत. या संदर्भात आमचे म्हणणे अजित पवारांनी ऐकूण घ्यावे अशी भावना ग्रामस्थांची होती.भेट देऊन अजित पवार गाडीकडे जात असतांना ग्रामस्थांनी आपला रोष व्यक्त केला. त्यांनी धनंजय मुंडे यांची मंत्रीमंडळातून हकाटपट्टी करावी अशी मागणी करताच अजित पवार यांनी पळ काढला. समयचुकतेने अजित पवार यांनी गाडीकडे जाण्याचा निर्णय घेतला अन्यथा ग्रामस्थांच्या रोषाला अजित पवार यांना सामोरे जावे लागले असते. याच बरोबर महिलांचाही मोठा आक्रोश होता. या दरम्यान महिला भगिणी यांनीही बोलण्यासाठी वेळ मागितला मात्र त्यांना काही प्रतिसाद न दिल्याने त्यांनीही घोषणाबाजी केली. सर्वांची एकच घोषणाबाजी होती, आरोपीला तात्काळ अटक करा, धनंजय मुंडेंची मंत्रीमंडळातून हकालपट्टी करा

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले देशमुख परिवाराचे सांत्वन
## दोषी व्यक्तींना कठोर शासन होईल याची दिली ग्वाही



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२१ डिसेंबर**

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या खुन्यांना कठोर शिक्षा होईल या दृष्टिकोनातून शासन काम करीत आहे याप्रकरणी दोषी व्यक्तींना फाशी दिली जाईल यासाठी मी स्वतः या प्रकरणात पूर्ण लक्ष देणार आहे अशी ग्वाही देतो असे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मस्साजोग येथे देशमुख यांच्या कुटुंबीयांच्या सांत्वन प्रसंगी सांगितले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मस्साजोग येथे भेट दिली. दिवंगत देशमुख यांची पत्नी, मुलगी तसेच भाऊ धनंजय देशमुख यांच्याशी त्यांनी घटनेबाबत चर्चा करून माहिती घेतली व शासन सर्व प्रकारे या प्रकरणात तपास करून देशमुख कुटुंबाला न्याय मिळवून देईल असे सांगितले.

## वाल्मिक कराड स्वतःहून पोलिसात हजर होणार!



खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड हा पोलिसात हजर होणार असल्याच्या चर्चेला उधान आले आहे. जिल्ह्यातील अनेक कानाकोपऱ्यात वाल्मिक कराड हा स्वतःहून पोलिसात हजर होणार असल्याची चर्चा ऐकावयास मिळते.

## बीडच्या पोलीस अधीक्षकपदी नवनीत कॉवत



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२१ डिसेंबर**

संतोष देशमुख हत्याप्रकरणात तपासात कुचराई केल्याच्या ठपका ठेवत बीडचे पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांची तडकाफडकी बदली करण्यात आली होती. यानंतर बीडमध्ये आज नव्या एसपींची नियुक्ती करण्यात आली आहे.

नवनीत कावत हे बीडचे नवीन पोलीस अधीक्षक राहणार असून, ते यापूर्वी पोलीस उपायुक्त छत्रपती संभाजी नगर या ठिकाणी कार्यरत होते. आता बीड मधील कायदा सुव्यवस्था सुरळीत करण्याचे आवाहन कावत यांच्यासमोर असणार आहे.

# केद्र आणि राज्य सरकारने मस्साजोग येथील घटनेच्या बुडाशी जाऊन तपास करावा-खा.शरद पवार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२१ डिसेंबर**

खा.शरद पवार हे शनिवारी दि.२१ रोजी दुपारी १२ वाजण्याच्या दरम्यान मस्साजोग येथे मयत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची व गावकऱ्यांची भेट घेऊन त्यांचे सोबत संवाद साधला.यावेळी खा.निलेश लंके, खा.बजरंग सोनवणे, आ.संदिप क्षीरसागर,माजी आ.उषाताई दराडे, पृथ्वीराज साठे, राजेसाहेब देशमुख यांच्यासह अनेकांची यावेळी उपस्थिती होती.

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच यांचे ९ डिंसेबर सोमवारी आपहरण करुन खून करुन त्यांचे प्रेत फेकून या गुन्ह्यातील आरोपी फरार झाले होते.पोलीसांनी तपास चक्रे फिरवून या घटनेतील महेश केदार, जयराम चाटे, प्रतिक घुले आणि विष्णू चाटे यांना अटक करुन केज न्यायालयात हजर केले असता तीन आरोपींना २३ डिंसेबर पर्यत तर चौथा आरोपी विष्णू चाटेला २७ डिंसेबर पर्यत पोलीस कोठडी सुनावली आहे. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपी सुदर्शन घुले, सुधीर सांगळे, कृष्णा आंधळे हे तीन आरोपी अद्यापही पोलिसांना हुलकावणी देत फिरत आहेत. त्यांच्या शोधासाठी चार पथके राज्याच्या विविध भागांत पाठविण्यात आलेली आहेत.मस्साजोग येथे शनिवारी अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी पोलिसांचा तगडा बंदोबस्त ठेवला होता.शनिवारी मस्साजोग येथे मोठ्या प्रमाणात महीला आणि नारगीक व तरुण यवक मोठ्या संख्येंने जमले होते.



# जिजाऊ मल्टीस्टेट एमपीआयडी प्रस्तावास तातडीने मान्यता द्यावी

**लाचखोर पीआय हरिभाऊ खाडेला बडतर्फ करा-मारुती तिपाले, शेख कुतुब**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२१ डिसेंबर**

बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीची पाळेमुळे खणताना अर्थिक गुन्हेगारी क्षेत्राकडे सुध्दा गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.जिल्ह्यातील हजारो ठेवीदारांना लुबाडणाऱ्या व्हाईट कॉलर अर्थिक गुंडाना कडक शिक्षा देवून धडा शिकवला पाहिजे. ठेवीदारांना न्याय देण्या ऐवजी कोट्यावधीचा गंडा घालणाऱ्या आरोपींना मदत करणारे आर्थिक गुन्हे शाखेचे तपास अधिकारी लाचखोर पीआय हरिभाऊ खाडे यांना सेवेतून बडतर्फ करावे अशी मागणी जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट अन्यायग्रस्त ठेवीदारांच्या वतीने मारुती तिपाले व शेख कुतुब यांनी केली आहे.

बीड जिल्ह्यात जिजाऊ माँसाहेब , ज्ञानराधा, साईराम ,राजस्थानी, मराठवाडा अर्बन यांच्यासह अनेक मल्टीस्टेट बँकांनी सामान्य जनतेचे करोडो रुपये लुटले. अन्यायग्रस्त ठेवीदार हतबल असुन त्यांचे संसार आर्थिक संकटात आले. जिल्ह्यतील आर्थिक गुन्हेगारी बाबत तत्कालीन पालकमंत्री यांनी उदासीनता दाखवली.आंदोलन,पाठपूरावा करून ही शासनाने दुर्लक्ष केले. परिस्थितीचा फायदा घेऊन पोलीस अधिकाऱ्यांनी चांगलेच हात धुवून घेतले.कर्तव्याचे भान न ठेवता ठेवीदारांना वाऱ्यावर सोडून आरोपींना मदत व फायदा होईल असाच तपास केला गेला. अनेक आरोपी फरार आहेत, तर ज्यांना पकडले त्यांची थातूरमातूर चौकशी करून कागदं काळे केले. आरोपींचा बीपी वाढेल अशी सबब पुढे करून जाणीवपूर्वक आरोपी कडून ठोस माहिती काढली नाही.पोलीस आणि आरोपी यांच्यामध्ये आर्थिक व्यवहार घडल्याने तपास कुचकामी ठरला. ठेवीदारांनी गुन्हा नोंद करून पावणे दोन वर्ष होत आहेत. अजूनही तपास पूर्णत्वाकडे नाही, एमपी आयडी १९९९ अंतर्गत प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे आहे.ठेवीदारांना त्यांच्या घामाचा पैसा परत मिळणार की नाही याबद्दल साशंकता आहे. शासन दरबारी न्याय मिळवण्या साठी ठेवीदार धडपडत आहेत. न्याय विलंबना साठी पोलीस प्रशासन जबाबदार आहे. जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट ठेव घोटाळा प्रकणाचे तपास अधिकारी पीआय हरिभाऊ खाडे यांनी तपास काम करताना लाच घेतली. लाच लुचपत प्रतिबंधक विभागात त्यांचे विरोधात गुन्हा नोंक्र. ०१०७/ १६/५/२०२४ रोजी गुन्हा रोजी नोंद केला गेला. खाडेवर पोलीस कस्टडी व न्यायालयीन कोठडीची कारवाई करण्यात आली. परंतु मुदतपूर्व चार्जशीट न्यायालयात दाखल करण्याची परवानगी वरिष्ठांनी नाकारली. यामुळे त्यांना जामीन मिळाला. रंगे हात पाच लाख रुपयांची लाच स्वीकारताना सक्षम अधिकारी पकडला. परंतु चार्जशीट दाखल करू दिले नाही. अंतिम क्षणापर्यंत ठेवीदार बांधवांनी पोलीस महासंचालकां पर्यंत चार्जशीट दाखल करण्याची विनंती केली. परंतु अद्याप चार्जशीट दाखल झाले नाही. लाचखोर लोकसेवका बाबत एवढी सदभावना कशामुळे...? कारण खाडे यांना मदत करणारा राजकीय हात त्यांच्या पाठीशी असल्याने त्यांचेवर कडक कारवाई झाली नाही. तपासाअंती उत्पन्नापेक्षा जास्त संपत्ती आढळल्याने दि. २१/११/२०२४ रोजी खाडे यांच्या विरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागात दुसरा गुन्हा नोंद झाला. खाडे यांच्या विरोधात दोन गंभीर गुन्हे असून ही खाडेवर कठोर कारवाई सोडाच ते आज मोकाट आहेत. आणि जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट प्रकरणाचा कुचकामी तपास धुळखात पडला. तपास अधिकारी खाडे यांना निलंबित करून जिजाऊ माँसाहेब, मल्टीस्टेट घोटाळ्यात सह आरोपी करून नव्याने तपास करून अद्यावत चार्जशीट न्यायालयात दाखल करावे अशी मागणी यापूर्वी अनेकदा गृह मंत्रालयापासून सर्व वरिष्ठांकडे केली आहे.देवेंद्रभाऊ सरकारने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन लाचखोर पीआय खाडे यांना तातडीने सेवेतून बडतर्फ करावे.जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट एमपीआयडी १९९९ अंतर्गत प्रस्ताव मान्यतेसाठी ११ जुलै २०२४ पासून गृह विभागाकडे आहे. हा प्रस्ताव अपूर्ण असून यामध्ये सर्व आरोपींच्या मालमत्ता समाविष्ट करून प्रस्तावास मान्यता देण्यात यावी. व ठेवीदारांना पैसे परत देण्यासाठी ठोस कार्यवाही करण्यात यावी. अशी मागणी जिजाऊ माँसाहेब ठेवीदार डॉ.अरविंद काकडे,इंजि. सखाराम कळासे, लक्ष्मण हाटवटे, चंद्रकला ताई बांगर, विशाखा सूर्यवंशी, भाऊसाहेब परसे, सूर्यभान नवले, आदींनी केली आहे.

## स्वतःच्या आरोग्यासाठी वेळ द्या-माजी आमदार लक्ष्मण पवार
# गेवराई शहरातील महा आरोग्य शिबीरात उत्स्फूर्त प्रतिसाद
### हृदयविकाराकडे दूर्लक्ष करू नका, काळजी घ्या-डॉ. सुनिल बोबडे यांचे हृदय रोगावर अमूल्य मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२१ डिसेंबर**

रोजच्या धावपळीत आयुष्याकडे दूर्लक्ष झाल आहे. त्यामुळे, आजाराचा आलेख उंचावत चालला आहे. काळजी करण्याची गरज असून, नागरीकांनी निरोगी आरोग्यासाठी स्वतःची काळजी घेतलीच पाहिजे. हृदय विकाराच्या वाढत्या घटना काळजीत टाकणाऱ्या असून, वेळीच लक्ष देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन हृदय रोग तज्ज्ञ डॉ. सुनिल बोबडे यांनी येथे बोलताना केले आहे. शनिवार ता. २१ डिसेंबर रोजी युवा नेते बाळराजे पवार यांच्या वाढदिवसानिमित्त गेवराई शहरातील नगर परिषदेच्या छत्रपती शिवाजीमहाराज शॉपिंग सेंटर सभागृहात महा आरोग्य शिबीराचे आयोजित करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

व्यासपीठावर माजी आमदार लक्ष्मण पवार, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.सुरज कोठावळे, डॉक्टर राजेश शिंदे, डॉक्टर सराफ, शिवराज पवार, नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, डॉ.धनजय माने, डॉ.दिपक फाटक,डॉ.आनंद मोटे,डॉ. विशाल पवार, डॉ.प्रशांत गायकवाड यांची उपस्थिती होती. दरम्यान, दैनंदिन जीवनात भाजीपाला आणि हलक्या आहाराचा उपयोग करून, तळलेले, तेलकट आणि मेदयुक्त पदार्थ टाळायचा प्रयत्न करा, असे आवाहन ही त्यांनी यावेळी केले आहे. दरम्यान, वय वाढल्यावर आपल्या आरोग्याची काळजी नागरिकांनी घ्यायलाच हवी.



व्याधी सुरू झाल्यानंतर, पश्चाताप करण्यात काय अर्थ आहे. अपरिहार्यता म्हणून, आपल्याला रासायनिक युक्त अन्नधान्य खावे लागते. त्यामुळे, प्रत्येक नागरिकांनी स्वतःसाठी एक दोन गुंठ्ठे किंवा परसबागेत पालेभाज्या लावून, आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन माजी आमदार लक्ष्मण पवार यांनी केले. पवार यांनी स्व- अनुभव विशद करून, हृदय विकाराचा त्रास होऊ नये, या संदर्भात काय काळजी घ्यावी, या विषयी महत्त्वपूर्ण गोष्टी सांगून, आरोग्यमय धनसंपदा असल्याचा उल्लेख केला. ज्येष्ठ पत्रकार सुभाष सुतार यांनी ही हृदय विकाराचा सामना कसा केला. या विषयी मार्गदर्शन करून, स्व अनुभव विशद केला. यावेळी डॉ. सुनिल बोबडे यांनी हृदयविकाराची लक्षणे आणि उपाय या विषयी सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले, टॅक म्हणजे, हृदयावर हामला. रक्त पुरवठा कमी झाला की, टॅक येण्याचा धोका वाढतो. ताणतणाव, चिडचिड होणे, अती राग ,अवेळी खानपान, तेलकट, मेदयुक्त पदार्थाचे सेवन, उशिरा झोप इ. कारणाने हृदय विकाराचा संभव असतो. अलीकडच्या काळात ६३% लोकांना हृदय रोगाचा त्रास सहन करावा लागतो. मात्र, केवळ ५३% लोक तत्परता दाखवत नाहीत, ही गंभीर बाब असून, सरकारी, खाजगी रुग्णालयात उपचार घेऊन, रूग्ण बरा होतो. याकडे त्यांनी लक्ष वेधले.हृदय विकारात प्रचंड वेदना होतात. ९०% छातीत दुखते,१०% लोकांना पाठित, डाव्या हातात त्रास जाणवतो. मात्र, आपल्याला जळजळ झाल्याने त्रास होत असेल, या दृष्टिकोनातून त्याकडे दुर्लक्ष केले जाते. हे अतिशय चुकीचे असल्याचे त्यांनी सांगितले. हृदय रोग, मधुमेह टाळता येतो. अनुवंशिक आजाराचा इतिहास असेल तर, किमान असे आजार कंट्रोल ठेवता येतात, असे निरिक्षण डॉ. बोबडे यांनी नोंदवून, अचानक त्रास जाणवला की, घाबरू नका ; कुणाची तरी मदत घ्या. शांत पडून रहा, चालू नका, गडबड करू नका, असा मौलिक सल्ला ही त्यांनी दिला. वेळेत वैद्यकीय तपासण्या करा, आपल्याकडे सुविधा उपलब्ध आहेत. त्याचा फायदा घ्या, असे आवाहन करून, बीड शहरात आपल्या हक्काचा मेडिकेअर नावाचा दवाखाना रुग्ण सेवेसाठी सदैव तत्पर असणार आहे. गेल्या दीड - दोन वर्षांपासून बांधिलकी जोपासून आम्ही करत आहोत. शासन स्तरावर असलेली सुविधा उपलब्ध करून दिली जाते. त्यामुळे, गेवराईकरांनी हक्काने यावे, असे कृतज्ञतापूर्वक आवाहन डॉक्टर बोबडे यांनी शेवटी बोलताना केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नगरसेवक संजय इंगळे यांनी केले. आभार ड. भगवान घुंबार्डे यांनी मानले.बाळराजे पवार मित्र मंडळाच्या वतीने पार पडलेल्या महा शिबीरात मधुमेह , रक्तदाब, हृदयरोग, ई.सि.जी. करण्यात आली. या शिबीरात नागरिकांनी रक्तदान करून सहभाग नोंदवून शिबीराचा लाभ घेतला. सदरील शिबीर यशस्वी करण्यासाठी राजेंद्र राक्षसभुवनकर, भगवान घुबार्डे, राहुल खंडागळे, दादासाहेब गिरी, ब्रम्हदेव धुरंधरे, याहीया खॉन, राम पवार, संजय इगळे, मुन्नासेठ,कृष्णा काकडे,राजाभाऊ आर्दड, धम्मपाल सौदरमल, भरत गायकवाड, सय्यद बद्दोदिन,छगन आप्पा हादगुले, किशोर धोडलकर, अरुण मस्के, जानमहमंद बागवान, आप्पासाहेब कानगुडे, जुनेद बागवान, इम्रान पठाण,सय्यद हासन, यांनी प्रयत्न केले.

## बाळराजे पवारांच्या वाढदिवसानिमित्त सौ.गिताभाभीच्या हास्ते शालेय साहित्यांचे वाटप




**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२१ डिसेंबर**

गेवराई मतदार संघाचे माजी आमदार आदरणीय श्री लक्ष्मण आण्णा पवार यांचे मोठे बंधू भाग्यविधाते आदरणीय दैवत श्री बाळराजे दादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त ताकडगाव येथे सामाजिक उपक्रम, अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ताकडगाव येथे शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले ह्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती, गेवराई तालुक्याच्या रणरागिणी आमचे दैवत आदरणीय सौ, गिता भाभी पवार ह्यांच्या हस्ते शालीय साहीत्य वाटप करण्यात आले, यावेळी प्रमुख उपस्थिती भाजपा महिला आघाडीच्या तालुका अध्यक्ष आदरणीय सौ.रत्नमाला,नानी मोटे, यावेळी उपस्थित गावातील महिला सौ,अनिता केदार, श्रीमती,सत्यशिला गिरी श्रीमती, सावित्रा मोटे, श्रीमती निलावती पालेकर, यावेळी शाळेचे विद्यार्थी शिक्षक, शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक श्री शिवाजी सानप, श्री काशिद सर,श्री प्रदीप सराफ सर, श्री भगवान कोळी सर श्रीमंती,कल्पना,जाधव.मॅडम, श्रीमती रेणुका शेळके मॅडम, शाळेचे शिक्षक इत्यादी उपस्थित गावातील नागरिक, या कार्यक्रमाचे,आयोजन श्री शिवाजी पवार,माजी ग्रामपंचायत सदस्य श्री मनोज, केदार ,अविनाश मोटे, भाजपा दिव्यांग विकास आघाडी गेवराई तालुका अध्यक्ष श्री दत्ता गिरी , श्री कल्याण मोटे,श्री लक्ष्मीकांत पालेकर, ,श्री नामदेव मोटे केले,, होते, यावेळी उपस्थित माजी सरपंच विजय डोळस,जालीदंर केदार,ग्रामपंचायत सदस्य, श्री अनंत मोटे, ग्रामपंचायत सदस्य,श्री आप्पा मोटे श्री,कैलास मोटे,, गावातील जेष्ठ नागरिक श्री आत्माराम राऊत, श्री शंकर मोटे,श्री कारभारी काकडे व ईतर ताकडगावातील,गावातील नागरिक या सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री प्रल्हाद शिंदे सर यांनी केले व आभार प्रदर्शन, प्रदीप सराफ सर यांनी केले उपस्थित होते,

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## क्रीडा स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २१ डिसेंबर-**
क्रीडा संस्कृतीची जोपासना व जनतेत क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक वातावरण निर्माण होण्याच्या उद्देशाने जिल्ह्यात दि. १२ ते १८ डिसेंबर या कालावधीत क्रीडा सप्ताह साजरा करण्यात आला. याअंतर्गत आयोजित क्रीडा सप्ताहानिमित्ताने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय लातूर यांच्यामार्फत जिल्ह्यात विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील विजयी खेळाडूंना जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत पदके आणि प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले.

तसेच जिल्हा क्रीडा संकुल येथे लातूर जिल्ह्यातील कुस्ती व जिम्नॅस्टीक खेळांच्या खेळाडूंनी प्रात्यक्षीके सादर करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी खेळाडूंना खेळामध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी गुरूमंत्र दिला. याप्रसंगी नेताजी जाधव, थेलॅटीक्स कोच समाधान बुरगे, राहुल होनसांगळे, लायक सय्यद, अमजद शेख, जिम्नॅस्टीक कोच आशा झुंजे, कुस्तीकोच चेतन जावळे, तालुका क्रीडा अधिकारी सुरेंद्र कराड, क्रीडा अधिकारी कृष्णा केंद्रे, धीरज बावणे, बाबासाहेब इंगोले, सागर पोतदार, प्रसाद वैद्य आदी उपस्थित होते.

कार्यक्रमप्रसंगी जिल्ह्यातील विविध खेळाच्या स्पर्धांमध्ये प्राविण्य प्राप्त केलेल्या विजयी खेळाडूंना प्रमाणपत्र व पदकांचे वाटप प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन क्रीडा अधिकारी कृष्णा केंद्रे यांनी केले तर आभार तालुका क्रीडा अधिकारी सुरेंद्र कराड यांनी मानले.



### संक्षिप्त वृत्त...

## मोकाट जनावरे पकडण्यासाठी मनपाची मोहीम : दीड लाखाचा दंड वसूल

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २१ डिसेंबर-**
शहरात फिरणारी मोकाट जनावरे पकडण्याची मोहीम मनपाने अशोक सेवा स्वच्छता सेवा मंडल यांच्या मार्फत हाती घेतली असून याअंतर्गत आतापर्यंत १५० जनावरे पकडण्यात आली आहेत.संबंधिताकडून एकूण १ लाख ५१ हजार ५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. शहरात फिरणाऱ्या मोकाट गायी,बैल,म्हैस,रेडा,गाढव,शेळ्या आदी पशुना पकडण्यासाठी ही मोहीम सुरु करण्यात आली आहे.या अंतर्गत दि.१६ पर्यंत १५० जनावरे पकडून सिकंदरपूर येथील कोंडवाड्यात बंदिस्त करण्यात आली होती.त्यापैकी ३४ जनावराच्या मालकाकडून १ लाख ५१ हजार ५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.ही सर्व जनावरे सिकंदरपुर येथे कोंडवाडा विभागात ठेवण्यात आली होती.

## वाहतूक नियमांबाबत स्कूल बस चालकांना मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २१ डिसेंबर-**
शहर वाहतूक नियंत्रण शाखेच्या वतीने स्कूल बसचालकांसाठी मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले. यावेळी वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक गणेश कदम यांनी मार्गदर्शन केले.
यावेळी विद्यार्थी वाहतूक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्रीकृष्ण पाडे, उपाध्यक्ष अनिल शिंदे, सचिव संदीप वाघ, कोषाध्यक्ष सुरेंद्र सरवदे, रमेश अंधारे, परमेश्वर स्वामी, सोमनाथ खाडे, सटवा भालेकर, चंदू कोळगिरे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते. स्कूल बसचालकांकडून नियमांचे पालन होत आहे. विद्यार्थी सुरक्षेला प्राध्यान्य द्यावे, असे आवाहन पो.नि. कदम यांनी केले. वाहतुकीचे नियम, नियमांचे उल्लंघन केल्यास होणारी कारवाई याबाबतही त्यांनी माहिती दिली. संघटनेचे अध्यक्ष श्रीकृष्ण पाडे यांनी स्कूल बसचालकांना येणाऱ्या अडचणी मांडल्या. तसेच संघटनेकडून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

## कारची दुचाकीला धडक बसल्याने एक नागरिक जखमी

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २१ डिसेंबर-**
औसा शहरापासून जवळच दुचाकीवर बसून जात असताना पाठीमागून आलेल्या एका पांढऱ्या रंगाच्या कारने दुचाकीला जोराची धडक दिल्याची घटना १६ डिसेंबर रोजी दुपारी ४.३० वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी अशरफअली शौकतअली सय्यद (रा. बरकत नगर, लातूर) यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे, त्यांचा भाऊ व ते लातूरकडे येत असताना पाठीमागून भरधाव आलेल्या कारच्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयी व निष्काळजीपणे चालवून दुचाकीला जोराची धडक दिली. यात फिर्यादी गंभीर जखमी झाले. अपघातानंतर कारचालक वैद्यकीय मदत न पुरखता, घटनास्थळी न थांबता निघून गेल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याबाबत पोलिस ठाण्यात अज्ञात कार चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## गाडी उभी करून मारहाण, तिघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २१ डिसेंबर-**
शिरूर अनंतपाळ तालुक्यातील निटूर ते निलंगा रोडवर एकाची गाडी उभी करून विनाकारण संगनमत करून शिवीगाळ करून मारहाण केल्याची घटना घडली. याप्रकरणी शिरूर अनंतपाळ पोलिस ठाण्यात तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी अजय उत्तम सूर्यवंशी यांना सचिन गणपत मधाळेसह सोबतच्या दोघांनी संगणत करून विनाकारण गाडी उभी मानेवर पाठीमागे मारल्याने तीन टाके पडले आहे. तसेच सोबतच्या एकास उजव्या बरगडीवर मारून जखमी केल्याने त्यांनाही दोन टाके पडले आहेत.

## हणमंत जाकते यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २१ डिसेंबर-**
शहरातील प्रतिष्ठित नागरिक हणमंत जाकते यांचे नुकतेच निधन झाले. शहर महानगर पालिकेचे ते माजी नगरसेवक होते. नगरसेवक पदाच्या कार्यकाळात त्यांनी आपल्या प्रभागात बरीच विकास कामे केली. त्यांच्या पार्थिव शरीरावर शनिवारी येथील मारवाडी स्मशान भूमीत अंत्यविधी करण्यात आला. त्यांच्या पश्चात मोठा परिवार आहे.

## ग्राहकांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देणे आवश्यक

### तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष गिराम यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २१ डिसेंबर-**
ग्राहक हा राजा आहे असे म्हटले जाते. प्रत्येक नागरिक हा जन्मापासून ते मृत्यूपर्यंत ग्राहकच असतो. त्यांची फसवणूक होवू नये, यासाठी त्यांना ग्राहक संरक्षण कायद्यानुसार मिळालेल्या हक्कांची जाणीव करून देणे आवश्यक आहे असे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष अमोल गिराम यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात जागतिक ग्राहक दिनानिमित्त जिल्हा पुरवठा विभागाच्यावतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी अपर जिल्हाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके होते.

जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या सदस्य वैशाली बोराडे, विधिज्ञ अ‍ॅड. अनिल जवळकर, अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष दत्ता मिरकले पाटील, प्रांत ग्राहक संरक्षण परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश भोसले, जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे अशासकीय सदस्य प्रल्हाद तिवारी, शिवशंकर रायवाडे, बालासाहेब शिंदे, विपुल शेंडगे, शामसुंदर मानधना, इस्माईल शेख, संगमेश्वर रासुरे, मंजुषा ढेपे, व्यंकट कुलकर्णी, सतीष देशमुख, रंजना मालुसरे, एन. जी. माळी, गीता मोरे, नितीन कल्याणी, अभिजित औटे यावेळी उपस्थित होते.

ग्राहक संरक्षण कायद्याविषयी जनजागृती होण्यासाठी जागतिक ग्राहक दिनानिमित्त करण्यात आलेले उपक्रम कौतुकास्पद आहेत. या उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांना कायद्याची माहिती मिळेल, तसेच आपली फसवणूक झाली तर काय केले पाहिजे, याबाबत जाणीव जागृती होण्यास मदत होईल. सध्या ई-कॉमर्स संकेतस्थळावरून ऑनलाईन शॉपिंगचे प्रमाण वाढले आहे. या माध्यमातूनही ग्राहकांची फसवणूक होवू शकते. त्यामुळे ग्राहकांनी याबाबत अधिक सजग होणे गरजेचे आहे. एखादी वस्तू ऑनलाईन स्वरुपात खरेदी करताना त्याबाबत संपूर्ण माहिती घेणे आवश्यक आहे. तरीही फसवणूक झाल्यास जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे दाद मागण्याचा हक्क ग्राहक संरक्षण कायदा २०१९ नुसार नागरिकांना मिळाला असल्याचे श्री. गिराम म्हणाले.

ग्राहकांना सजग करण्यासाठी राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त आयोजित उपक्रम उपयुक्त ठरेल. या माध्यमातून मिळणाऱ्या माहितीमुळे नागरिकांमध्ये आपल्या हक्कांबाबत जागृती निर्माण होईल, असे प्रभारी अपर जिल्हाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके म्हणाले.

प्रास्ताविकामध्ये जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे यांनी जागतिक ग्राहक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या ग्राहक जनजागृती पंधरवडा अंतर्गत जिल्ह्यात कार्यक्रमांची माहिती



दिली. तसेच २४ डिसेंबर रोजी जिल्ह्यात शाळा, महाविद्यालयात ग्राहक हक्काबाबत माहिती दिली जाणार असल्याचे सांगितले. पोलीस निरीक्षक दयानंद पाटील यांनी सायबर सुरक्षाविषयी मार्गदर्शन केले. जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे अशासकीय सदस्य रंजना पाटील, राजेश भोसले, अभिजित औटे, दत्ता मिरकले पाटील यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन श्री. धायगुडे यांनी केले, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड यांनी उपस्थितांचे आभार मानले. लातूर शहर महानगरपालिका, महावितरण, अन्न व औषध प्रशासन, कृषि विभाग, आरोग्य विभाग, प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय आदी विभागांमार्फत उभारण्यात आलेल्या दालनांना यावेळी मान्यवरांनी व नागरिकांनी भेटी दिल्या.



## पक्ष बांधणीसाठी ठाकरे गटाची बैठक

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २१ डिसेंबर-**
लातूर जिल्हा शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाची बैठक जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

लातूर जिल्ह्यातील पक्षाची बांधणी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या बाबतीत सविस्तर चर्चा करण्यात आली विधानसभा निवडणुकी नंतर प्रथमच पक्षाची जिल्हा बैठक आयोजित करण्यात आली होती या बैठकीत नवीन जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी व सहसंपर्कप्रमुख नामदेव चाळक यांचा जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. या बैठकीस लिंबन महाराज रेशमे महिला जिल्हा संघटक जयश्री उटगे, सुनीता चाळक, महानगर प्रमुख सुनील बसपुरे, युवती प्रमुख अ‍ॅड. श्रध्दा जवळगेकर, युवा सेना प्रमुख दिनेश जावळे, निलंगा तालुकाप्रमुख अविनाश रेशमे, उपजिल्हाप्रमुख हरिभाऊ सगरे, संतोष सुर्यवंशी, शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष विलास लंगर, सहकार सेना जिल्हाध्यक्ष किशोर जाधव, खरेदी विक्री संघाचे उपसभापती शेखर चव्हाण, देवणी तालुका प्रमुख मुकेश सुडे शिवाजी चव्हाण, व्यापारी आघाडी जिल्हाध्यक्ष बसवराज मंगरूळे अ‍ॅड. रवी पिचारे, दैवशाला सगर, सुनीता भोसले, सतीश शिवणे, सुनील नाईकवाडे, शंकर रांजनकर, रमेश माळी यांच्या सह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी डिजिटल साक्षर होण्याची गरज

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २१ डिसेंबर-**
शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी डिजिटल साक्षरतेबरोबर सॉफ्ट स्किल आणि अत्याधुनिक कार्यालयीन एप्लीकेशनचा वापर करावा. कारण बदलत्या काळानुसार डिजिटल साक्षर होण्याची खरी गरज आहे,असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी केले.

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात संगणकशास्त्र विभागातर्फे दि.१९ ते २४ डिसेंबर २०२४ दरम्यान शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी आयोजित शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये डिजिटल साक्षरता विकसित करणे या विषयावरील पाच दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन



झाले.मागील १० वर्षांपासून संगणकशास्त्र विभागातर्फे शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी या प्रशिक्षण कार्यशाळेचे दरवर्षी आयोजन केले जाते.या प्रशिक्षण कार्यशाळेत डिजिटल साक्षरताबरोबर सॉफ्ट स्किल आणि बेसिक इंग्लिश स्पिकिंग या विषयाचेसुद्धा प्रशिक्षण देण्यात येत आहे.

याप्रसंगी संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रोहिणी शिंदे, डॉ.संगीता जाजू, प्रा.अरुणा चौधरी, नवनाथ भालेराव आणि बन्सी कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रोहिणी शिंदे यांनी केले तर आभार प्रा.अरुणा चौधरी यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा.वैभव कुलकर्णी यांनी केले.याप्रसंगी प्रा. सुजाता काळे,प्रा.कृष्णा सारडा, प्रा.सुमित जोशी,प्रा.पूजा नंदगावे, प्रा.आशा बोराडे,प्रा.दीपाली दाडगे आदी उपस्थित होते.

## ‘अन्वी’त संगणक कक्षाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २१ डिसेंबर-**
शहरातील सूतमिल कंपाउंड परिसरातील अन्वी गर्ल्स हॉस्टेलमध्ये अद्ययावत ग्रंथालय व संगणक कक्षाचे उद्घाटन आणि नीट मॅरेथॉन परीक्षेतील गुणवंत विद्यार्थिनींना जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे यांच्या हस्ते रोख बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

अध्यक्षस्थानी राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी एन. एम. जाधव उपस्थित होते. मंचावर राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्या अध्यक्षा




के. ए. जायेभाये, अन्वी चे संचालक प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, तुळजाभवानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक राजीव मुंढे, सदस्या स्वाती घुले यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी शिक्षणाधिकारी फुटाणे म्हणाल्या, अन्वी गर्ल्स हॉस्टेल हे लातूर जिल्ह्यातील किंबहुणा मराठवाड्यातील सर्वात अत्याधुनिक हॉस्टेल आहे. या हॉस्टेलमध्ये स्विमिंग पूल, वातानुकुलीत ग्रंथालय, आवश्यक पुस्तके, उच्च शिक्षीत ग्रंथपाल, लिफ्ट, परिसरावर सीसीटीव्हीची नजर, आरोग्य सुविधा, अभ्यासातील शंकांचे निरसन करण्यासाठी प्राध्यापक वर्ग, एन लिटद्वारे वाचनासाठी विविध पुस्तके व वर्तमानपत्रे, पोषक जेवण आदी सुविधा उपलब्ध आहेत. अपयशातूनच यशाचा मार्ग सापडतो. अपयश आले तरी खचून न जाता आपण कुठे कमी पडलो, याचे आत्मचिंतन करावे. भरकटायला लावणाऱ्या घटकांपासून दूर रहा. सौंदर्याऐवजी गुणवत्तेला प्राधान्य द्या. ध्येय निश्चित करून या हॉस्टेलमध्ये असलेल्या सुविधांचा लाभ घेऊन परिश्रमाच्या जोरावर आपले व आपल्या पालकांचे स्वप्न साकार करा, असा सल्ला त्यांनी उपस्थित विद्यार्थिनींना दिला.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डी. एन. केंद्रे म्हणाले, गतवर्षी या हॉस्टेलमधील एका विद्यार्थिनीने नीट परीक्षेत ६९०, तर यावर्षी एका विद्यार्थिनीने ६९२ गुण मिळविले.

## जिल्हा बँकेकडून अपघात विम्यापोटी १८ लाखांची मदत

### माजी मंत्री देशमुख यांच्या हस्ते धनादेशाचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २१ डिसेंबर-**
सहकार क्षेत्रात नावलौकिक असलेल्या असलेल्या लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शेती सहकारी संस्था अंतर्गत कर्जदार सभासदांना विम्याचे संरक्षण मिळावे म्हणून जनता अपघात विमा स्वीकारण्यात आला आहे. याअंतर्गत पाच मयतांच्या वारसांना १७ लाख ७५ हजार रुपयांच्या विम्याचा धनादेश माजी मंत्री दिलीपराव देशमुख व जिल्हा बँकेचे चेअरमन तथा माजी आमदार धीरज देशमुख यांच्या हस्ते वितरित करण्यात आला.

जिल्हा मध्यवर्ती बँकेने योजनेअंतर्गत ५८६ प्राथमिक शेती सहकारी संस्थांच्या २ लाख ३८ हजार ५४३ सभासदांचा जनता अपघात विमा उतरविला आहे. बुधवारच्या संचालक मंडळाच्या बैठकीत ५ मयताच्या वारसांना १७ लाख ७५ हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला. यावेळी जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अ‍ॅड. प्रमोद जाधव, संचालक एन. आर. पाटील, भगवानराव पाटील तळेगावकर, पृथ्वीराज शिरसाठ, राजकुमार पाटील, दिलीप पाटील नागराळकर, मारोती पांडे, स्वयंप्रभा पाटील, लक्ष्मीताई भोसले, सपना किसवे, अनिता केंद्रे, कार्यकारी संचालक हणमंतराव जाधव आदी उपस्थित होते.

## मागण्यांसाठी महाराष्ट्र जनएकता संघटनेचे अर्धनग्न आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २१ डिसेंबर-**
शहरातील गावभागातील हजरत सुरतशहावली दर्गा समोरील बंद पडलेले अर्धवट काम पूर्ण करावे तसेच खोरी गल्लीतील अल्पसंख्याक वसतिगृहाचे काम त्वरित सुरू करावे, आदी मागण्यांसाठी अल्पसंख्याक हक्क दिनाचे आचित्य साधून महापालिकेसमोर महाराष्ट्र जनएकता संघटनेच्यावतीने अर्धनग्न धरणे आंदोलन करण्यात आले.

अल्पसंख्याक समाजाच्या आर्थिक व शैक्षणिक प्रगतीसाठी, स्थानिक समस्या सोडविण्यासाठी अल्पसंख्याक हक्कदिन साजरा करण्यात येतो. मात्र, त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. लातूर शहरातील गावभागातील हजरत सुरतशहावली दर्गा समोरील अर्धवट राहिलेले काम सुरू करावे.

तसेच खोरी गल्लीतील अल्पसंख्याक वसतिगृहाचे काम त्वरित सुरू करावे, तसेच शहरातील अल्पसंख्याक प्रभागात विकास कामे होत नाहीत. महापालिका अंतर्गतच्या ऊर्दू शाळांकडे लक्ष दिले जात नाही. यासंदर्भात वारंवार निवेदन देऊन, आंदोलन करूनही दुर्लक्ष करण्यात येत आहे. त्यामुळे अल्पसंख्याक हक्क दिनानिमित्त महाराष्ट्र जनएकता संघटनेचे अध्यक्ष इरफान शेख यांच्या नेतृत्वाखाली महानगरपालिकेसमोर अर्धनग्न आंदोलन करून महापालिका प्रशासनास निवेदन देण्यात आले.

सदरील आंदोलनात कार्याध्यक्ष जावेद शेख, सत्तार शेख, सचिव मीनहाज शेख, वसीम पठाण, मेहराज सिद्दीकी, रियाज पठाण, सिराज शेख, फारूक शेख, खाजा शेख, इस्माईल शेख, सलीम सय्यद, निसार शेख यांच्यासह संघटनेचे अन्य पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## टेम्पोत चोर कप्पा बनवून तस्करी; ६८ किलो चंदन जप्त

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २१ डिसेंबर-**
स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा लावून चंदनाच्या झाडांची अवैध तोड करून वाहतूक करणारा टेम्पो पकडून ६८ किलो चंदनासह ११ लाख २२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. मात्र, अंधाराचा फायदा घेऊन टेम्पो चालक व मालक फरार झाले असून त्यांना पकडण्यासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पथक स्थापन करण्यात आले आहे.

दरम्यान, गुरुवारी मध्यरात्री





पथकाला मिळालेल्या माहितीवरून चाकूर तालुक्यातील आष्टा मोड परिसरात चंदनाच्या लाकडाची अवैध वाहतूक करणाऱ्या टेम्पोला (क्र. एम एच ४४ यू ३३०६) पकडला. सदर टेम्पोच्या संरचनेत बदल करून टेम्पोत एक गोपनीय कप्पा तयार करून त्यात चंदनाची साल काढून तसलेला चंदनाचा गाभा व लाकडे चोरटी विक्री करण्यासाठी नेण्यात येत होती.

सदर टेम्पो चालक व मालक हे अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले असून त्यांना पकडण्यासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत. आरोपींच्या ताब्यातील टेम्पो व ६८ किलो चंदन असा एकूण ११ लाख २२ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मिरकले यांच्या मार्गदर्शनात आणि सहायक पोलीस निरीक्षक विश्वंभर पल्लेवाड यांच्या नेतृत्त्वात पोलीस अंमलदार चंद्रकांत डांगे, रामहरी भोसले, युवराज गिरी, अर्जुन राजपूत, सिध्देश्वर मदने, गोविंद भोसले यांनी ही सेवा बजावली.

## हौशी राज्य नाट्य स्पर्धेत नाट्यस्पंदन परिवाराचे यश

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २१ डिसेंबर-**
६३ व्या हौशी राज्य नाट्य स्पर्धेत लातूर केंद्रात नाट्यस्पंदन लातूर परिवाराने घवघवीत यश संपादन करून पाच बक्षीसे मिळविली.

६३ वी महाराष्ट्र राज्य हौशी नाट्य स्पर्धा लातूर केंद्रावर नुकतीच पार पडली. लातूर हे स्पर्धेचे स्वतंत्र केंद्र झाल्यापासूनचे हे पहिलेच वर्ष आहे. नाट्यस्पंदन प्रतिष्ठान या रंगकर्मी डॉक्टरांच्या संस्थेने पहिल्याच वर्षी घवघवीत यश संपादन केले आहे. नाट्यस्पंदन संस्थेची मित्र संस्था सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठानतर्फे सादर केलेले ‘परफेक्ट मिसमॅच’ हे नाटक केंद्रातून प्रथम आले. या नाटकाला सांघिक प्रथम, दिग्दर्शन प्रथम संजय अयाचित, पुरुष अभिनय प्रथम डॉ. मुकुंद भिसे, स्त्री अभिनय प्रथम डॉ. भाग्यश्री कुलकर्णी आणि प्रकाशयोजनेचे द्वितीय पारितोषिक गणपत कुलकर्णी यांना मिळाले. या नाटकाची निवड अंतिम फेरीसाठी झाली आहे.

नाट्यस्पंदन प्रतिष्ठानतर्फे सादर केलेल्या ‘सभ्य गृहस्थ हो’ या नाटकातील कलावंत डॉ. अशोक आरदवाड आणि डॉ. व्यंकट येलाले यांना अभिनयाचे प्रमाणपत्र मिळाले. तसेच या नाटकासाठी त्यांना रंगभूषाचे द्वितीय पारितोषिक मिळाले. ‘खेळ’ या नाटकातील भूमिकेसाठी डॉ. गणेश पोतदार यांनाही प्रमाणपत्र मिळाले. याबद्दल नाट्यस्पंदन परिवाराचे कौतुक करण्यात येत आहे.